नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १९९ * * अकोला * बुधवार, दिनांक २१ जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## भाजप नेत्याने शिक्षिका पत्नीचा गळा चिरला

■ वृत्तसंस्था, लखनौ, दि. २१ :
यूपीच्या आंबेडकरनगरमध्ये भाजप नेत्याने अनैतिक संबंधाच्या संशयातून पत्नीचा गळा चिरून खून केला. महिलेचा रक्ताने माखलेला मृतदेह स्वयंपाकघरात आढळला. घटनेच्या वेळी ती घरी एकटीच होती. सासू घरी परतल्यावर त्यांना घटनेची माहिती मिळाली.

घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी तपास सुरू केला असता पतीचे नाव समोर आले. पोलिसांनी आरोपी पती उमाशंकर सिंहला ताब्यात घेतले असून, त्याची चौकशी करत आहेत. तो भाजपचा नगर मीडिया प्रभारी आहे. तर, पत्नी एका खासगी शाळेत शिक्षिका होती. ही घटना अकबरपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गांधी आश्रम येथील आहे.

## महाराष्ट्राची महाउदारता




महाराष्ट्रा विना राष्ट्रगाडा न चाले, असे कधीकाळी कविवर्य सेनापती बापट यांनी म्हटले होते. त्यांच्या याच ओळीला साकार करणारी एक भाषिक अधिसूचना महाराष्ट्राच्या पालघर जिल्हा प्रशासनाने काढली आहे. त्यांनी मराठी आणि हिंदी बरोबर गुजराती भाषेचा उपयोग करावा असा आदेशच काढलेला आहे. म्हणजे मग गुजरातीविना महाराष्ट्रात येणारी गाडीच न चाले, असे बहुधा हा आदेश काढणाऱ्या अधिकाऱ्याला सोयीस्करपणे वाटले असेल. महाराष्ट्रा सारख्या प्रगत राज्याने अशी उदारता इतर अनेक भाषांबद्दल वापरली, तर किती बहार होईल. आपल्या देशात ज्या ज्या भाषा राजमान्य आहेत त्या सर्व भाषांचा उपयोग करावा. वाहन चालकांनी आपली भाषा येईपर्यंत थांबावे आपल्या भाषेतील उद्घोषणा ऐकून, ठिकठिकाणी ठेवलेले अंतराचे आणि पोहोचण्याच्या स्थानाचे माहितीदर्शक फलक वाचूनच शहरात प्रवेश करावा. हा उदात्त दृष्टिकोन नक्कीच महाराष्ट्राच्या विशालहृदयी बहुभाषाप्रेमी संस्कृतीचा विजय आहे असे म्हटले तर ते अजिबात वावगे ठरूच नये. ज्या ठिकाणी गुजरातच्या हद्दीस प्रारंभ होतो त्याच्या आधी गुजरात प्रशासनाने काढलेल्या अधिसूचनेत मराठी भाषेचा वापर केलेला नाही. पण त्यासाठी आपण विनाकारण प्रतिष्ठेचा प्रश्न अजिबात करू नये कारण गुजरातच्या जनतेला मराठी कळतच नाही. म्हणून गुजराती मधील अधिसूचना काढावी लागली आहे असे प्रशासन म्हणेल. पण मराठी मन अधिक विद्वान आणि बहुभाषा प्रेमी असल्याने त्यांना महाराष्ट्रात प्रवेश करताना गुजराती अधिसूचना असली तरी चालू शकेल, असा पोक्त विचार करून पालघर जिल्हा प्रशासनाने हा निर्णय घेतला असावा. मुंबई - अहमदाबाद या राष्ट्रीय राज्य मार्गावरून उत्तरेकडील बरीच वाहने आर्थिक राजधानी मुंबईमध्ये येत असतात. पालघर सीमेलगत गुजरातच्या भिलाड येथे सध्या रेल्वेच्या अंडरपास सिमेंट बोगद्याचे काम दोन दिवसापूर्वी पासून हाती घेण्यात आलेले आहे. हा मार्ग वाहतुकीसाठी बंद केलेला आहे किंवा नाही याची सूचना मराठीतून देण्यात आलेली नाही, हे अत्यंत विशेष आहे. पालघर जिल्ह्यातील अनेक मराठी भाषिक वाहन चालक या मार्गाचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. पण मराठी जनाला, मनाला आणि भाषेला कशाला महत्त्व द्यावे असा पोक्त किंवा अतिपरिपक्व विचार झाला असावा. त्यासोबतच मराठी जनांच्या बुद्धिमत्तेबद्दल आणि मराठी मंडळींच्या बहुभाषा प्रेमाबद्दल पालघर जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना आश्चर्यजनक आत्मविश्वास असल्यामुळे असा निर्णय घेण्यात आला असावा. आम्ही गुजराती भाषेबद्दल दुराभिमानी नाही, गुजराती भाषेला महत्त्व दिलेले आम्हाला आवडत नाही असेही अजिबात नाही. पण आम्ही जसे गुजरातीला महत्त्व देतो तसेच महत्त्व गुजरातमधील अधिकाऱ्यांनी मराठीलाही द्यावे एवढीच आमची वेडी अपेक्षा आहे. भारतातील किंवा महाराष्ट्रातील सीमांवर वेगवेगळी राज्य अस्तित्वात आहेत. त्यात महाराष्ट्राला लागून कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, गोवा वगैरे राज्यांच्या सीमा आहेत. त्या त्या राज्यांच्या सीमेवर लगतच्या राज्याच्या भाषेचा उपयोग करणे हा आपल्या उदाहरणाचा राजमार्ग असू शकतो. त्या उदात्त दृष्टीने पालघरच्या अधिकाऱ्यांनी गडचिरोली, कोल्हापूर, सोलापूर, गोंदिया, नागपूर, सिंधुदुर्ग वगैरे जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांनाही मार्गदर्शन करून आपल्या विशाल हृदयी बहुभाषा प्रेमाचा परिचय दिलाच पाहिजे. पालघर जिल्हा प्रशासनाच्या या राष्ट्रीय कृतीची दखल घेऊन त्या जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांचा एक खास समारंभ आयोजित करून त्यांचा विशेष गौरव केला गेला पाहिजे आणि त्या गौरव समारंभात मस्तपैकी फाफडा आणि जिलेबीची मेजवानी दिलीच पाहिजे. एवढीच आमची अत्यंत छोटीशी आणि गोड सूचना आहे.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

### ३५ लाख नोकऱ्या, स्पोर्ट्स सिटी, मेडिसिटी प्रकल्प

# दावोसमधून फडणवीसांची घोषणा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २१ :
जागतिक स्तरावर महाराष्ट्राची विश्व सार्हता पुन्हा एकदा सिद्ध झाली असून विदेशी गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे भारताचे खरे गेट वे ऑफ इंडिया आहे. महाराष्ट्रात गुंतवणुकीचा पाऊस पडेल, ३५ लाख नोकऱ्यांची संधी निर्माण होईल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वित्झर्लंडमधील दावोस येथे आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीत व्यक्त केला.



राज्यात सध्या तिसरी मुंबई उभी राहत असून या क्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक मिळण्याचे संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. सुमारे १० ते १२ वेगवेगळ्या क्षेत्रांतील उद्योगांशी सध्या समन्वय साधला जात आहे. नवी मुंबई विमानतळाजवळ एज्यु-सिटी, इनोव्हेशन सिटी, स्पोर्ट्स सिटी आणि मेडिसिटी यांसारखे प्रकल्प उभारले जात आहेत. गेल्या दशकात महाराष्ट्राने सातत्याने १० टक्क्यांहून अधिक विकासदर राखला आहे. याच गतीने काम करत राहिल्यास २०३२ ऐवजी २०३० पर्यंतच महाराष्ट्र १ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याचे उद्दिष्ट गाठू शकेल असा विश्वास फडणवीसांनी व्यक्त केला.

दावोसमध्ये आतापर्यंत एस.बी.जी. ग्रुप, सुरजागड इस्पात लि., सुमिटोमो रियालिटी अँड डेव्हलपमेंट, के.रहेजा कार्पोरेशन, अल्टा कॅपिटल, आय आय.आय.ए.एम.ग्लोबल, बी.एफ.एन.फोर्जिंग्ज, सोकी ग्रीन एनर्जी लिमिटेड या दीदीचा क्षेत्रातील कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक केली आहे.

## मुख्य आरोपी समीर गायकवाडचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

कॉ. गोविंद पानसरे हत्या प्रकरण



■ वृत्तसंस्था
सांगली, दि. २१ :
जेष्ठ पुरोगामी विचारवंत कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी आणि 'सनातन संस्थेचा' साधक समीर गायकवाड याचा आज सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला.

सांगलीतील शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान त्याने अखेरचा श्वास घेतला. चार वर्षांपासून तो जामीनावर बाहेर होता. गायकवाडच्या मृत्यूमुळे पानसरे हत्या प्रकरणाचा खटला आणि पुढील तपासासमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे.

समीर गायकवाड सांगलीतील विकास चौक परिसरात आपल्या कुटुंबासह वास्तव्यास होता. प्रकृती बिघडल्याने कुटुंबीयांनी त्याला तातडीने सांगलीच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्याने उपचारांना प्रतिसाद दिला नाही आणि मंगळवारी पहाटे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. हृदयविकाराने मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज असला, तरी शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे अधिकृत कारण स्पष्ट होईल.

ज्येष्ठ विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्ते कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्यावर १६ फेब्रुवारी २०१५ रोजी कोल्हापूरमध्ये सकाळी मॉर्निंग वॉकवरून परतत असताना अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला होता. या हल्ल्यात पानसरे गंभीर जखमी झाले होते, तर त्यांच्या पत्नी उमाताई पानसरे यांनाही दुखापत झाली होती. उपचारादरम्यान २० फेब्रुवारी २०१५ रोजी गोविंद पानसरे यांचे निधन झाले. पानसरे कुटुंबीयांच्या मागणीनंतर मुंबई उच्च न्यायालयाने २०२२ मध्ये हा तपास 'एटीएस'कडे सोपवला.

# मी कार्यकर्ता....ते माझे बॉस!

### नितीन नबीन भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष : मोदींनी पुष्पहार घालून केले स्वागत

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २१ :
भाजपचे १२ वे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नबीन यांची बिनविरोध निवड झाली आहे. मंगळवारी भाजप मुख्यालयात ही घोषणा करण्यात आली. पंतप्रधान मोदींनी त्यांचे पुष्पहार अर्पण करून स्वागत केले.



मोदी म्हणाले, भाजप हा असा पक्ष आहे जिथे लोकांना प्रश्न पडेल की मोदीजी इतक्या लहान वयात मुख्यमंत्री का झाले? ते सरकारचे प्रमुख झाले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मी भाजपचा कार्यकर्ता आहे. पण मला वाटते की नितीनजी माझे बॉस आहेत, मी एक कार्यकर्ता आहे.

यापूर्वी, नवीन यांनी दिल्लीतील भगवान वाल्मिकी मंदिर, गुरुद्वारा बांगला साहिब आणि झंडेवालन मंदिराला भेट दिली आणि पूजा केली. ४५ व्या वर्षी, नवीन पक्षाचे सर्वात तरुण राष्ट्रीय अध्यक्ष बनले आहेत. त्यांच्यापूर्वी अमित शहा यांची वयाच्या ४९ व्या वर्षी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. सोमवारी भाजप मुख्यालयात अध्यक्षपदासाठी निवडणूक झाली. इतर कोणत्याही उमेदवाराने अर्ज दाखल न केल्याने नबीन यांची बिनविरोध निवड झाली. १४ डिसेंबर रोजी कार्यवाहक अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

## भाजप कार्यकर्त्यांचा 'युती तोडा'चा नारा.. घोषणा होताच राडा

■ वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. २१ :
छत्रपती संभाजीनगरमध्ये आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर 'कीज हॉटेल' येथे भाजप आणि शिवसेनेच्या नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली असून, या बैठकीनंतर महायुतीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.

यापूर्वी महानगरपालिका निवडणुकीत तब्बल १२ बैठका होऊनही शेवटच्या क्षणी युती तुटली होती, ज्यामध्ये भाजपने मोठे यश मिळवले होते मात्र शिवसेनेला अपेक्षित यश मिळाले नव्हते. आता पुन्हा एकदा दोन्ही पक्षांनी एकत्रित निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला असला, तरी या घोषणेनंतर भाजप कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला.

भाजप नेते व मंत्री अतुल सावे, खासदार भागवत कराड, आमदार संजय केनेकर आणि शिवसेनेचे पालकमंत्री संजय शिरसाठ, खासदार संदिपान भुमरे, आमदार रमेश बोरणारे, आमदार संजना जाधव यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत महायुतीची अधिकृत घोषणा करण्यात आली.

मात्र या निर्णयामुळे वैजापूरमधील भाजप कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. युतीला कडाडून विरोध करत या कार्यकर्त्यांनी 'युती तोडा' अशी मागणी लावून धरली आणि थेट मंत्री अतुल सावे यांच्या गाडीला घेराव घालत जोरदार घोषणाबाजी केली. परिणामी, महायुतीमध्ये पुन्हा एकदा फाटल्याचे दिसून येत आहे.

# दिल्लीच्या दालनात मुंबईचा फैसला?

### महापौरपदासाठी महायुतीत जोरदार खल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :
मुंबई महापालिकेच्या महापौरपदासाठी सुरू असलेली रस्सीखेच आता थेट दिल्लीच्या दालनात पोहोचली आहे. वरवर पाहता ही लढाई एका पदाची असली, तरी वास्तवात ती सत्तेच्या सूत्रांवर आणि महापालिकेतील पुढील अडीच वर्षांच्या नियंत्रणावर आहे. पंचतारांकित हॉटेलमधील हालचाली, पडद्यामागील दबावतंत्र आणि केंद्रीय नेतृत्वाकडून येणारे संकेत, या सगळ्यामुळे मुंबईचा महापौर कोण होणार, हा प्रश्न अधिकच उत्कंठावर्धक झाला आहे.

मुंबईत निवडणूक जिंकून आलेल्या नगरसेवकांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवताच ‘हॉटेल पॉलिटिक्स’ची चर्चा रंगली. महापौरपदासाठी शिंदेंची आग्रही भूमिका, आणि दुसरीकडे सर्वाधिक जागा जिंकूनही बहुमतापासून थोडक्यात दूर राहिलेला भारतीय जनता पक्ष या संघर्षात आता दिल्लीत निर्णायक बैठक होत आहे.

भाजप नेत्यांच्या मते, शिंदेंनी जास्त जागांवर लढल्याने महायुतीच्या स्ट्राइक रेटवर परिणाम झाला. भाजपने अधिक जागा लढवल्या असत्या तर १०० चा आकडा सहज पार झाला असता, असा दावा पक्षांतर्गत चर्चेत ऐकू येतो. त्यातच हॉटेल पॉलिटिक्सबाबतही भाजपने केंद्रीय नेतृत्वाकडे नाराजी व्यक्त केल्याची माहिती सूत्रांकडून समोर येते.

या पार्श्वभूमीवर दिल्लीत होणारी बैठक निर्णायक मानली जात आहे. शिवसेनेकडून माजी खासदार राहुल शेवाळे, खासदार श्रीकांत शिंदे आणि श्रीरंग बारणे; तर भाजपकडून मुंबई अध्यक्ष अमित साटम आणि आमदार आशिष शेलार उपस्थित राहणार असल्याची माहिती आहे. या बैठकीत महापौरपदासोबतच स्थायी समिती, सुधार समिती, आरोग्य व शिक्षण समिती—म्हणजेच महापालिकेतील प्रत्यक्ष सत्ताकेंद्रांचा वाटपाचा हिशेब मांडला जाणार आहे.

**अडीच वर्षांचा फॉर्म्युला?**

सूत्रांच्या माहितीनुसार, शिंदे गटाकडून अडीच वर्षे महापौरपद आणि स्थायी तसेच बेस्ट समितीत योग्य वाटा मागितला जात असल्याची चर्चा आहे. दुसरीकडे, दिल्लीतील भाजप नेतृत्वाने राज्यातील नेत्यांना महापौर भाजपचाच असा स्पष्ट संदेश दिल्याची चर्चा आहे. हाच संदेश मित्रपक्षांपर्यंत पोहोचवण्याची सूचना देण्यात आल्याचे बोलले जाते.

## दोघांचा जीव चोचीत अडकला

भास्कर जाधव यांचा टोला



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २१ :
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी भाजपवर मित्र पक्षांना संपवण्याचा पुनरुच्चार केला आहे.

या प्रकरणी त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस व शिंदे गटाचा दाखला देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांचा जीव केवळ चोचीत अडकल्याचा दावा केला आहे. यावेळी त्यांनी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत आपण केवळ आपल्या तालुक्यात लक्ष देणार असल्याचे सांगत एकप्रकारे आपण आपल्या पक्षावर नाराज असल्याचेही संकेत दिलेत.

जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. भास्कर जाधव यांच्या नेतृत्वात आज गुहागर येथील ठाकरे गटाच्या १५ उमेदवारांचे अर्ज भरण्यात आले. यावेळी त्यांनी भाजप व सत्ताधारी महायुतीवर निशाणा साधला. भाजपकडून आतापर्यंत अनेक पक्ष फोडून झाले. आता त्यांनी भरमसाठ पैशांचा वापर करून निवडणुका जिंकण्याचा फंडा सुरू केला आहे, असे ते म्हणाले.

## देशाचे धन अंबानी-अदानींना



■ वृत्तसंस्था, रायबरेली, दि. २१ :
कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी रायबरेली दौऱ्यावर असताना मोदी सरकारवर टीकेची झोड उठवली. ते म्हणाल, नरेंद्र मोदी सर्व सत्ता आपल्या हातात घेऊन गरिबांना उपाशी मारू इच्छितात. मनरेगामधून गांधीजींचे नाव काढून त्यांचा अपमान केला आहे. पण मुख्य गोष्ट नाव बदलण्याची नाही. आमच्या गरीब जनतेला जी सुरक्षा दिली होती, ती मोदी सरकारने संपवली आहे.

एकीकडे आम्ही जनतेचे रक्षण करत आहोत, तर दुसरीकडे नरेंद्र मोदी देशाचे सर्व धन खेचून अंबानी आणि अदानी यांच्या हातात देत आहेत. कॉंग्रेस पक्ष देशभरात मनरेगा वाचवण्यासाठी आंदोलन करत आहे. आम्ही मजुरांच्या संरक्षणासाठी त्यांच्यासोबत खंबीरपणे उभे आहोत. राहुल यांनी मंगळवारी सकाळी कॉंग्रेस आणि सपा कार्यकर्त्यांची भेट घेतली, त्यानंतर रायबरेली प्रीमियर लीग टी-२० क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन केले.

# उपराजधानीत तीन कोटींची धाडसी घरफोडी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :
गर्भश्रीमंत पेट्रोल व्यावसायिकाकडे धाडसी घरफोडी करून अज्ञात चोराने हिरेजडीत दागिने आणि रोख ६५ लाख रुपये असा २ कोटी ९१ लाख ५० हजाराचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली.

बलजिंदरसिंग इंद्रजीतसिंग नय्यर (५६) असे या व्यावसायिकाचे नाव आहे. शिर्के ले आऊट, राजनगर येथे राहणारे नय्यर यांचा राजनगरात प्रशस्त बंगला असून शहरात अनेक ठिकाणी पेट्रोलपंप आहेत.

सोमवारी रात्री नय्यर यांच्या लहान मुलाच्या साक्षगंधाचा कार्यक्रम कळमेश्वर येथील रिसॉर्टमध्ये आयोजित केला होता. रात्री ८ च्या सुमारास नय्यर यांनी आपले घर कुलूपबंद केले आणि कुटुंबीय व नातेवाईकासह साक्षगंधाच्या कार्यक्रमाला गेले होते. मध्यरात्री अज्ञात चोराने स्वयंपाक खोलीला लावलेली लोखंडी खिडकीची जाळी कापली आणि आवारात प्रवेश केला.

चोरट्याने दार तोडून घरात प्रवेश केला. कपाटाच्या वर लॉकरची चावी होती. चोरट्याने लॉकर उघडले. लॉकरमध्ये २ कोटी ४७ लाखांचे अडिच किलो सोन्याचे दागिने, १ कोटीचे हिरेजडीत दागिने, रोख ६५ लाख रुपये असा तीन कोटीचा ऐवज चोरून चोरटा पसार झाला.

साक्षगंधाचा कार्यक्रम आटोपून नय्यर कुटुंबिय घरी आले असता ही घटना उघडकीस आली. लगेच सदर पोलिसांना ही माहिती देण्यात आली.

सहपोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अप्पर पोलिस आयुक्त (गुन्हे) वसंत परदेशी, पोलिस उपायुक्त राहुल माकणीकर, परिमंडख २ चे पोलिस उपायुक्त नित्यानंद झा, सदरचे ठाणेदार अमोल देशमुख आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. त्याचप्रमाणे श्वानपथक आणि ठसे तज्ज्ञांना देखील घटनास्थळी पाचारण करण्यात आले. पोलिसांनी आजूबाजूला असलेल्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता एक चोरटा त्या परिसरात फिरताना दिसून आला. याप्रकरणी सदर पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

## हॉटेलच्या कैदेतील नगरसेवक नाराज?



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :
मुंबई महापालिकेत सत्ता स्थापन करण्याच्या मुद्यावरून सत्ताधारी भाजप व शिंदे गटातील तिढा अद्याप सुटला नाही. त्यातच शिंदे गटाने आपल्या नवनिर्वाचित नगरसेवकांचे विजयाचे प्रमाणपत्र आपल्या ताब्यात घेतले आहे. यामुळे नाराज झालेल्या नगरसेवकांचे पाय हळूहळू वांद्रे स्थित पंचतारांकित हॉटेलमधून आपल्या मतदारसंघाच्या दिशेने वळत आहेत.

भाजपला आपल्याशिवाय महापौर बसवणे कठीण असल्याचे लक्षात येताच एकनाथ शिंदे यांनी आपल्या सर्व नगरसेवकांना मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये हलवले. त्यानंतर त्यांनी भाजपपुढे अडीच वर्षांच्या महापौरपदाचा प्रस्ताव ठेवला. भाजपने अद्याप शिंदेंच्या या प्रस्तावाला हिरवा कंदील दाखवला नाही. उलट मुंबईत आपलाच महापौर होणार असल्याचे ठणकावून सांगितले आहे.

या घटनाक्रमामुळे मुंबईतील सत्ता स्थापनेचा तिढा अजून काही दिवस लांबण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे गटाने फोडाफोडीच्या भीतीने आपल्या सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचे विजयाचे प्रमाणपत्र आपल्या ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, सत्ताधारी शिवसेनेने आपल्या सर्वच नगरसेवकांचे आधार कार्ड व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिलेले विजयाचे प्रमाणपत्र आपल्या ताब्यात घेतले आहे.

नगरसेवक निकाल लागल्याच्या दुसऱ्या दिवसापासूनच हॉटेलमध्ये वास्तव्यास आहेत. यामुळे त्यांना त्यांच्या समर्थकांसोबत आपल्या विजयाचा आनंदही साजरा करता आला नाही. तसेच आपल्या मतदारांची भेटही घेता आली नाही. यामुळे त्यांच्यात अस्वस्थता पसरली आहे.

# सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अन् शिंदे गट भाजपात विलीन?

### शिंदेंचे नेते ठाकरेंकडे परत जातील : मूळ शिवसेना अधिक ताकदवान होईल : ॲड. सरोदेंचा दावा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :
शिवसेना नाव व धनुष्यबाण या पक्षचिन्हावर उद्या सुप्रीम कोर्टात सुनावणी होणार आहे. वकील असीम सरोदे यांनी उद्याच्या सुनावणीत सुप्रीम कोर्टाने शिंदेंकडून पक्ष व पक्षचिन्ह काढून घेतले तर तर त्यांचे महत्त्व कमी होऊन उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील मूळ शिवसेना अधिक बलवान होणार असल्याचा दावा केला आहे.

विशेषतः शिवसेनेचे मॅटर सुप्रीम कोर्टात ३७ व्या क्रमांकावर असल्यामुळे ते सुनावणीसाठी रिच होणे कठीण असल्याचेही ते यावेळी म्हणालेत. त्यामुळे उद्या सुप्रीम कोर्टात या प्रकरणी सुनावणी होणार किंवा नाही याविषया साशंकता आहे.



शिवसेना पक्षाचे नाव व धनुष्यबाण या निवडणूक चिन्हावर उद्या सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी सुरू होणार आहे. या प्रकरणी सलग 2 दिवस युक्तिवाद ऐकून घेतले जाणार आहेत. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठ या महत्त्वपूर्ण प्रकरणावर सुनावणी घेणार आहे. नोव्हेंबरमध्ये झालेल्या सुनावणीवेळी न्यायालयाने उद्यापासून सुरू होणारी सुनावणी अंतिम असल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे आता हे प्रकरण लवकरच निकाली निघणार हे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर असीम सरोदे यांनी एका पोस्टद्वारे या खटल्यावर प्रकाश टाकला आहे.

असीम सरोदे म्हणाले, शिवसेना नाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह. सुनावणीची तारीख उद्या सुप्रीम कोर्टात आहे, पण ३७ नंबरचे मॅटर सुनावणीसाठी रिच होणे कठीण आहे. आता लोकांचा नवीन प्रश्न - जर एकनाथ शिंदेंकडून पक्ष चिन्ह व शिवसेना नाव काढून घेतले तर मुंबई महापालिकेत काय होईल? मला वाटते शिंदेसेना भाजपमध्ये विलीन होईल व एकनाथ शिंदे यांचे राजकीय महत्व एकदम कमी होईल. शिंदेसेनेतील अनेकजण उद्धव ठाकरेंकडे स्वगृही परत जातील व मूळ शिवसेना अधिक ताकदवान होईल.

## भाजपने मदत केली नसल्याने माझा पराभव : सरवणकर



■ **मुंबई :** मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत पराभवाची चव चाखावी लागलेल्या शिंदे गटाच्या समाधान सरवणकर यांनी भाजपवर थेट निशाणा साधला आहे. भाजपने मदत न केल्यामुळे माझा पराभव झाला. माझ्या विरोधात विरोधी २ पक्षांच्या पक्षप्रमुखांची मुले प्रचार करत होती. पण भाजपच्या एकाही नेत्याने मला मदत केली नाही. उलट माझा प्रचार करू नका असा अपप्रचार ते करत होते, असे सरवणकर यांनी म्हटले आहे.

समाधान सरवणकर हे शिंदे गटाचे बडे नेते तथा सिद्धिविनायक ट्रस्टचे अध्यक्ष सदा सरवणकर यांचे सुपुत्र आहेत. ते मुंबई महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १९४ मधून निवडणुकीच्या रिंगणात होते. ठाकरे गटाच्या निशिकांत शिंदे यांनी त्यांचा पराभव केला. त्यानंतर आता त्यांनी आपल्या पराभवासाठी भाजपला जबाबदार धरले आहे. ते म्हणाले, माज्या प्रभागात माज्या विरोधात ४-५ आमदार प्रचार करत होते. विरोधी बाकावरील २ पक्षांच्या पक्षप्रमुखांची मुले माज्या मतदारसंघात प्रचारात उतरली होती. त्यांचे मुख्य टार्गेट मी होतो. त्यानंतरही मतदार माझ्यासोबत उभे राहिले. पण माहीम विधानसभेत मला भाजपची कोणतीही मदत झाली नाही. भाजपचे विशिष्ट एक पदाधिकारी होते. त्यांनी सर्वांना सांगितले की, यांना मदत करू नका. आपल्याला काहीतरी आले असल्याचा मेसेज त्यांनी व्हॉट्सएपवरून व्हायरल केला. त्यामुळे आम्हाला माहीममध्ये कुणीही मदत केली नाही. व्हॉट्सएप चॅटमध्येही लिहिण्यात आले होते की, आपल्याला यांचे काम करायचे नाही. आपल्याला त्यांचा पराभव करायचा आहे, असे ते म्हणाले.

## मित्रपक्षांचे दबावतंत्र धुडकावत सत्तेची तयारी सुरू : दिल्लीतील बैठकीत मुहूर्त ठरला


# मुंबईत होणार भाजपचाच महापौर

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २० :**

देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका असलेल्या मुंबई महापालिकेच्या सत्तेचा सस्पेन्स आता संपला असून, भारतीय जनता पक्षाने आपला 'राज्याभिषेक' करण्याचा मुहूर्त निश्चित केला आहे.

येत्या ३० जानेवारीला मुंबई महानगरपालिकेत भाजपचा महापौर कारभाराची सूत्रे हातात घेणार असल्याची माहिती दिल्लीतील सूत्रांकडून मिळत आहे. या निर्णयामुळे गेल्या अनेक दशकांपासूनची मुंबईवर सत्ता गाजवण्याची भाजपची प्रतीक्षा आता संपुष्टात येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

भाजपचे नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी मंगळवारी अधिकृतपणे आपला पदभार स्वीकारला आहे. या



सोहळ्यासाठी मुंबई आणि राज्यातील भाजपचे दिग्गज नेते सध्या दिल्लीत पोहोचले आहेत.

याच नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत मुंबईच्या महापौरपदाबाबत अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आले. नितीन नबीन यांच्या कार्यकाळाची सुरुवात मुंबईसारख्या प्रतिष्ठेच्या महापालिकेवरील विजयाने व्हावी, अशी रणनीती पक्षश्रेष्ठींनी आखली आहे.

मुंबईच्या महापौरपदासाठी पक्षाने खूप वाट पाहिली आहे, आता कोणत्याही परिस्थितीत तडजोड केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश दिल्लीहून देवेंद्र फडणवीस यांना आधीच देण्यात आला होता.

### संख्याबळाचे गणित आणि महायुतीचा पेच

मुंबई महापालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भाजप ८९ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मात्र, बहुमताचा ११४ हा आकडा गाठण्यासाठी भाजपला मित्रपक्ष असलेल्या शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांच्या २९ नगरसेवकांच्या पाठिंब्याची नितांत गरज आहे. भाजप आणि शिंदे गटाचे मिळून एकूण ११८ नगरसेवक होत असल्याने महायुतीकडे स्पष्ट बहुमत आहे. परंतु, हीच संधी साधून शिंदे गटाने भाजपवर दबाव टाकण्यास सुरुवात केली होती.

मित्रपक्षांना योग्य त्या सन्मानाने सोबत घ्या, पण महापौरपदावर दावा सोडू नका, असे कडक निर्देश हायकमांडने दिले होते.

**३० जानेवारीला ऐतिहासिक 'राज्यारोहण'**

दिल्लीतील भाजप नेत्यांच्या गोटातून मिळालेल्या माहितीनुसार, ३० जानेवारी रोजी भाजप आपला महापौर बसवून मुंबई महापालिकेच्या इतिहासात नवे पर्व सुरू करणार आहे.

या दिवशी केवळ महापौरच नव्हे, तर गटनेत्यांची निवड आणि इतर वैधानिक समित्यांबाबतही भाजप आपले वर्चस्व सिद्ध करेल.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे यांनी भाजपकडे पहिल्या अडीच वर्षांसाठी मुंबईचे महापौरपद आणि पालिकेच्या तिजोरीची चावी मानल्या जाणाऱ्या 'स्थायी समिती'सह 'बेस्ट समिती'त मोठा वाटा मागितला होता. मात्र, भाजपच्या दिल्लीतील नेतृत्वाने हे 'प्रेशर पॉलिटिक्स' पूर्णपणे झिडकारल्याचे दिसत आहे.

## काँगेसने मुस्लिम मतांवर मक्तेदारी समजू नये

### प्रकाश आंबेडकरांचा काँग्रेसवर हल्ला



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २० :**

मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीसोबत युती करत मोठ्या अपेक्षा बाळगल्या होत्या. मात्र निकालानंतर केवळ २४ जागांवर समाधान मानावं लागल्याने काँग्रेसच्या रणनीतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केलेलं एक वक्तव्य सध्या राजकीय वतुर्ळात चांगलंच चर्चेत आलं आहे. काँग्रेसने मुस्लिम मतांकडे पाहण्याची भूमिका बदलली नाही, तर भविष्यात नुकसान अटळ असल्याचा थेट इशारा त्यांनी दिला आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितलं की, मुंबईत वारंवार काँग्रेसच्या नेत्यांना आम्ही सूचना दिल्या होत्या. मुस्लिम मतं ही आपली ह्यजहागीरह्ण असल्यासारखी वागणूक देऊ नका, असं आम्ही सांगत होतो. मात्र काँग्रेसने आमचं म्हणणं गांभीयार्ने घेतलं नाही. निवडणूक निकालानंतर वास्तव समोर आलं असून, मुस्लिम मतदारांनी काँग्रेसची साथ सोडल्याचं स्पष्ट झालं आहे. दुसरीकडे हिंदू मतदार आधीच काँग्रेसपासून दुरावलेला आहे, असंही आंबेडकरांनी नमूद केलं.

काँग्रेसच्या नगरसेवकांच्या विजयावर भाष्य करताना आंबेडकरांनी एक महत्त्वाचा दावा केला. काँग्रेसचे जे नगरसेवक निवडून आले आहेत, ते पक्षाच्या बळावर नाहीत, तर त्यांच्या वैयक्तिक ताकदीवर, कामावर आणि प्रतिभेवर निवडून आले आहेत, असं सांगत त्यांनी अप्रत्यक्षपणे काँग्रेसच्या संघटनात्मक ताकदीवर प्रश्न उपस्थित केला. युती असूनही काँग्रेसने वंचितचा पुरेसा उपयोग करून घेतला नाही, असा आरोपही त्यांनी केला.

मुंबईपुरताच नाही, तर छत्रपती संभाजीनगरमध्ये काँग्रेसची अवस्था अधिकच बिकट झाल्याचं चित्र असल्याचं आंबेडकरांनी स्पष्ट केलं. त्यांनी सांगितलं की, आम्ही वारंवार काँग्रेसला सांगत होतो की एक मोठी संयुक्त सभा घ्या. अशा सभेमुळे जनतेपर्यंत एक सकारात्मक संदेश गेला असता आणि आघाडीला मोठा फायदा झाला असता. मात्र काँग्रेसने आमचं काहीच ऐकलं नाही. याचा परिणाम म्हणजे छत्रपती संभाजीनगर महापालिकेत काँग्रेसला केवळ एकाच जागेवर समाधान मानावं लागलं.

प्रकाश आंबेडकरांनी यावेळी एक महत्त्वाचं राजकीय गणित मांडलं. त्यांच्या मते, जर छत्रपती संभाजीनगरमध्ये काँग्रेस आणि वंचित एकत्र आले असते, तर जवळपास ४० ते ४२ जागा निवडून आल्या असत्या. त्यातील १९ ते २० नगरसेवक वंचितचे आणि उर्वरित काँग्रेसचे असते. अशा परिस्थितीत एमआयएमला तगडी टक्कर मिळाली असती आणि भाजपलाही एवढी मोठी मुसंडी मारता आली नसती. मात्र काँग्रेसने ज्या जागांसाठी वंचितसोबत वाद घातला, तिथेच त्यांची अवस्था अत्यंत खराब झाल्याचं आंबेडकरांनी ठामपणे सांगितलं.

दरम्यान, आगामी ५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकांबाबतही प्रकाश आंबेडकरांनी मोठं विधान केलं आहे. वंचित बहुजन आघाडी या निवडणुका व्यापक स्तरावर लढणार असून, काँग्रेस आमच्यासोबत असेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. करारानुसार दोन्ही पक्षांनी एकत्र निवडणूक लढवावी, असं त्यांचं मत आहे.

## दिव्यांग तथा वरिष्ठ नागरिकांना दर्शनाची सुविधा उपलब्ध करून द्या



■ **जालना :** वेरूळ येथील जोतिलिंग घृष्णेश्वर हे भारतातील बारा ज्योतिलिंर्गात असून येथे पूर्ण देश तथा विदेशातून भाविक दर्शनांसाठी येतात. येथे आलेल्या दिव्यांग भाविक तथा वरिष्ठ आणि अतिवरिष्ठ नागरिक यांना दर्शनाची वेगळी व्यवस्था नाही. हि व्यवस्था सहसा प्रत्येक मोठ्या मंदिरात असते. तसेच पासेसची पण सुविधा नाही. तरी ही व्यवस्था करण्यात यावी. अशी मागणी भाविकांनी केली आहे. याबद्दल येथील व्यवस्थापकीय विश्वस्त श्री योगेश टोपरे यांनी बोलतांना सांगितले की हे मंदिर अवार्चीन असून भारतीय पुरातत्व विभाग तर्फे संरक्षित आहे. येथे वेगवेगळ्या दरवाज्याची व्यवस्था नाही. यामुळे दिव्यांग, वरिष्ठ तथा अतिवरिष्ठ भाविकांना वेगळी व्यवस्था नाही. तरी पुढे विचार करू, असे आश्वासन दिले.

## सोडत की सत्तेची सट्टेबाजी?

### एसटी आरक्षण पडल्यास भाजप-शिवसेनेचा दावा धोक्यात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**

मुंबई महापौरपदासाठीची सोडत केवळ एक प्रशासकीय प्रक्रिया राहिलेली नाही, तर ती सत्तेच्या भवितव्याचा कस लावणारी राजकीय कसोटी ठरू पाहते आहे. गुरुवारी मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात सकाळी ११ वाजता २९ महानगरपालिकांच्या महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत काढली जाणार आहे. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या प्रक्रियेवर राज्याचे लक्ष केंद्रीत झाले आहे.

जर मुंबई महापौरपदाचे आरक्षण अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात गेले, तर सत्तेच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या भाजपझ्रशिवसेना महायुतीला सत्तेचा मुकुट असूनही महापौरपद गमवावे लागू शकते. आणि दुसरीकडे, सत्तेपासून दूर ढकलले गेलेले उद्धव ठाकरे यांच्यासाठी अचानक राजकीय संधीचे दरवाजे उघडू शकतात.

महानगरपालिकेच्या विद्यमान आकडेमोडीनुसार, भाजप-शिवसेना महायुतीकडे एसटी प्रवगार्तील एकही निवडून आलेला नगरसेवक नाही. उलट, एसटीसाठी आरक्षित असलेल्या प्रभाग क्रमांक ५३ आणि १२१ मधून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे जितेंद्र वळवी आणि प्रियदर्शनी ठाकरे निवडून आले आहेत. म्हणजेच, एसटी आरक्षण पडल्यास ठाकरे गटाचा उमेदवार महापौरपदासाठी बिनविरोध निवडून येण्याची शक्यता नाकारता येत नाही. याच शक्यतेमुळे राजकीय वतुर्ळात कुजबुज वाढली आहे. सत्ता आपल्याकडे, पण महापौर खुर्ची दुसऱ्याच्याच अंगणात? असा प्रश्न महायुतीच्या गोटात अस्वस्थता निर्माण करतो आहे.

यावेळी महापौर आरक्षण चक्राकार पद्धतीने काढले जाणार आहे. सुरुवातीला खुला प्रवर्ग निश्चित होईल आणि त्यानंतर पुढील आरक्षणे ठरतील. त्यामुळे यंदा तात्काळ एसटी आरक्षण पडण्याची शक्यता कमी असल्याचा दावा महायुतीकडून केला जात आहे. एससी किंवा ओबीसी प्रवर्गाचे आरक्षण पडल्यास मात्र राजकीय घोळ निर्माण होण्याची शक्यता कमी आहे. भाजप-शिवसेना महायुती, ठाकरे गट, मनसे आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) – सर्वच आघाड्यांकडे या प्रवगार्तील नगरसेवकांची संख्या बऱ्यापैकी आहे. त्यामुळे इथे सत्तेच्या गणितात फारसा धक्का बसणार नाही. अनुसूचित जाती प्रवर्गातील ठळक नगरसेवकांची मदार प्रामुख्याने ठाकरे गटावरच आहे, ही वस्तुस्थिती त्यांच्या राजकीय आत्मविश्वासाला बळ देणारी ठरते आहे.

## ठाकरे बंधूंचे एकत्र रणशिंग!

### बाळासाहेबांच्या जयंतीनिमित्त २३ जानेवारीला एकाच व्यासपीठावर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात जणू शांतता नांदत असल्याचा भास होत असतानाच, ठाकरे घराण्यातून पुन्हा एकदा सत्ताकारणाची तोफ धडाडण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत. निमित्त आहे बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे आणि केंद्रस्थानी आहेत,उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे.

महापालिका निवडणूक निकालानंतर पहिल्यांदाच ठाकरे बंधू एकाच कार्यक्रमात, एकाच व्यासपीठावर दिसणार आहेत. २३ जानेवारी रोजी मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात हा विशेष सोहळा रंगणार असून, याची चर्चा सध्या राज्याच्या राजकीय वतुर्ळात वणव्यासारखी पसरली आहे.

हा कार्यक्रम केवळ स्मृतिदिनापुरता मर्यादित नाही. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात येणारा हा विशेष सोहळा ठाकरे गटाची शिवसेना आणि मनसे संयुक्तपणे करणार आहेत. हीच बाब या कार्यक्रमाला वेगळं वजन देणारी ठरते आहे.

खासदार संजय राऊत यांनी या कार्यक्रमाची माहिती देताना स्पष्ट संकेत दिले. हा कार्यक्रम केवळ आठवणींचा नाही, तर विचारांचा आहे. मात्र राजकारणात विचार म्हणजेच दिशाह्वअसते, हे वेगळं सांगायला नको.

आता निवडणुका संपल्या, निकाल लागले, पण ठाकरे बंधूंचं एकत्र येणं थांबलेलं नाही. उलट अधिक ठळक होत चाललं आहे. आणि यामुळेच राजकीय विश्लेषकांच्या भुवया उंचावल्या आहेत.



बाळासाहेब ठाकरे यांची जयंती हा जरी भावनिक विषय असला, तरी या एकत्र येण्यामागे राजकीय रणनीती नसतील, असं मानणं भोळेपणाचं ठरेल. मुंबई महापालिकेपासून ते राज्याच्या सत्तेपर्यंत ठाकरे बंधूंचं एकत्र येणं म्हणजे सत्ताधाऱ्यांसाठी धोक्याची घंटा आहे. विशेषतः मराठी मतदार, मुंबईतील अस्मितेचा मुद्दा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सत्ता यावर दोघांची संयुक्त भूमिका काय असणार, याकडे सध्या सा?यांचे लक्ष लागले आहे.

षण्मुखानंद सभागृहात होणा?या या कार्यक्रमात नेमकं काय घडणार? फक्त आठवणींना उजाळा दिला जाणार, की भविष्यातील राजकीय वाटचालीची दिशा ठरवली जाणार? एकत्र व्यासपीठ म्हणजे केवळ योगायोग, की नव्या राजकीय आघाडीची नांदी? हे प्रश्न आज अनुत्तरित असले, तरी एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे २३ जानेवारीनंतर महाराष्ट्राचं राजकारण पूर्वीसारखं राहणार नाही. कारण जेव्हा ठाकरे बंधू एकत्र येतात, तेव्हा केवळ भाषण होत नाही, तेव्हा राजकारण हादरतं.

## 'कात्रजचा घाट' दाखवला



■ **पुणे :** जर पवार फॅमिली महाराष्ट्रात कुठेही जाऊन उभे राहत असेल तर मी कुठेही उभे राहू शकतो. बारामतीच्या जनतेने आग्रह केल्यास बारामती विधानसभा निवडणूक लढणार, असे विधान ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केले आहे. जिल्हा परिषदेच्या निवडणुका दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार असल्याचे बोलले जात असतानाच लक्ष्मण हाके यांनी पवारांच्या विरोधात बारामती विकास आघाडी स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

लक्ष्मण हाके म्हणाले, गेले कित्येक वर्ष बारामतीतली सत्ता पवारांच्या हातात असताना देखील तालुक्याच्या जिरायती भागात अद्याप देखील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील त्यांना सोडवता आला नाही. पवारांना आता सर्व लोकांनी ओळखलेय त्यामुळे पुणे, पिंपरी चिंचवड सह सर्व महानगरपालिकातून पवार जवळपास सत्तेबाहेर झालेत. अजित पवार पहाटे उठून पुणे आणि पिंपरी चिंचवड आणि बारामती मध्येच का जातात बाकी कडे का जात नाहीत, असा सवाल हाके यांनी केला आहे.

तसेच अजित पवार पहाटे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून सांगली महापालिकेत, परभणीच्या महापालिकेत, चंद्रपूरच्या महापालिकेत पहाटे जाऊन विकास विकास बघितला आहे का? असाही प्रश्न लक्ष्मण हाके यांनी उपस्थित केला आहे. पिंपरी चिंचवड, पुणे महापालिका यांनीई जहागीर समजली होती, त्या लोकांनी यांना कात्रजचा घाट दाखवला, अशी टीका हाके यांनी केली.

## मेट्रोच्या पुलाखाली धावत्या बसला आग

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २० :**

मुंबईची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या पश्चिम द्रुतगती महामार्गावर आज सकळी एका बसला आज भयंकर आग लागली. सुदैवाने या घटनेत कुणीही जखमी झाले नाही. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यात बसमधून निघणारे आगीचे लोळ वर मेट्रोच्या रुळापर्यंत पोहोचत असल्याचे दिसून येत आहे.

मालाड पूर्व येथील कुरार व्हिलेज परिसरात मेट्रो लाईन - ७ च्या (रेड लाईन) पुलाखाली आज सकाळी एका धावत्या बसला आग लागली. अपघातग्रस्त बस मालाडच्या दिशेने जात होती. रस्त्यात तिच्या इंजिनमधून अचानक धूर येऊ लागला.

त्यानंतर काही क्षणांतच बसने पेट



घेतला. बसला आग लागल्याचे लक्षात येताच चालक व वाहकाने तातडीने बसमधील प्रवाशांना तत्काळ खाली उतरवले. त्यानंतर संपूर्ण बस आगीच्या विळख्यात सापडली आणि भस्मसात झाली. आगीचे लोळ वर मेट्रो पुलापर्यंत जात होते.

या आगीमुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावरील बोरिवलीकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. महामार्गावर लांबच लांब वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. आगीचे लोळ मेट्रो रुळांच्या अगदी जवळ पोहोचत होते. त्यामुळे मेट्रो प्रशासनाने खबरदारी म्हणून या मार्गावरून जाणारी मेट्रो सुरक्षित अंतरावर थांबवली होती. त्यामुळे कार्यालयाच्या दिशेने निघालेल्या चाकरमान्यांची चांगलीच गैरसोय झाली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या २ बंबांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसही तत्काळ तिथे पोहोचले.

अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम केले. पण तोपर्यंत बस पूर्णतः आगीत भस्मसात झाली होती. या आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. पण ती शॉर्ट सर्किटमुळे लागली असावी असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

## महापौराच्या खुर्चीपेक्षा समित्यांची सत्ता मोठी!

मुंबई महानगर पालिकेतील निकालानंतर सध्या सर्वाधिक चर्चा आहे ती महापौर कोण होणार, याची. मात्र राजकीय जाणकार सांगतात..मुंबईच्या सत्तेचा किल्ला हा केवळ महापौराच्या दालनात नसून, तो समित्यांच्या बैठकीत आणि अध्यक्षपदांच्या निवडीत दडलेला आहे. कारण देशातील सर्वात श्रीमंत महापालिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई महानगरपालिका मध्ये खरा कारभार समित्यांमधूनच चालतो.

**मानाचा मुकुट पण...**

**आरक्षणाचे राजकारण**

मुंबई महानगरपालिकेचे महापौर पद हे शहराच्या पहिल्या नागरिकाचे मानाचे असले, तरी त्यामागे असलेले राजकारण अधिक गुंतागुंतीचे आहे. महापौर पदासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, महिला किंवा खुला प्रवर्ग अशा प्रकारे आरक्षण लागू केले जाते. हे आरक्षण चक्राकार पद्धतीने बदलत असल्यामुळे, बहुमत असलेल्या पक्षालाही अनेकदा आपल्या पसंतीचा उमेदवार बसवता येईलच, याची खात्री देता येत नाही. त्यामुळेच महापौर निवडीआधी आरक्षणाचा निर्णय राजकीयदृष्ट्या अत्यंत निर्णायक ठरतो.

**दीपक कैतके**
**मुंबई.**

महापौर जरी सभागृहाचे नेतृत्व करत असले, तरी प्रशासकीय आणि आर्थिक नियंत्रण समित्यांकडे असते. म्हणूनच प्रत्येक पक्षाचा जीव अडकतो तो समित्यांच्या रचनेत.

**स्थायी समिती : आर्थिक किल्ला**

महापालिकेचा हजारो कोटींचा अर्थसंकल्प, कंत्राटे, विकासकामांचा खर्च, हे सर्व स्थायी समितीच्या निर्णयावर अवलंबून असते. २७ सदस्यांची ही समिती म्हणजे सत्तेचा केंद्रबिंदू. ज्याच्याकडे स्थायी समिती, त्याच्याकडे पालिकेची सूत्रे–असा अलिखित राजकीय नियमच आहे.

**सुधार समिती**

रस्ते, वाहतूक, नागरी सुविधा यांचे निर्णय येथे घेतले जातात. मतदार संघातील विकासकामांचे श्रेय मिळवण्यासाठी ही समिती राजकीयदृष्ट्या महत्त्वाची ठरते.

**सार्वजनिक आरोग्य समिती**

महापालिकेची रुग्णालये, आरोग्य सेवा, साथीचे आजार, या विषयांवर थेट निर्णय घेणारी ही समिती संकटाच्या काळात सत्ताधाऱ्यांची कसोटी पाहते.

**शिक्षण समिती**

महापालिकेच्या शाळा, शिक्षक भरती आणि शिक्षणाचा दर्जा या माध्यमातून गरीब व मध्यमवर्गीय मतदारांवर प्रभाव टाकण्याची मोठी संधी या समितीत असते.

**बेस्ट समिती**

मुंबईची सार्वजनिक वाहतूक, भाडेवाढ, कामगार प्रश्न यामुळे ही समिती कायमच राजकीय चर्चेत राहते.

**निवड प्रक्रिया : बहुमताचे गणित**

महापौराची निवड सभागृहातील सर्व नगरसेवकांच्या मतदानातून होते. आरक्षणानुसार पात्र उमेदवारांमधून बहुमताच्या जोरावर महापौर निवडला जातो.

समित्यांचे अध्यक्ष हे त्या त्या समितीतील सदस्यांमधून निवडले जातात आणि येथेही सत्ताधारी पक्षाचा वरचष्मा निर्णायक ठरतो. समिती सदस्यांची नियुक्ती सभागृहातील संख्याबळावर होते–विरोधकांना प्रतिनिधित्व मिळते, पण नियंत्रण सत्ताधाऱ्यांकडेच राहते.

**खुर्चीपेक्षा नियंत्रण महत्त्वाचे**

मुंबई महानगरपालिकेच्या राजकारणात महापौर पद हे प्रतिष्ठेचे प्रतीक असले, तरी स्थायी समितीसह महत्त्वाच्या समित्यांवरील नियंत्रण म्हणजेच खरी सत्ता मानली जाते. त्यामुळे येत्या काळात महापौर कोण होणार, याइतकीच उत्सुकता कोणत्या पक्षाकडे कोणती समिती जाणार, याकडे राजकीय वतुर्ळाचे लक्ष लागले आहे. कारण मुंबईच्या सत्तेची दिशा सभागृहात नव्हे, तर समित्यांच्या टेबलावर ठरते.

# थांबू नका, चित्रपट बनवत रहा, यश नक्की मिळेल..

### डॅन वॉलमन यांचा नव्या दिग्दर्शकांना सल्ला

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २० :**

इस्त्रायलचे प्रसिद्ध दिग्दर्शक डॅन वॉलमन यांनी नव्या स्वतंत्र चित्रपट दिग्दर्शकांना महत्त्वाचा सल्ला दिला आहे. पुणे चित्रपट महोत्सवा (पिफ) दरम्यान, त्यांनी 'कमी संसाधनांतून सर्जनशीलतेकडे - नव्या स्वतंत्र दिग्दर्शकांना सल्ला' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल उपस्थित होते.

वॉलमन यांनी दिग्दर्शकांना सातत्याने चित्रपट निर्मिती करत राहण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, आपल्याला हवी तशी परिस्थिती तयार होईल, तेव्हा चित्रपट तयार करू, असा विचार करत बसू नका. कायम काम करत रहा आणि चित्रपट तयार करत रहा. यश नक्की मिळेल.

कमी खर्चात चित्रपट बनवण्यासाठी त्यांनी काही व्यावहारिक सूचना दिल्या. ₹कमी खर्चाच्या कथा निवडा. अशा कथा निवडा ज्यात लोकेशन आणि अभिनेत्यांवर जास्त खर्च होणार नाही. तसेच, चित्रपट करण्यापूर्वी कालावधीचा विचार करा, असे ते म्हणाले.

सध्या जगात युद्ध, हिंसा आणि द्वेष सुरू असल्याने निराशा येऊ शकते, असे वॉलमन यांनी नमूद केले. मात्र, यातून निराश न होता, स्वतःला जिवंत ठेवण्यासाठी सतत चित्रपट तयार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. संसाधनांची कमतरता असलेल्या, पण चित्रपट बनवू इच्छिणाऱ्यांसाठी त्यांनी बायबलमधील दोन शिकाऱ्यांचे उदाहरण




दिले. थांबू नका, कमी लोकांमध्ये काम करा. मी सहाय्यक ठेवत नाही, त्यामुळे काम जलद होते आणि खर्च कमी होतो. मी प्रसिद्ध नटांपेक्षा चांगले अभिनेते घेतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

न्यूयॉर्कमध्ये १९६० च्या दशकात फिल्म मेकिंग शिकत असताना सुरू असलेल्या अंडरग्राउंड फिल्म चळवळीचा उल्लेख करत वॉलमन म्हणाले, की स्वतंत्र चित्रपट दिग्दर्शकांनी न्यूयॉर्कच्या अंडरग्राउंड फिल्म चळवळीसारखे प्रयत्न केले पाहिजेत. त्यातून मोठ्या चित्रपटगृहात चित्रपट दाखवण्याऐवजी छोट्या छोट्या ठिकाणी चित्रपट दाखवता येतील. एआय बद्दलच्या एका प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, की एआयचा वापर कसा करावा याचा विचार करावा लागेल. त्याचा सर्रास वापर करण्यामध्ये खूप तोटे आहेत.

# अकोल्यात वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सवाचे आयोजन

**अकोला :** सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने प्रमिलाताई ओक हॉल, अकोला या ठिकाणी दि. २१आणि २२जानेवारी २०२६ रोजी साय ६:३० वा. सांस्कृतिक कार्यक्रम वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सवचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दिनांक २१ रोजी सायंकाळी ६:३० वाजता प्रसिद्ध बंजारा नृत्य सादर होणार असून सादरकर्ता कला संघ हा बार्शीटाकळी तालुक्यातील साखरविरा या गावातील ललिता जाधव आणि कलावंत सादर करणार आहेत. गुरुवार दि. २२ जानेवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजता.महाराष्ट्राची लोककला वासुदेव ,गौधळ,भारुड कलापथक खंडीगमत इत्यादी लोककलेचे प्रकार होणार आहेत. सादरकर्ते - शाहिर विशाल ना.राखोंडे व लोककवी सागर राखोंडे संच, साने गुरुजी कला व सांस्कृतिक क्रीडा बहु.मंडळ,पातुर व स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठान,पातुर या कार्यक्रमात एकूण १५ कलावंत सहभागी होणार आहे.या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली तसेच विभागाचे संचालक विभीषण चवरे यांच्या नियोजनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम निःशुल्क असून या कार्यक्रमाच्या माध्यमातून वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सव हा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम होणार असून याचा जास्तीत जास्त प्रेक्षकांनी आस्वाद घ्यावा, असे आवाहन श्री विभीषण चवरे ,संचालक सांस्कृतिक कार्य यांनी केले आहे.

# मातोश्री पानंद व बळीराजा शेत रस्त्यांची कामे प्राधान्याने पूर्ण करावी : जिल्हाधिकारी



■अकोला,दि.२० (प्रतिनिधी)■

ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी मग्रारोहयो योजना महत्त्वाची संधी असून विहित वेळेत गुणवत्ता पूर्ण कामे पूर्ण करावी. शेतकऱ्यांना थेट शेतापर्यंत पोहचण्यासाठी मातोश्री पानंद रस्ते व मुख्यमंत्री बळीराजा शेत रस्त्यांची कामे आराखड्यानुसार प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेत जिल्हाधिकारी कार्यालय येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा आढावा घेण्यात आला.यावेळी जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र

### महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा आढावा

मालठाणे,उपजिल्हाधिकारी(रोहयो) विजय पाटील, उपजिल्हाधिकारी निखिल खेमनार, सार्वजनिक बांधकाम कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील,जिल्ह्यातील तहसीलदार गटविकास अधिकारी, संबंधित यंत्रणा विभाग प्रमुख आदी उपस्थित होते

ग्रामीण भागातील शेतकरी व मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मनरेगा योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.मजुरांना वेळेत मजुरी कामांची अद्ययावत नोंद,आधार प्रमाणीकरण,इ केवायसी बाबत त्वरित कारवाई करावी. ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करीत योजनांचा लाभ थेट गरजू घटकांपर्यंत पोहोचविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी दिले. श्रीमती मीना म्हणाल्या की,नरेगाच्या माध्यम ातून जिल्हा परिषद शाळांच्या आवारभिंती व प्रसाधनगृह बांधकामांची गुणवत्तापूर्ण कामे करावी.तहसीलदार, गटविकास अधिकारी यांनी कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन तपासणी करावी.

ग्रामसभेच्या माध्यमातून महत्वपूर्ण काम ाबाबत आराखडे तयार करावे जेणेकरून ग्राम विकासाला अधिक चालना मिळेल.

## अवैध पेट्रोल वाहतुकीवर धड़क कारवाई

**अकोला :** १९ जानेवारी रोजी सकाळी मिळालेल्या खात्रीशीर गोपनीय माहितीनुसार स.पो.नि. रविंद्र लांडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन चान्नी यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, ग्राम देऊळगाव साकर्शा येथून ग्राम उमरा दिशेने दोन इसम एका मोटारसायकलवर निळ्या रंगाच्या प्लास्टिक कॅनमध्ये ज्वलनशील पेट्रोल घेऊन अवैध विक्रीच्या उद्देशाने येत आहेत. सकाळी सुमारे १० वाजता संशयित मोटारसायकल थांबवून चौकशी केली असता आरोपींकडे पेट्रोल वाहतूक अथवा विक्रीसाठी कोणताही वैध परवाना आढळून आला नाही. समाधानकारक उत्तर न देता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

# मुर्तिजापुर येथे उघड्या विहिरीचा बळी

## पाच बहिणींनंतरचा एकुलता एक मुलगा गेला



■अकोला,दि.२० (प्रतिनिधी)■

अकोल्याच्या मूर्तिजापूर शहरातील जुनी वस्ती परिसरातील प्रजापती लेआउट येथे सोमवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घडलेल्या भीषण घटनेने तालुका हादरून गेला. पतंग पकडण्याच्या नादात १० वर्षीय शेख उमेर शेख फकीरा हा चिमुकला कटघरे नसलेल्या, रस्त्यालगत व जमिनीच्या लेवलवर असलेल्या अत्यंत धोकादायक उघड्या विहिरीत पडून मृत्युमुखी पडला. भरवस्तीत असलेली ही मोकाट जमीन व विहीर वर्षानुवर्षे धोक्याची घंटा ठरली असतानाही मालक व प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप संतप्त नागरिक करत आहेत. सुमारे ६५ फूट खोल व पाण्याने भरलेल्या विहिरी मुळे स्थानिकांचे बचाव प्रयत्न अपयशी ठरले. अखेर पिंजर येथील मानव सेवा आपत्कालीन पथकाचे जीव रक्षक दीपक सदाफळे व त्यांच्या टीमने तब्बल एक तास जीवाची बाजी लावत मृतदेह बाहेर काढला.

विशेष म्हणजे उमेर हा पाच बहिणींनंतर मन्नतीने मिळालेला पालकांचा एकुलता एक मुलगा होता. याच विहिरीत यापूर्वी जनावरे व एक महिला पडल्याच्या घटना घडूनही कारवाई न झाल्याने प्रशासनावर तीव्र संताप व्यक्त होत असून आणखी किती बळी? असा थेट सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

## हुंडीवाले हत्याकांड प्रकरणाचा निकाल आज

### ॲड. उज्वल निकम यांची विशेष उपस्थिती

■अकोला,दि.२० (प्रतिनिधी)■

महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष किसनराव हुंडीवाले यांच्या हत्येप्रकरणी सुरु असलेल्या खटल्याचा निकाल बुधवार २१ जानेवारीला दिला जाणार आहे, या खटल्याच्या सुनावणीत महत्वाची भूमिका बजावणारे विशेष सरकारी वकील ॲड . उजवल निकम यावेळी उपस्थित राहणार आहेत .येथील मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी बी. कचरे यांच्या न्यायालयात ही सुनावणी होणार आहे . या हत्या प्रकरणात एकूण १५ पैकी दीपाली गावंडे, नम्रता गावंडे, प्रवीण गावंडे आणि बार्शिटाकळी येथील मोहमंद शेख साबीर यासेवानिवृत्त पोलिस अधिकारी श्रीराम गावंडे, त्यांचा मुलगा विक्रम गावंडेसह ११ जण या प्रकरणात आरोपी आहेत.४ आरोपीविषयी न्यायालयात ठोस पुरावे नाहीत. त्यामुळे त्यांना या प्रकरणातून दोषमुक्त करावे, अशी विनंती त्यांनी न्यायालयास केली होती. मात्र श्रीराम गावंडेसह अन्य ११ आरोपींना शिक्षा व्हावी, अशी मागणी विशेष सरकारी अभियोक्ता उज्वल निकम यांनी केली आहे .

# तळेगाव बाजार येथील विलासराव जनार्दन खारोडे यांच्या केळीची इराणला निर्यात

■तळेगांव बाजार,दि.२० (प्रतिनिधी)■

दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी तेल्हारा तालुक्यामध्ये तळेगाव बाजार येथील सदन कास्तकार श्री. विलासराव जनार्दन खारोडे यांच्या बागेतील केळीची यशस्वीरीत्या इराण देशात निर्यात करण्यात आली. ही निर्यात स्थानिक शेतकऱ्यांसाठी आनंदाची व दिलासादायक बाब ठरली आहे.या निर्यात प्रक्रियेसाठी तेल्हारा तालुका कृषी अधिकारी श्री. बडवे साहेब, मंडळ कृषी अधिकारी श्री. गौरव राऊत साहेब, कृषी सहाय्यक श्री. मनोज सारभुकन साहेब, सुधीर जनार्धनराव खारोडे, तसेच कृषी उद्यान पंडित पुरस्कारप्राप्त श्री. सचिन कोरडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.योग्य मार्गदर्शन, आधुनिक शेती पद्धती आणि गुणवत्तापूर्ण उत्पादना मुळे ही निर्यात शक्य झाल्याचे यावेळी सांगण्यात आले. परदेशी बाजारपेठेत तळेगाव परिसरातील केळीला मागणी निम ाण झाल्याने भविष्यात इतर शेतकऱ्यांनाही निर्यातीच्या संधी उपलब्ध होतील, असा



विश्वास कृषी विभागाने व्यक्त केला आहे.ही यशस्वी निर्यात परिसरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून, कृषी उत्पादनांच्या निर्यातीसाठी मार्गदर्शक ठरेल,तसेच असे मत व्यक्त केल्या जात आहे गावतील शेतकरी गुनवंतराव खारोडे, रामदास खारोडे, ओंकारराव ठोंबरे, सदानंद खारोडे, उध्दवराव मानखैर, राम कृष्ण खारोडे, प्रविण खारोडे, यावेळी उपस्थित होते.

# पिंजर महसूल मंडळाची अवैध गौण खनिज बाबत धडाकेबाज कारवाई



■बार्शिटाकळी,दि.२० (प्रतिनिधी)■

बार्शीटाकळी तालुक्यातील पिंजर येथे विनापरवानगी मुरूम घेऊन जात असलेला टिप्पर वाहतुकीबाबत परवानगी नसल्यामुळे संदीप कुमार अपार उपविभागीय अधिकारी ,मूर्तिजापूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच बार्शीटाकळी चे तहसिलदार कापसीकर यांच्या आदेशाने पिंजर गावचे ग्राम महसूल अधिकारी राहुल चव्हाण तसेच राजेश धमणिकर ,कोतवाल सतीश चव्हाण, सुरज राऊत ,मंडळ अधिकारी श्रवण भराडी यांनी सदर वाहनावर कार्यवाही केली सदर विनापरवानगीने वाहतूक करत असलेला टिप्पर पोलीस स्टेशन पिंजर येथे लावण्यात आला.सदर सर्व कार्यवाहीसाठी.अतुल सोनोने साहेब,निवासी नायब तहसीलदार, बार्शीटाकळी यांनी विशेष सूचना दिल्या होत्या.तसेच कान्हेरी सरप येथे ग्राम महसूल अधिकारी शारदा तायडे मॅडम व वानखेडे मॅडम यांनी तपासणी करून विनापरवानगी असल्या मुळे कारवाई केली.मंडळ अधिकारी श्रवण भराडी,मंडळ अधिकारी प्रमोद ठोसर ग्राम महसूल अधिकारी मनीष हळदे, राहुल चव्हाण,महसूल सेवक विपुल जाधव यांनी विनापरवाना मुरमाची वाहतूक करणारा टिप्पर कारवाई करून पोलीस स्टेशन बार्शीटाकळी येथे लावण्यात आला.

## दोन गटांत मारहाणी, काठी व रॉडचा वापर

**मुर्तिजापुर :** जिल्ह्यातील मूर्तिजापुर शहरातील लहरीया प्लॉट येथील गजानन महाराज मंदिर परिसरात १९ जानेवारीच्या रात्री दोन गटांत हिंसक संघर्ष झाला. रात्री १०:३० ते ११:३० दरम्यान दोन भिन्न प्रकरणातून हा वाद सुरू झाला. पहिल्या प्रकरणानुसार, उपेंद्र खन्नाडे यांनी मंदिराजवळ वाद मिटवण्यासाठी आले असता आरोपी शेखर, राहुल व विशाल येदवर यांनी काठीने पाठीवर म ारहाण केली, शिवीगाळ केली. दुसऱ्या प्रकरणात शेखर आनंदराव येदवर यांच्या भाऊ संग्राम यांच्याकडे पैसे मागितल्याचा वाद सुरू झाला.

# NSS उपक्रमांतर्गत भटके श्वान व मोकाट जनावरांबाबत जनजागृती

## शासकीय तंत्रनिकेतन, येथे नियंत्रण उपाययोजनांची दिली माहिती

■मुर्तिजापुर,दि.२० (प्रतिनिधी)■

भटके श्वान व मोकाट जनावरांमुळे होणारे अपघात, विद्यार्थ्यांची सुरक्षितता तसेच सार्वजनिक आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता, शासकीय तंत्रनिकेतन, मूर्तिजापूर येथे NSS उपक्रमांतर्गत विशेष जनजागृती व नियंत्रण अभियान राबविण्यात आले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी PPT सादरीकरणाद्वारे भटके श्वान व मोकाट जनावरांमुळे उद्भवणारे धोके, रेबीजसारखे प्राणघातक आजार तसेच त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. श्वान चावल्यास घ्यावयाची तात्काळ प्राथमिक काळजी, लसीकरणाचे महत्त्व व त्वरित वैद्यकीय उपचार यावर विशेष भर देण्यात आला.संस्थेच्या प्राचार्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की,शैक्षणिक परिसरात भटके श्वान व मोकाट जनावरांचा



वावर रोखणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी संस्थेच्या आवारात अशा जनावरांचा प्रवेश मर्यादित ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना राबविण्यात येत आहेत.या अनुषंगाने संस्थेत एक नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आला असून, त्यांच्या माध्यमातून संबंधित यंत्रणांशी समन्वय साधणे, तक्रारींची नोंद घेणे व आवश्यक प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच परिसरात नियमित देखरेख ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.विद्यार्थ्यांनी पोस्टर्स व घोषणाफलकांच्या माध्यमातून परिसरात जनजागृती केली. या छडड उपक्रमात संस्थेचे प्राध्यापक, कर्मचारी व स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.या उपक्रमामुळे शासकीय तंत्रनिकेतन, मूर्तिजापूर परिसर अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध व जागरूक ठेवण्यास निश्चितच मदत होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

## मुलींच्या शासकीय वसतिगृहात पालक

■अकोट,दि.२० (प्रतिनिधी)■शहरातील मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहात नुकताच विद्यार्थिनींच्या प्रगतीचा व वर्तनाचा आढावा घेण्याच्या दृष्टीने तसेच गुणवत्ता वाढीवर चर्चा करण्यासाठी पालक मेळावा पार पडला. या मेळाव्यात विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मेळाव्याला अकोट शहर पोलिस स्टेशनचे सहा. पोलिस निरीक्षक वानखडे, पालक प्रतिनिधी अशोक गवई, नम्रता गवई, पोकाँ पद्मीनी एडणे, पत्रकार रामदास काळे प्रामुख्याने उपस्थित होते. एपीआय वानखडे यांनी विद्यार्थिनींना स्वतःची सुरक्षितता, सोशल मीडियाचे दुष्परिणाम, शारीरिक शोषण, पोक्सो कायदा, हेल्पलाईन नंबर या महत्वपूर्ण बाबींवर सखोल मार्गदर्शन केले.

## थोडक्यात

### ई-पीक पाहणीला सुरुवात, नोंदणीसाठी २४ जानेवारी पर्यंत मुदतवाढ

**अकोट :** अकोट तालुक्यातील रब्बी पीक हंगामातील पिकांची नोंदणी करण्यासाठी शासनाने 'ई- पीक पाहणी' मोहिमेला सुरुवात केली आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांनी २४ जानेवारी २०२६ पर्यंत शेतातील पिकांची ऑनलाइन नोंदणी पूर्णकरणे बंधनकारक आहे. विहित मुदतीत नोंदणी न केल्यास सातबाऱ्यावरील पीकाचा रकाना हा कोरा राहील. यामुळे भविष्यात शेतकऱ्यांना पीकविमा किंवा कोणतीही नैसर्गिक आपत्ती, मदत, मिळणार नाही व शेतकरी मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. महसूलविभागाने शेतकऱ्यांच्या सोयीसाठी 'ई-पीक पाहणी २.०.१५ हे नवीन मोबाइल अँप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध करून दिलेले आहे. शेतकऱ्यांनी स्वतः च्या शेतात (बांधावर) जाऊन या अँपद्वारे आपल्या शेतातील पेरलेल्या पिकाची माहिती अपलोड करायची आहे. यामुळे सातबाऱ्यावर अचूक नोंद होऊन पारदर्शकता येणार आहे. ज्या शेतकरी बांधवांकडे अँड्रॉइड मोबाइल उपलब्ध नाही किंवा ज्यांना अँप वापरताना तांत्रिक अडचणी येत आहेत. त्यांच्यासाठी महसूल विभागाने विशेष व्यवस्था आहे. संबंधित तलाठी, कोतवाल, किंवा गावचेगावातनियुक्त करण्यात आलेले मदतनीस यांची शेतकरी मदत घेऊ शकतात.

# धर्मवीर संभाजी महाराजांचा पराक्रम म्हणजे स्वराज्यनिष्ठेचा अमर इतिहास : सौरभ वाघोडे

## धर्मवीर संभाजी मंडळात राज्याभिषेकाचा गौरवशाली सोहळा व बजरंग दलाची करण्यात आली स्थापना

■तेल्हारा,दि.२० (प्रतिनिधी)■

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाचा गौरवशाली सोहळा तेल्हारा येथिल धर्मवीर संभाजी मंडळाच्या वतीने अत्यंत उत्साहात, शिवभक्तीमय आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

या सोहळ्याने परिसरात स्वराज्याची ज्वाला पुन्हा एकदा प्रज्वलित केली या वेळी संभाजी चौकामध्ये बजरंग दलाची स्थापना करून कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. कार्यक्रम ातील प्रमुख आकर्षण ठरले सुप्रसिद्ध शिवव्याख्याते सौरभ वाघोडे यांचे ज्वलंत व अभ्यासपूर्ण व्याख्यान. त्यांनी धर्मवीर संभाजी महाराजांच्या अद्वितीय शौर्यगाथेचा उलगडा करताना उपस्थितांच्या अंगावर शहारे आणले. ङ्गसंभाजी महाराज म्हणजे केवळ रणधुरंधर योद्धा नव्हे, तर धर्म, स्वराज्य आणि स्वाभिमानासाठी मृत्यूलाही न



घाबरणारा तेजस्वी राष्ट्रपुरुष,ङ्ग असे ठाम प्रतिपादन त्यांनी केले. मुघलांच्या अमानुष छळासमोरही न झुकणारे संभाजी महाराज, त्यांची स्वराज्यनिष्ठा, बौद्धिक प्रगल्भता, पराक्रमी नेतृत्व आणि बलिदानाची पराकाष्ठा आजच्या पिढीसाठी दिशादर्शक आहे, असे सांगताना वाघोडे यांनी इतिहासातील अनेक थर उलगडले.

त्यांच्या ओघवत्या शैलीतील भाषणाला उपस्थित शिव प्रेमींनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली . विश्व हिंदू परिषद बजरंग दलाचे कार्य काय सेवा सुरक्षा संस्कार या विषयावर विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सह संयोजक राहुल श्रुगारकर यांनी सविस्तर माहिती दिली आकाश पिवाल व रुतिक मानकर यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त केले कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे ज्येष्ठ नागरिक ओंकारराव फाटकर होते तर प्रमुख अतिथी म्हणून विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहसंयोजक श्रृंगारकर सर बजरंग दलाचे जिल्हा सहसंयोजक निलेश खेट्टे तसेच रघुनाथराव सोनटक्के कैलास खारोडे विश्वनाथ आप्पा घोडेस्वार आकाश पिवाल बजरंग दलाचे माजी तालुका अध्यक्ष रामभाऊ फाटकर सामाजिक कार्यकर्ते मंगेश ठाकरे पंकज कांगटे निम ळ रवी राऊत विशाल गावत्रे आदी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आकाश फाटकर यांनी केले.

# गणित अध्यापक मंडळातर्फे गणित प्राविण्य परीक्षेचे यशस्वी आयोजन



■अकोला,दि.२० (प्रतिनिधी)■

महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक मंडळा अंतर्गत अकोला जिल्हा गणित अध्यापक मंडळातर्फे दरवर्षी गणित प्राविण्य परीक्षेचे आयोजन केले जाते. यावर्षीसुद्धा अकोल्यातील ज्युबिली इंग्लिश स्कूल या परीक्षा केंद्रावर अकोला जिल्हा गणित अध्यापक मंडळातर्फे गणित प्राविण्य स्पर्धा परीक्षा यशस्वीरित्या पार पडली. जिल्ह्यातल्या विविध शाळांमधील वर्ग पाचवी व आठवीचे दोनशे पेक्षा जास्त विद्यार्थी सदर परीक्षेस प्रविष्ट झाले होते. अकोला जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे अध्यक्ष उमेश रेळे यांचे नियंत्रणात तथा उपाध्यक्ष रमेश धुळे आणि सचिव माणिक गायकी यांचे देखरेखीत ही परीक्षा सुरळीत पार पडली. या परिक्षेकरीता पर्यवेक्षक म्हणुन मंडळाचे सदस्य नागोराव गव्हाळे, नारायण गावंडे, अनुराधा डिक्कर, रचना मॅडम यांनी काम पाहिले, तर मदतनीस म्हणून कुशल कासमपुरे हे होते.





# प्रशिक्षित रासेयो स्वयंसेवक आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यात सक्षम ठरतील : कमांडंट सारंग कुर्वे

▪राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रम ‘आव्हान – चान्सलर्स ब्रिगेड २०२५–२६‘ मध्ये घडतायेत विद्यार्थी!
▪राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थी–विद्यार्थिनी गिरवितायेत आपत्कालीन व्यवस्थापनाचे धडे!
▪डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठात चहुंकडे फुलले चैतन्याचे वातावरण!



▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी)▪

जागतिक हवामान बदलाच्या या कालखंडात संपूर्ण जगचं एक प्रकारे बेमौसमी पाऊस, महापूर, वादळ, दुष्काळ, गारपीट अश्या अनैसर्गिक आव्हानांना तोंड देतांना दिसत असून प्रचंड लोकसंख्यांक आपल्या देशात पर्यायी आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा उभारणे काळाची गरज असल्याचे सांगत राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) पुणे येथील प्रमुख कमांडंट सारंग कुर्वे यांनी महाराष्ट्र राज्याच्या सन्माननीय राजभवन कार्यालयाचे ऋण व्यक्त करताना महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण होण्यासोबतच कौशल्य व नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी तसेच अचानक घडणाऱ्या नैसर्गिक अथवा मानवनिर्मित घटनांमुळे होणारी जीवितहानी, मालमत्तेचे नुकसान व सामाजिक अव्यवस्था टाळण्यासाठी ‘आव्हान–चान्सलर्स ब्रिगेड‘ या महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये करीत विद्यार्थ्यांमध्ये आपत्कालीन परिस्थितीत पूर्वतयारी,शिस्त, समन्वय आणि तत्पर सेवाभाव वृद्धिंगत करण्याचा अतिशय महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेतल्याचे गौरवोद्गार काढले. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मुख्यालयी आयोजित ‘महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्तीपूर्व तयारी प्रशिक्षण शिबिराचे‘ चवथ्या दिवशी ’ पूरसदृश्य परिस्थितीत जीवितहानी टाळण्यासाठी आपत्कालीन नियोजन’ या कृतियुक्त प्रशिक्षण शिबिरात उपस्थित राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे विशेष उपस्थितीत विद्यापीठाच्या बाभुळगाव विभागातील संग्राहक तलावावर संपन्न स्वयंसेवकांना प्रत्यक्ष पाण्यात उतरून आपत्कालीन परिस्थितीत मनुष्य हानी टाळण्याच्या विविध उपायोजना सहजतेने समजून सांगितल्या.

# पाणी बिलावरील ९५ टक्के सरचार्ज माफ करा

## नगरसेवकांची नगराध्यक्षांकडे मागणी

▪तेल्हारा,दि.२० (प्रतिनिधी)▪

जनहितार्थ तसेच नगरपालिकेचे हित सुद्धा लक्षात घेता पाणी बिलावरील ९५ टक्के सरचार्ज माफ करा अशी मागणी पाच नगरसेवकांनी नगराध्यक्षा वैशाली पालीवाल यांना निवेदन देऊन केली आहे.

पाणीपुरवठा विभागातील पाणीपट्टी मोठ्या प्रमाणात थकीत असून त्याची वसुली करणे आवश्यक आहे नगर पालिकेने यापूर्वी ज्याप्रमाणे शहरातील पाणी बिलावरील सरचार्ज हा ९५ टक्के माफ करून नागरिकांचेही हित जोपासले व नगरपालिकेने चांगल्या प्रकारे पाणी पट्टी वसूल केलेली आहे त्याच अनुषंगाने पालिकेच्या अध्यक्षांनी ९५ टक्के सरचार्ज माफ करण्याचा विषय हा सभेमध्ये विषय पत्रिकेवर घेऊन सभेमध्ये ठेवून तशा प्रकारचा ठराव घ्यावा जेणेकरून जनतेची हीत जोपासले जाईल व नगरपालिकेची आर्थिक स्थिती सुद्धा आणखी बळकट होईल व विकास कामांमध्ये भरभराटी येईल



अशा प्रकारची मागणी पालिका अध्यक्ष व पाणीपुरवठा सभापती अमित अग्रवाल यांच्या कडे निवेदनाद्वारे पालिकेच्या गटनेत्या कान्होपात्रा फाटकर पालिका सदस्य कैलास ठोकने राजेश खारोडे रिनाताई आसरे पंच फुला कवर यांनी केली आहे.

# अकोला रेल्वे पोलिसांनी १.८ किलो २८,३०५ रुपये किंमतीचा प्रतिबंधित गांजा केला जप्त

▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी)▪

अकोला जिल्ह्यात गांजा तस्करीवर पोलिसांचा धडाकेबाज हल्ला! २० जानेवारी रोजी अकोला रेल्वे स्टेशनवर जीआरपी टीम ला गुप्त माहिती मिळाली की एका युवकाने तस्करी सुरू केली आहे.

प्लेटफफॉर्म क्र. ६ वर गणेश अंभोरे याची तलाशी घेतली असता, त्याच्याकडून १ किलो ८८७ ग्रॅम वजनाचा, बाजारमूल्य २८,३०५ रुपयांचा प्रतिबंधित गांजा जप्त केला गेला.

रेल्वे पोलिसांनी आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविला असून, गांजा कुठून आणला आणि कुठे पोहचविणार होता याची चौकशी सुरू आहे. या कारवाईत



पोलीस अधीक्षक मंगेश शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी पांडुरंग सोनोने, स्टेशन प्रभारी अर्चना गाडवे, सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रदीप डोलारे आणि इतर अधिकाऱ्यांचा मोठा सहभाग होता.अकोला जिल्ह्यातील गांजा तस्करी वाढतच आहे, यापूर्वीही पोलिसांनी मोठ्या प्रमाणात गांजा जप्त केला आहे. पोलिसांची सततची धडक कारवाई यापुढेही तस्करी करणाऱ्यांसाठी इशारा ठरणार आहे.

त्यामुळे अकोला जिल्ह्यात गांजा तस्करीवर कडक नजर कायम राहणार आहे.

# अकोला जिल्ह्यात ‘अरुणोदय’ सिकलसेल ॲनिमिया विशेष मोहिमेला सुरुवात



▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी)▪

अकोला जिल्ह्यात सिकल सेल ॲनिमिया निर्मूलनाच्या दृष्टीने ‘अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष मोहिम’ सुरू करण्यात आली असून ही मोहिम *१५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी या कालावधीत अकोला जिल्ह्यास ह राज्यातील २१ जिल्ह्यांत राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत *० ते ४० वयोगटातील प्रत्येक नागरिकाची सिकलसेल तपासणी करण्यात येणार आहे.जिल्ह्यात सर्व गावांमध्ये घरोघरी तपासणी व सर्वेक्षणासाठी १,१२८ पथके (टिम) तैनात करण्यात आली असून नोडल अधिकारी व पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले आहे.या अनुषंगाने आज जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व सिकल सेल कोऑर्डिनेटर यांची आढावा बैठक घेतली. मोहिमेदरम्यान तपासणी किट व औषधांचा साठा कुठेही कमी पडू नये, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच एकही लाभार्थी तपासणीपासून वंचित राहू नये, यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तपासणीनंतर प्राप्त माहिती मार्गदर्शक सूचनांनुसार पोर्टलवर भरावी, असेही सांगण्यात आले.दरम्यान, माननीय आरोग्य मंत्री महोदय यांनी अकोला जिल्ह्यातील सर्व सरपंचांना सिकलसेल मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याबाबत आवाहनात्मक पत्र दिले असून हे पत्र जिल्ह्यातील सर्व सरपंचांना वितरित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या मोहिमेची माहिती समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवून अभियान यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी केले आहे.

# ‘ऑपरेशन शोध–१४’ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, अकोला यांची कारवाई

**अकोला :** अप्पर पोलीस महासंचालक महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे आदेशाने राज्यात हरविलेल्या / अपतृत १८ वर्षाखालील गुले व गुली यांच्या शोध कामी दि. २०/०१/२०२६ रोजी पासुन विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

पोलीस स्टेशन उरळ, अकोला येथील अप नं ३२० / २०२४ क १३७ (२) भान्यांस चा गुन्हा दाखल झाला असुन तपासकामी डायरी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष अकोला येथे दिनांक ०१/०८/२०२५ रोजी प्राप्त झाली. सदर गुन्ह्यात गुप्त बातमी दारांमार्फत खात्रीलायक माहिती घेवुन, गुन्ह्यातील अल्पवयीन पिडीता ही अनिकेत दिलीप घ्यारे याचे सोबत ग्राम कापशी, ता. पातुर, अकोला येथे राहत असल्याबाबत माहीती मिळवली.

वरून सदर ठिकाणी वरीष्ठांच्या मार्गदर्शनात अ.मा.वा.प्र. कक्ष येथील तपास पथक यांनी जावुन पाहणी व चौकशी केली असता, पिडीता व आरोपी अनिकेत दिलीप घ्यारे हे कापशी, अकोला येथे मिळुन आले.

# मूंगीलाल बाजोरिया विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेह संमेलन संपन्न

▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी)▪

जिल्ह्यात आपल्या शैक्षणिक परंपरेने इतिहास घडविणाऱ्या मूंगीलाल बाजोरिया विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचे भव्य स्नेह संमेलनरविवारी विद्यालयाच्या सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाले. विद्यालयाच्या माजी विद्यार्थी कार्यकारिणी समितीतील विविध बॅचमधील ४० माजी विद्यार्थ्यांचा कार्यकारिणी समितीने या सोहळ्याचे यशस्वी नियोजन केले. या स्नेह संमेलनात सन १९४९ च्या पहिल्या बॅचपासून ते मागील वर्षापर्यंतच्या सर्व माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.यावर्षी सुमारे ३५० माजी विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. विद्यालया चे माजी विद्यार्थी व माजी आ. गोपीकिसन बाजोरिया यांच्या अध्यक्षतेत सम्पन्न या कार्यक्रमात मंचावर कार्यकारी अध्यक्ष रमाकांत खेतान,संस्थापक अध्यक्ष सुरेश खंडेलवाल उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात शालेय घंटानाद व राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर दीप प्रज्वलन करण्यात आले.यात



७५ वर्षांवरील वय असलेल्या २२ ज्येष्ठ माजी विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच ८ माजी शिक्षकांचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमात बालपणीच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी ५५ प्रकारचे पारंपरिक बालपणीचे चॉकलेट,गोळ्या, बेर,इमली का बुटा आदी बाल खाद्यपदार्थांचे स्टॉल्स उभारण्यात आले होते.

यासोबतच कंचे,गिट्टी– दांडू,भोवरे, लगोरी, रस्सीखेच अशा पारंपरिक खेळांची विशेष मांडणी करण्यात आली.माजी विद्यार्थी प्रदीप शर्मा यांच्या नेतृत्वाखाली रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आलेत. यामध्ये कविता, गाणी व नृत्यप्रकारांचा समावेश होता.या एकदिवसीय सोहळ्यासाठी बाहेरगावाहून आलेल्या सुमारे १०० माजी विद्यार्थ्यांसाठी निवासाची विशेष व्यवस्था करण्यात आली होती.कार्यक्रमात स्व. नारायणदास खंडेलवाल यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच विद्यालयाच्या विश्वस्तांचा सन्मान करण्यात आला.संचालन देवेंद्र अग्रवाल यांनी,प्रास्ताविक राजीव बजाज यांनी तर परिचय राजेश केडिया, गोपाल चौधरी व रूपाली चौधरी यांनी केला.

# राजीव बोचे, बोडखे काँग्रेसमधून निलंबित

▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी)▪

प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्या हत्याप्रकरणात आरोपींमध्ये नावे समाविष्ट असून फौजदारी गुन्हे दाखल झाल्याने अकोट येथील जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती राजीव बोचे, तसेच अकोट विधानसभा निवडणुकीत पक्षाने उमेदवारी दिलेले तसेच माजी नगराध्यक्ष संजय बोडखे यांना पक्षातून निलंबित करण्यात आले आहे.


MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## E-Tender Notice

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO (Rfx No) / Description / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | EM-III / Rfx No. 3000064964 / AMC for HBL make Ni-Cd batteries installed at Unit-8&9, CSTPS and outdoor area for 2 years / Rs.6889541.04/- |
| 2 | ODP-II / Rfx No. 3000064927 / Supply of 400NB/300NB modified expansion joints & rubber gasket for Ash disposal lines of Unit- 3 to 7 in ODP-II, CSTPS, Chandrapur / Rs.1955340/- |
| 3 | ODP-II / Rfx No. 3000064903 / Work of lifting/diversion ash disposal pipeline of Unit-7 to 9 above the dyke wall after forth raising of ash bund at CSTPS, Chandrapur / Rs.9449495/- |
| 4 | TEST-III / Rfx No. 3000064962 / Work of Repairing of ESP controller modules and electronic cards of Unit-8 & 9, CSTPS, Chandrapur on as and when required basis / Rs.748870/- |
| 5 | TEST-III / Rfx No. 3000064963 / Procurement of spares for Rotary vane feeder and Screw feeder for Ash disposal System of Unit - 8 & 9, CSTPS, Chandrapur / Rs.295519/- |
| 6 | CIVIL / Rfx No. 3000064988 / Providing and fixing broken glasses and point nails on compound wall near buttress area of compound wall from Koyna gate to Major gate at CSTPS Chandrapur / Rs.814084/- |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in for (Sr. No. 01 to 06)** For any query Contact No. 8554991818.

**Sd/-**
**CHIEF ENGINEER (O&M)**
**CSTPS, CHANDRAPUR**


# भगवंताच्या नाम स्मरणाने संपूर्ण समाधान:हभप किशोर महाराज ठाकरे

## फडके नगरच्या कीर्तनात आज हभप किशोर महाराज काळे

▪अकोला,दि.२० (प्रतिनिधी)▪

संसारात कोणतेच तप फळत नाही असा समज आहे.हे तितके खरे असले तरी भगवंत प्राप्तीसाठी केवळ नाम स्मरण श्रेष्ठ आहे.म्हणून साधकाने कोणतीही संधी न वाया जाऊ न देता भगवंतांचे नाम स्मरण करून शाश्वत सुखाची प्राप्ती करावी असा हितोपदेश हभप किशोर महाराज ठाकरे यांनी केला.

स्थानीय फडके नगर परिसरातील हनुमान मंदिर उत्सव समितीच्या वतीने फडके नगर येथील हनुमान मंदिर येथे आयोजित संगीतमय रामायण व कीर्तन उत्सवात कीर्तनाचे प्रथम पुष्प मोर्शी येथील कीर्तनकार हभप किशोर महाराज ठाकरे यांनी गुंफले.संत तुकोबाराय यांच्या नाम साधनेच्या अभंगवार त्यांनी या सत्रात



आपले संगीतमय कीर्तन सादर केले. नामस्मरणाने भकत जीवनाच्या कठीण परिस्थितीतून तरतो. त्याला भगवतांची प्राप्ती होते. दुःखे नाहीशी होतात. म्हणून आपल्या इष्ट प्रभूचे नामस्मरण करण्याचे आवाहन हभप किशोर महाराज यांनी यावेळी केले.

ते म्हणाले भगवंताच्या केवळ नामस्मरणाने संपूर्ण समाधान मिळते प्रपंचात समाधान असते तर सर्व इच्छा तृप्त झाल्या असत्या मात्र प्रपंचात समाधान प्राप्त होत नसून ते केवळ प्रभू भक्तीत समाधान मिळते भक्ती हे परमार्थिक व्यक्तीच्या अनुषंगाने प्राप्त होत असते खरा परमार्थ पुरुष दुसऱ्याचे सदा सुख व कल्याण बघत असतो या कल्याणाचा तो सदा विचार करीत असतो म्हणून परमार्थाने चित्ताची शुद्धी होते चित्त निमर्ळ होते असे निमर्ळ चित्र भगवंताच्या कृपाप्रसादास प्राप्त होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले ते म्हणाले अंतिम समय केवळ परमार्थच सोबत येतो. दरम्यान सकाळी बुलढाणा येथील ह भ प सुभाष महाराज चव्हाण यांनी रामायणाची कथा सादर केली. सोमवार दिनांक २६ जानेवारी पर्यंत आयोजित या उत्सवात रामायण कथा सकाळी ९–३० ते १२–३० ते दुपारी ३ ते ६ वाजेपर्यंत असून कीर्तन सेवा रात्री ८ ते १० वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत.कीर्तन उत्सवात आज मंगळवार दिनांक २० जानेवारी रोजी नांदगाव खंडेश्वर येथील हभप उमेश महाराज जाधव यांचे कीर्तन होणार आहे.

बुधवार दिनांक २१ जानेवारी रोजी तामसी बटवाडी येथील हभप किशोर महाराज काळे, गुरुवार दिनांक २२ जानेवारी रोजी पारस येथील हास्याचार्य हभप अरुण महाराज लांडे यांचे कीर्तन होणार आहे.शुक्रवार दिनांक २३ जानेवारी रोजी मोर्शी येथील हभप प्रदीप महाराज पडोळे, शनिवार दिनांक २४ जानेवारी रोजी झाशी पडशी येथील हभप प्रमोद महाराज राहणे, रविवार दिनांक २५ जानेवारी रोजी हभप सुभाष महाराज चव्हाण यांचे कीर्तन होऊन दुपारी ३ वाजता ग्रंथ दिंडी शोभायात्रा दाबकी रोड परिसरात निघणार आहे.सोमवार दिनांक २६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता हभप तुकाराम महाराज सखाराम पुरकर इलोरा यांचे काल्याचे किर्तन होऊन या संगीतमय रामायण व किर्तन महोत्सवाची सांगता होणार आहे.

## हिदायत पटेल यांना सर्वपक्षीय श्रध्दांजली

काँग्रेससचे जेष्ठ नेते हिदायत पटेल यांना सर्व पक्षाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मिरसाहेब हॉल मधे श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी सभेच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ काँग्रेस नेते मनोहरलाल फाफट होते. शेतकरी संघटनेचे नेते लक्ष्मीकांत कौठकार, नंदकिशोर अढाऊ, गोपाल कोल्हे, संजय राजनकार, उपस्थित होते.


**CHANGE IN NAME**

I Have Change My Name From-
**PRAMOD SHALIKRAMJI GONDCHAR**
- TO
**PRAMOD SHALIKRAM GONDCHAR**
PASSPORT NO :- **G6767836**
My Residential Address is :- Kisan Mechanical Centre, Near Police Station Akola Road, Akot 444101



RNI NO-46973/1986 Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak, **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

# बहुजन राजकारण : पक्ष अनेक, पण दिशा कुठे?

भारतीय लोकशाहीत बहुजन समाज हा केवळ मतदारांचा समूह नाही, तर तो या देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय वास्तवाचा कणा आहे. संख्येने बहुसंख्य असूनही सत्ता, धोरणनिर्मिती आणि निर्णय प्रक्रियेत आजही बहुजन समाज दुय्यम स्थानावरच आहे. या विसंगतीतूनच बहुजन राजकारणाचा जन्म झाला; डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी त्याला दिशा दिली. मात्र आज, स्वातंत्र्याच्या सात दशकांनंतर प्रश्न असा उभा राहतो की, बहुजनांचे राजकारण खरोखर त्यांच्या हातात आहे का, की ते पक्षीय स्वार्थात अडकले आहे?

------------

आजच्या राजकीय पटावर एमआयएम, वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन पक्षांचे विविध गट, बहुजन समाज पार्टी आणि इतर अनेक आंबेडकरी पक्ष अस्तित्वात आहेत. प्रत्येकजण स्वतःला बहुजनांचा खरा प्रतिनिधी म्हणवतो. पण बहुजन समाजाची अवस्था मात्र फारशी बदललेली दिसत नाही. मग दोष कुठे आहे? विचारात, नेतृत्वात, संघटनात की एकीच्या अभावात?

एमआयएमने अलिकडच्या काळात राष्ट्रीय राजकारणात लक्ष वेधून घेतले आहे. असदुद्दीन ओवैसी यांची आक्रमक, अभ्यासपूर्ण आणि निर्भीड संसद भूमिका अनेकांना भावते. अल्पसंख्याकांच्या प्रश्नांवर ते निर्भयपणे सरकारला जाब विचारतात, हे निर्विवाद आहे. मात्र महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांत एमआयएमकडे पाहताना एक प्रश्न सतत उपस्थित राहतो, हा पक्ष बहुजनांचा आहे की मुख्यतः मुस्लिम समाजाचा?

सामाजिक न्याय, जातिनिर्मूलन, आरक्षण, आर्थिक विषमता यासारख्या आंबेडकरी मुद्द्यांवर एमआयएमची भूमिका स्पष्ट असली, तरी त्याची प्रतिमा अजूनही संकुचित सामाजिक चौकटीत अडकलेली आहे. बहुजन एकीची भाषा बोलतानाही प्रत्यक्ष व्यवहारात ती एकी दिसून येत नाही.

वंचित बहुजन आघाडीने महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळा वैचारिक सूर आणला. बहुजन या संकल्पनेला व्यापक अर्थ देत दलित, आदिवासी, ओबीसी, भटके-विमुक्त, अल्पसंख्याक आणि वंचित घटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज यांच्या विचारांचा संदर्भ देत वंचितने राजकीय चर्चेला वैचारिक खोली दिली. मात्र निवडणुकीच्या रणांगणात वंचितची ताकद तितकी प्रभावी ठरत नाही.

नेतृत्वाभोवती केंद्रीकरण, स्थानिक पातळीवरील कमकुवत संघटन आणि सातत्याने अपयशी ठरणारे निवडणूक निकाल, या सगळ्यामुळे वंचितचा वैचारिक प्रभाव राजकीय सत्तेत रूपांतरित होत नाही. विचार असणे महत्त्वाचे असते, पण तो जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी मजबूत संघटन आणि व्यवहार्यता तितकीच गरजेची असते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेला रिपब्लिकन पक्ष हा आंबेडकरी चळवळीचा राजकीय वारसदार मानला जातो. मात्र आज रिपब्लिकन पक्ष ही एक संघटना नसून, गटांची गर्दी बनली आहे. प्रत्येक गट स्वतंत्रपणे सत्ताधारी पक्षांशी समझोते करतो, मंत्रीपदे मिळवतो, पण बहुजन समाजाच्या मूलभूत प्रश्नांवर ठोस लढा उभारताना दिसत नाही. यामुळे रिपब्लिकन पक्षांवर ह्यसत्तेचे उपग्रहह्ण किंवा ह्यबी-टीम अशी टीका होते. आंबेडकरांच्या नावाचा वापर करून वैयक्तिक राजकीय लाभ मिळवणे, हीच रिपब्लिकन चळवळीची ओळख बनल्याचे चित्र दुर्दैवाने निर्माण झाले आहे. वारसा मोठा असला, तरी तो सांभाळण्याची जबाबदारी अनेकांनी टाळली आहे.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

कांशीराम आणि मायावती यांच्या नेतृत्वाखाली बसपा ने ह्यबहुजनह्ण या संकल्पनेला राष्ट्रीय राजकारणात प्रतिष्ठा मिळवून दिली. उत्तर प्रदेशात सत्ता मिळवण्याचा अनुभव हा भारतीय बहुजन चळवळीतील महत्त्वाचा टप्पा होता. मात्र महाराष्ट्रात बसपा जवळपास अप्रासंगिक ठरली आहे. स्थानिक नेतृत्वाचा अभाव, संघटनात्मक मरगळ आणि बदलत्या सामाजिक वास्तवाशी जुळवून न घेण्याची मानसिकता यामुळे बसपा महाराष्ट्रात प्रभाव पाडू शकलेली नाही. राष्ट्रीय पातळीवर मोठा विचार असला, तरी स्थानिक जमिनीवर रुजण्याची तयारी नसल्यास तो विचार केवळ घोषणांपुरता मर्यादित राहतो.

या सगळ्या पक्षांचे विश्लेषण केल्यावर एक गोष्ट स्पष्ट होते, कोणताही एक पक्ष पूर्णपणे सरस नाही. प्रत्येकाकडे काही बलस्थानं आहेत, तसंच गंभीर मयार्दाही आहेत. पण बहुजन समाजासाठी सर्वात घातक बाब म्हणजे या पक्षांमधील परस्पर स्पर्धा, अहंकार आणि अविश्वास.

बहुजनांचे मत विभाजित राहिले, तर सत्तेची चावी नेहमीच इतरांच्या हातात राहणार. हे वास्तव वारंवार सिद्ध झाले आहे. तरीही इतिहासातून धडा घेण्याऐवजी बहुजन राजकारण आजही तुकड्यांत विभागलेले दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकारणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन मानले होते. सत्ता ही अंतिम उद्दिष्ट नव्हती; ती साधन होती. आज मात्र बहुजन राजकारणात सत्ता हीच अंतिम ध्येय बनलेली दिसते. विचार, मूल्ये आणि दीर्घकालीन सामाजिक परिवर्तन याऐवजी तात्कालिक लाभ, पदे आणि निवडणुकीतील गणिते यांना प्राधान्य दिले जाते.

आज गरज आहे ती एका नव्या आत्मपरीक्षणाची. पक्ष बदलून प्रश्न सुटणार नाहीत, जोपर्यंत बहुजन एकी प्रामाणिकपणे घडत नाही, नेतृत्व वैयक्तिक स्वार्थापेक्षा चळवळीला प्राधान्य देत नाही आणि आंबेडकरवाद केवळ घोषणांपुरता न राहता कृतीत उतरत नाही. बहुजन समाजासाठी खरा प्रश्न कोणता पक्ष सरस हा नाही, तर बहुजन समाज स्वतः कधी सरस होणार? हा आहे. जो दिवस बहुजन समाज आपले मत, आपली ताकद आणि आपली दिशा एकत्र करेल, त्या दिवशी कोणताही पक्ष सरस ठरेल, कारण सत्ता बहुजनांच्या हातात असेल.

आज बहुजन समाजासमोर प्रश्न पक्षाचा नाही, भूमिकेचा आहे. नाव वेगवेगळी असू शकतात, झेंडे वेगवेगळे असू शकतात; पण शोषण एकच आहे, अन्याय एकच आहे आणि संघर्षाची गरजही एकच आहे. मतांची विभागणी करून कुणाचाच उद्धार झालेला नाही; उलट सत्तेचे दरवाजे नेहमीच इतरांसाठी खुले राहिले आहेत.

आता वेळ आली आहे ती भावनिक निष्ठेपेक्षा वैचारिक शहाणपण निवडण्याची, नेतृत्वाच्या अहंकारापेक्षा बहुजन एकतेला प्राधान्य देण्याची आणि बाबासाहेबांचा विचार पोस्टरवर नव्हे, तर प्रत्यक्ष राजकारणात उतरवण्याची.

बहुजन समाजाने ठरवले तर सत्ता दूर नाही. पण त्यासाठी प्रश्न विचारणारी जनता, जवाबदारी स्वीकारणारे नेते आणि तुकड्यांत नव्हे तर एकत्र लढणारी चळवळ उभी राहावी लागेल. कारण इतिहास एकच शिकवतो, बहुजन एक झाले, तर सत्ता त्यांच्या पायाशी येते आणि बहुजन फुटले, तर सत्ता कायमच दूर राहते.

# विलासरावांच्या स्मृती जिवंत : भाजपला नो एन्ट्री!

## लातूरचा कौल

लातूरचा राजकीय कौल हा नेहमीच आकड्यांपेक्षा भावना, आठवणी आणि सामाजिक स्मृतींवर आधारलेला राहिला आहे. त्यामुळे लातूरमधील महापालिका निवडणूक किंवा कोणतीही राजकीय घडामोड केवळ सत्ताबदल म्हणून पाहता येत नाही. ती एक प्रकारे समाजमनाचा निर्णय असतो.

याच पार्श्वभूमीवर पाहिल्यास, लातूरचा कौल : विलासराव देशमुखांच्या स्मृती जिवंत–भाजपला नो एन्ट्री! ही घोषणा कोणत्याही अतिशयोक्तीशिवाय लातूरच्या वास्तवाचं प्रतिबिंब आहे. लातूर हा जिल्हा आजही आपला राजकीय इतिहास विसरलेला नाही आणि त्याच इतिहासात विलासराव देशमुख हे नाव केवळ एका नेत्याचं नसून, एका काळाचं, एका संस्कृतीचं आणि एका आपलेपणाचं प्रतीक बनलेलं आहे.



डॉ. भारत कऱ्हाड
दापोली, जि. रत्नागिरी.

१९९३ च्या भूकंपानंतर लातूरने जे भोगलं, ते फक्त इमारतींचं पडझड नव्हती, तर माणसांच्या मनोधैर्याची कसोटी होती. त्या काळात जे नेतृत्व संकटात उभं राहिलं, ज्याने पुनर्वसन केवळ कागदोपत्री न करता माणसांच्या आयुष्याशी जोडून केलं, ते नेतृत्व म्हणजे विलासराव देशमुख. त्यामुळे लातूरकरांच्या मनात ते माजी मुख्यमंत्री म्हणून नव्हे, तर संकटात धावून आलेला आपला माणूस म्हणून कोरले गेले.

ही स्मृती इतकी खोल आहे की ती केवळ आठवण न राहता राजकीय निकष बनली आहे. म्हणूनच देशमुखांचा वारसा म्हणजे आंधळी घराणेशाही नाही, तर विश्वासाचं, कृतज्ञतेचं आणि सातत्याचं हस्तांतरण आहे.

या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष लातूरमध्ये का दुय्यम ठरतो, हे समजून घेणं अवघड नाही. भाजपची संघटनात्मक ताकद, प्रचार यंत्रणा किंवा राष्ट्रीय पातळीवरील प्रभाव नाकारता येणार नाही; मात्र लातूरसारख्या जिल्ह्यात केवळ पक्षाचं बळ पुरेसं ठरत नाही. इथे नेतृत्व स्थानिक असावं लागतं, माणसांमध्ये मिसळलेलं असावं लागतं.

भाजपचं राजकारण बहुतेक वेळा वरून खाली येणारं, दिल्ली-केंद्रित आणि घोषणाभिमुख वाटतं. मराठवाड्याच्या संघर्षमय सामाजिक वास्तवाशी, दुष्काळ, स्थलांतर, शिक्षणासाठीची धडपड आणि सामाजिक न्यायाच्या अपेक्षांशी ही भाषा अनेकदा जुळत नाही. त्यामुळे पक्ष मोठा आहे, पण आपला नाही अशी भावना तयार होते.

यातच विलासराव देशमुखांच्या कार्याविषयी किंवा त्यांच्या स्मृतींबाबत झालेली टीका, दुर्लक्ष किंवा कमी लेखणारी विधानं लातूरकरांना मान्य होणारी नव्हती. ही केवळ राजकीय टीका म्हणून पाहिली गेली नाही, तर ती लातूरच्या सामूहिक स्मृतीवरचा आघात मानली गेली.

परिणामी, कोणताही गोंगाट न करता, कोणतीही आक्रमक प्रतिक्रिया न देता, लातूरकरांनी मतपेटीतून शांत पण ठाम नकार दिला. हा नकार भाजपविरोधी द्वेषातून नव्हे, तर आमच्या इतिहासाचा आणि भावनांचा आदर हवा या अपेक्षेतून आलेला आहे.

लातूरचा मतदार विकासाच्या आकड्यांना महत्त्व देतो, पण त्याहून अधिक महत्त्व तो आपलेपणाला, संवादाला आणि संवेदनशीलतेला देतो. देशमुख परंपरेने हे आपलेपण जपलं, तर भाजप तिथे कमी पडलं. म्हणूनच लातूरमध्ये निवडणूक ही केवळ स्पर्धा न राहता, स्मृती आणि सत्तेतील संघर्ष बनते.

जोपर्यंत विलासराव देशमुखांच्या कार्याची आठवण, त्यांच्याशी जोडलेली कृतज्ञता आणि विश्वास लातूरच्या समाजमनात जिवंत आहे, तोपर्यंत भाजपला इथे नो एन्ट्रीचा फलक लागलेला राहणार, हे वास्तव नाकारता येणार नाही.

अखेरीस, लातूरचा कौल हा कोणत्याही एका पक्षाच्या विरोधात किंवा बाजूने दिलेला निर्णय नसून, तो लातूरच्या राजकीय संस्कृतीचा जाहीरनामा आहे. सत्ता बदलता येते, घोषणा बदलता येतात; पण स्मृती बदलणं अवघड असतं. आणि ज्या ठिकाणी स्मृती जिवंत असतात, तिथे राजकारणाला केवळ रणनीती नव्हे, तर संवेदनाही लागते. लातूरने पुन्हा एकदा हेच स्पष्ट केलं आहे– विलासराव देशमुखांच्या स्मृती जिवंत असताना, इथे भाजप दुय्यमच राहणार.

■ ■ ■

# जीवनाची तयारी आणि माणूस घडविणारे प्राचार्य धनंजय शिरूर





माणूसपणाची पाऊलवाट
सुजाता बंडावार
mahasagarngp@gmail.com

मिळणाऱ्या शिक्षणाचे ज्ञानात रुपांतर होऊन विद्यार्थ्याला प्रत्येक विषयाचा मतितार्थ समजावा आणि त्याचा थेट संबंध जीवनाशी जोडता यावा, यासाठी संजीवन विद्यालय पाचगणीचे प्राचार्य धनंजय शिरूर, स्वयंअध्ययन, आशयगर्भित शिक्षण, रचनात्मक शिक्षणावर भर देतात. ते म्हणतात की, शिक्षणातून केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकासासोबत अध्यात्मिक आणि कौशल्य विकास साधला तरच विद्यार्थ्यांचे जीवन पूर्ण घडते असे परखड मत मांडणारे डॉ. धनंजय शिरूर विद्यार्थ्यांमधून सक्षम, स्वावलंबी व कर्तृत्ववान माणूस घडविण्याची कास बाळगून आहेत. त्यांच्या या अभिनव आणि उत्तम शिक्षणाच्या संरचनेतून संजीवन विद्यालय पाचगणी देश पातळीवर नावलौकिकास आले आहे.

आताचे शिक्षण म्हणजे केवळ मार्कासाठी चाललेली स्पर्धा आहे. या स्पर्धेतून केवळ यंत्रे निर्माण होऊ शकतात पण आयुष्याला लागणारी शिदोरी नाही. त्यासाठी विद्यार्थ्याला केंद्रबिंदू मानून आनंददायी व अनुभवातून शिक्षण देण्याची गरज आहे असे विचार बाळगणारे प्राचार्य धनंजय शिरूर यांचा जन्म सातलिंगप्पा शिरूर आणि शांताबाई शिरूर यांच्या पोटी झाला.

शून्यातून जग निर्माण करणाऱ्या वडिलांनी खेड्यातून सोलापूर शहरात येऊन, कमवा आणि शिका या धर्तीवर अत्यंत कठीण परिस्थितीत शिक्षण घेतले. क्लर्क म्हणून लागलेले वडील सहकार्याकडून पुस्तके घेऊन स्पर्धा परीक्षेची तयारी करायचे आणि परीक्षा उत्तीर्ण होऊन ते इरिगेशन डिपार्टमेंट मध्ये सीनियर डिव्हिजनल अकाऊंटस ऑफिसर म्हणून रुजू झाले. वडिलांचे हे कष्ट, त्यांची शिकवण व आईचा इंग्रजी माध्यमाचा आग्रह या जडणघडणीतून मी घडलो आणि माझं उत्तम शिक्षण झाले असे ते अभिमानाने सांगतात.

बी.एससी. मध्ये वनस्पतीशास्त्रात स्पेशलायझेशन केल्यानंतर त्यांनी सायटोजेनेटिक्स अँड प्लांट ब्रीडिंग या विषयात एमएससी पर्यंतचे शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी बी.एड आणि एम.एड चे शिक्षण घेतले. आता ते वनस्पती शास्त्रामध्ये अनेटॉमिकल स्टडीज इन सेरोपेजिया स्पेसिज ऑफ इंडिया या शोध प्रबंधावर काम करीत आहे.

ते भाऊक होऊन सांगतात की, बीएससी ला असताना डॉक्टर राजाभाऊ ढेपे यांच्या प्रभावशाली आणि विद्यार्थ्यांच्या कलेने शिकविण्याचा, शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागातील अनेक मातब्बर प्राध्यापकांच्या व समविचारी मित्रमंडळींच्या शिकवणीचा माझ्यावर विशेष प्रभाव पडला. त्यांना विद्यार्थ्यांना शिकविण्यात गोडी निर्माण झाली. यामुळे ते अकरावी व बारावीचे ट्युशन वर्ग घेऊ लागले.

२००० या वर्षी ते सीनियर कॉलेजला तासिकेवर प्राध्यापक म्हणून शिकवू लागले. आणि त्यांचा शिक्षकी पेशा सुरू झाला. या प्रवासात त्यांनी अनेक शाळा व महाविद्यालयात प्राचार्य म्हणून काम बघितले. पण पाचगणीतील निसर्गरम्य वातावरण, शाळेतील शिस्तबद्ध शैक्षणिक संरचना आणि त्यांच्या कार्यतत्पर बुद्धीला तेथील संस्थेच्या अध्यक्षा शशीताई ठकार, विश्वस्त अनघा देवी यांच्याकडून मिळणारे प्रोत्साहन यामुळे ते संजीवन विद्यालय पाचगणीला प्राचार्य म्हणून रुळले.

प्राचार्य म्हणून या निवासी शाळेच्या संपूर्ण अध्ययन अध्यापन प्रक्रियेची घडी यांनी नीट बसविली. सकाळी ५.३० ते रात्री ९.३० पर्यंत विद्यार्थ्यांना कडक शिस्तीतून आणि तेवढ्याच स्व विकासाच्या अभ्यास व अभ्यास पूरक ॲक्टिव्हिटीज पूर्ण कराव्या लागतात.

यामध्ये शारीरिक व्यायाम, खेळ, शिक्षकांच्या मदतीने स्वयंअध्ययन, नियमित वर्ग, उपचारात्मक वर्ग, ध्यान, अवांतर वाचन, गप्पागोष्टी यांचा अंतर्भाव असतो. हे सर्व करीत असताना विद्यार्थ्यांतील अभ्यासातील कमतरता त्यांचे कच्चे दुवे या वर विशेष शिक्षकांकडून लक्ष देऊन त्यांना वरच्या पातळीपर्यंत आणण्यात येते. याशिवाय जे विद्यार्थी उपजत हुशार आहेत अशा विद्यार्थ्यांकडून ऑलिंपियाड सारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेतली जाते.

जिथे विद्यार्थ्यांना कौन्सिलिंग ची गरज आहे अशा ठिकाणी त्यांचे व त्यांच्या पालकांचे कौन्सेलिंग डॉ. शिरिषा साठे यांच्यामार्फत केले जाते. याशिवाय माजी विद्यार्थी, त्यांचे पालक यांना बोलवून तसेच तज्ञ व्यक्तींना बोलावून अनुभव आणि करिअर मार्गदर्शन त्यांना दिले जाते.

कन्सेप्ट बेस्ड लर्निंग, ॲक्टिव्हिटी बेस्ड लर्निंग, एक्सपेरिन्शियल लर्निंग या त्रीसूत्रीवर विशेष भर असल्याने ते प्रत्येक वर्गाला अभ्यासक्रमानुसार असलेल्या १७ सस्टेनेबल डेव्हलपमेंट स्किल्सवर विद्यार्थ्यांना ॲक्टिव्हिटी करण्यास देतात. गरीबी, स्त्री पुरुष समानता, भूक, आरोग्य, शिक्षण यासारख्या विषयाबाबत सखोल जाणून घेण्यासाठी त्यांना त्या क्षेत्रात जाऊन स्वयं अध्ययनाची संधी देण्यात येते.

सत्य परिस्थिती आणि समस्या जाणून घेतल्यावर ते त्यातून घोषवाक्य, गीत, कथा, नृत्य, लहान लहान स्किट्स बसवितात आणि शाळेच्या पटांगणावर त्याचे सादरीकरण करण्यात येते. यावेळी शाळेतील सर्व कर्मचारी आणि शिक्षक वर्ग त्यांना प्रोत्साहन देतात. कृतीतून आधारित या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट होऊन ते त्यांच्या हृदयापर्यंत भिडते असे शिरूर म्हणतात. हीच पद्धत अभ्यासक्रमासाठी ही वापरली जाते.

विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच कौशल्य आधारित शिक्षण मिळावे म्हणून संजीवन विद्यालय गेल्या वीस वर्षांपासून वोकेशनल कोर्सेस चालवीत आहेत. प्राचार्य शिरूर स्वतः याचे कॉर्डिनेटर होते.

ऑटोमोबाईल रिपेरिंग, मोबाईल रिपेरिंग, कारपेंटरी, पेंटिंग, वूड क्राफ्ट, बांबू क्राफ्ट, पॉटरी यासारखे कोर्सेस चालविल्या जातात. याशिवाय विद्यार्थ्यांना ऑरगॅनिक शेती व त्यातील आधुनिक तंत्रज्ञान याचे ज्ञान मिळावे याकरिता शाळेच्या नर्सरीमध्ये विविध फळे व भाज्या उगविल्या जातात. त्यांच्यासाठी गार्डनिंग हा विषय ही चालविला जातो. लैंगिक शिक्षण ही काळाची गरज आहे हे लक्षात घेऊन डॉ. चित्राताई दाभोळकर या येथे येऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.

धनंजय शिरूर हे जीवशास्त्र शिकवित असल्याने ते सुद्धा या अध्यापनात मदत करतात.

शिक्षण क्षेत्रामध्ये खेळ सुद्धा महत्त्वाचा असल्याने शाळेमध्ये विविध खेळांसाठी सुसज्ज असे मैदान आहे. विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार त्यांना लॉन टेनिस, हॉकी, फुटबॉल, टेबल टेनिस, बॅडमिंटन, मल्लखांब, दांडपट्टा, लाठीकाठी, धनुर्विद्या, मुलींना सेल्फ डिफेन्स शिकविले जातात.

विशेष प्रशिक्षित कोचेस कोचिंग साठी असल्याने विद्यार्थी राज्य पातळी व राष्ट्र पातळीवर चमकले आहे. विद्यार्थ्यांचा मानसिक व व्यक्तिमत्व विकास व्हावा यासाठी वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा अशा स्पर्धा घेतल्या जातात.

विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश घेताना विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्याची आवड निवड, येणा ?्या भाषा, त्याच्यातील कौशल्य, कच्चे दुवे, विषयानुसार हुशारी आधीच हेरली जाते. आणि त्याच्या गरजेनुसार विशेष शिक्षक त्याच्याकडे लक्ष पुरवितात आणि जिथे काउंसलिंगची गरज आहे तेथे विद्यार्थ्यांना व पालकांना कौन्सिलिंग दिली जाते. यामुळे प्राचार्य शिरूर यांच्या शिस्तबद्ध सुशासन आणि विद्यार्थी केंद्रित शिक्षण प्रणालीतून ही शाळा देश पातळीवर नावारूपास आली आहे.

येथे देशातील कानाकोपऱ्यातून विद्यार्थी शिकण्यास येतात. एवढेच नाही तर येथून निघालेले विद्यार्थी डॉक्टर, इंजिनियर, ऑनथ्रोप्रोनर बनून मोठ्या हुद्द्यावर काम करीत आहे. हे सर्व विद्यार्थी मोठ्या अभिमानाने आणि भाऊक होऊन प्राचार्यांशी कृतज्ञता व्यक्त करतात की त्यांच्या सुशासन व प्रशासन यामुळे आम्ही आमच्या कार्यक्षेत्रात उत्तम समायोजन करीत आहोत व प्रगती साधत आहोत.

शालेय विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व जडणघडणीशिवाय संजीवन विद्यालय सामाजिक दायित्व जोपासण्यातही मागे नाही. लॅटरल एज्युकेशन अंतर्गत या शाळेने आसपासच्या १४ गावांना दत्तक घेतले आहे. या चौदा गावातील अंगणवाडीत शिकणाऱ्या मुलांना वाचनाची गोडी लागावी म्हणून गोष्टी आणि गाण्यातून त्यांना शिक्षण दिले जाते. यासाठी त्या गावातील जिल्हा परिषद शाळा निवडलेल्या आहेत.

एका तासासाठी या अंगणवाडी सेविका व मुलांना पुस्तके उपलब्ध करून दिल्या जातात. तसेच या अंगणवाडी सेविकांचे आर्थिक उन्नयन व्हावे यासाठी त्यांना कापडी पिशव्या, मोबाईल कव्हर, ज्यूट बॅग बनविण्या साठी प्रशिक्षण दिले जाते. आणि याची विक्री करून मिळणारी मिळकत त्यांना दिली जाते.

शिरूर सरांच्या अथक परिश्रमातून, संकल्पनेतून आणि विद्यार्थ्यांमध्ये जीवन जगताना आवश्यक असे कौशल्य निर्माण करण्यासाठी त्यांची चाललेली धडपड यातून संजीवन विद्यालय विद्यार्थ्यांसाठी खरोखरच संजीवन बनलेले आहेत. ते म्हणतात की विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संजीवन विद्यालय हे स्किल कोर्सेस वर भर देऊन विद्यापीठामध्ये परावर्तित करण्याकडे वाटचाल करीत आहे आणि खेळाला विशेष प्राधान्य देऊन अनेक उत्कृष्ट खेळाडू निर्माण करण्याचा आमचा हेतू आहे व त्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत.

या लेखाच्या मार्फत ते मुलांना संदेश देतात की शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नसून ते आपले विचार, वर्तन आणि व्यक्तिमत्त्व घडवण्याचे प्रभावी माध्यम आहे. अभ्यासासोबतच शिस्त, प्रामाणिकपणा, कष्ट करण्याची तयारी आणि सकारात्मक दृष्टिकोन हे गुण आत्मसात करा. समाजमाध्यमाचा वापर हितकारी गोष्टीसाठी करा.

अपयश आले तरी खचून न जाता त्यातून शिकण्याचा प्रयत्न करा. यश मिळवण्यासाठी सातत्य, आत्मविश्वास आणि मेहनत आवश्यक असते. आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शन मनापासून स्वीकारा, पालकांचा आदर करा आणि समाजासाठी उपयुक्त नागरिक बनण्याचा संकल्प करा. समाज व विद्यार्थ्यांची पिढी घडवून राष्ट्र उभारणीच्या त्यांच्या या कामात त्यांना सदैव यश लाभो यासाठी आमच्या शुभेच्छा.

--------------

**प्राचार्य धनंजय शिरूर संपर्क क्रमांक**
**7798881662**

■ ■ ■

# सरकारचा गेम प्लॅन अखेर यशस्वी

सर्वसामान्य रयतेची काळजी आणि रक्षणार्थ लोकप्रतिनिधींची एक व्यवस्था अथवा संस्था म्हणजेच सरकार...ती देशाचे किंवा राज्याचे कामकाज चालवत असते. जी कायदे बनवते, धोरणे ठरवते आणि नागरिकांच्या हितासाठी देशाचा कारभार पाहते.

जसे की कायदा व सुव्यवस्था राखणे, शिक्षण आणि आरोग्य सेवा पुरवणे. यात कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका असे विविध भाग असतात, जे शासनाचे अधिकार वापरतात. परंतु आजचे सरकार याच्या विपरीत कार्य करताना दिसून येते. सरकार कोणतेही असले आणि योजना कोणतीही का असेना...जेव्हा ती चालविणे होत नसेल, तर सरळसरळ बंद करून टाकावी. उगाच तिचा तमाशा करू नये. आज बऱ्याच अशा योजना आहे, जिचा केवळ तमाशा होतोय.

**शब्दस्पर्शी सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ.**
**७०५७१८५४७९**

त्याच योजनेतील एक योजना म्हणजे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना.' महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सुरू केलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सध्या व्यवस्थेच्याच जाळ्यात अडकली आहे. केवायसीच्या नावाखाली विचारण्यात आलेले दिशाभूल करणारे प्रश्न अनेक लाडक्या बहिणींसाठी घातक ठरले असून हजारो महिलांचे हप्ते अचानक बंद झाले आहेत.

योजनेचा महायुतीला विधानसभेसोबतच इतर निवडणुकीमध्ये फायदा झाला. योजनेच्या सुरुवातीला महिलांच्या खात्यात नियमित रक्कम जमा होत होती. मात्र, केवायसी सक्तीची केल्यानंतर कोणतीही पूर्वसूचना न देता फक्त एका चुकीच्या क्लिकमुळे महिला अपात्र ठरत असल्याचे समोर आले आहे.

केवायसी करताना 'माझ्या कुटुंबातील सदस्य कायम कर्मचारी म्हणून राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नाही किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत नाही' अशाप्रकारचे एमपीएससीच्या धर्तीवरील दोन प्रश्न अनेक महिलांना गोंधळात टाकणारे ठरले. महिलांनी घरातील कोणताही व्यक्ती शासकीय नोकरीवर नाही, असे उत्तर टाकले; परंतु येथे निवृत्तीवेतन घेत नाही. यासाठी होय असे उत्तर टाकणे अपेक्षित होते.


या प्रश्नांची भाषा इतकी तांत्रिक आहे की, महिलांना समजलीच नाही. समजणार तरी कशी? लाभ घेणा–या सर्वच महिला या सुशिक्षित आहेच असे नाही. जे सुशिक्षित आहे, त्यांना तरी हा प्रश्न लक्षात आलाच असेल असंही नाही. त्यामुळे त्यांची एक्झाम्स घेतल्याप्रमाणे एमपीएससीच्या धर्तीवरील प्रश्न विचारणे हे चुकीचेच होते. नोव्हेंबर व डिसेंबर महिन्याचे पैसे खात्यावर जमा झाल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे. महिलांनी महिला व बालकल्याण विभागाशी संपर्क साधल्यानंतर तुमच्या घरात शासकीय नोकरदार असल्यामुळे तुमचे पैसे बंद झाले असल्याचे सांगितले जात आहे.

केवायसीसाठी ३१ डिसेंबर मुदत देण्यात आली होती. यावेळी अनेक महिलांच्या आधारकार्डला मोबाईल नंबर लिंक नव्हते. यामुळे महिलांची केवायसी दिलेल्या मुदतीत झाली नाही. मुदतवाढ मिळेल ही अपेक्षा महिलांना होती; परंतु संबंधित विभागाने तातडीने पोर्टलवरून केवायसीची प्रक्रिया बंद करून टाकली. याचा फटका हजारो महिलांना बसला आहे. लाडकी बहीण योजनेचा हप्ता मिळाला नसल्याबाबत अनेक महिला विचारणा करण्यासाठी येत आहेत.

केवायसी करणे किंवा चुकीच्या दुरुस्तीबाबत शासनाकडून काहीही सूचना आलेल्या नाहीत. लाडकी बहीण योजना महिलांना आधार देण्यासाठी होती. मात्र, सध्या ती महिलांसाठी अडचणींचीच ठरत आहे. केवायसीतील गोंधळामुळे ही परिस्थिती उद्भवली असून वेगवेगळी कारणे दाखवून महिलांची संख्या कमी करण्याचा हा प्रकार आहे. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून महिलांना दिलासा द्यायला पाहिजे. तसेच नवीन अर्ज दाखल करून घ्यायला पाहिजे एवढ्याच अपेक्षासह..!

■ ■ ■

# फॅटी लिव्हरमुळे मधूमेहाच्या समस्या होतात का?



फॅटी लिव्हर ही आजच्या जीवनशैलीशी संबंधित एक सामान्य पण गंभीर समस्या असून यामध्ये यकृतात (लिव्हरमध्ये) अतिरिक्त चरबी साठू लागते. फॅटी लिव्हर होण्यामागील मुख्य कारण म्हणजे असंतुलित आहार आणि वाढलेली चरबी. जास्त तेलकट, तळलेले पदार्थ, फास्ट फूड, गोड पदार्थ, साखरयुक्त पेये आणि प्रक्रिया केलेले अन्न यांचे अति सेवन केल्यास यकृतावर अतिरिक्त ताण पडतो.

लठ्ठपणा, वाढलेले वजन आणि शारीरिक हालचालींचा अभाव हे फॅटी लिव्हरचे प्रमुख धोके मानले जातात. याशिवाय मधुमेह, इन्सुलिन रेसिस्टन्स आणि कोलेस्ट्रॉलची पातळी वाढणे यामुळेही यकृतात चरबी साठण्याची प्रक्रिया वेगाने होते. मद्यपान करणा ?्या व्यक्तींमध्ये अल्कोहोलमुळे लिव्हरच्या पेशींवर थेट परिणाम होतो, ज्यामुळे अल्कोहोलिक फॅटी लिव्हरची समस्या निर्माण होते.

याशिवाय काही इतर घटकही फॅटी लिव्हरसाठी जबाबदार ठरतात. सततचा तणाव, अपुरी झोप आणि हार्मोनल असंतुलन यामुळे शरीराचा चयापचय बिघडतो, ज्याचा परिणाम यकृतावर होतो. थायरॉईडचे विकार, पॉलिसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम आणि काही औषधांचा दीर्घकाळ वापर यामुळेही फॅटी लिव्हरचा धोका वाढतो.

आनुवंशिकता आणि वाढते वय हेही या समस्येस कारणीभूत ठरू शकतात. सुरुवातीच्या टप्प्यात फॅटी लिव्हरची लक्षणे फारशी जाणवत नाहीत, पण दुर्लक्ष केल्यास लिव्हरमध्ये सूज, फायब्रोसिस किंवा सिरोसिससारख्या स्थिती निर्माण होऊ शकतात.

त्यामुळे वेळेवर संतुलित आहार, नियमित व्यायाम, वजन नियंत्रण, मद्यपान टाळणे आणि तणावमुक्त जीवनशैली स्वीकारणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य काळजी घेतल्यास फॅटी लिव्हरची समस्या नियंत्रणात ठेवता येते आणि लिव्हरचे आरोग्य सुधारता येते.

जेव्हा यकृतामध्ये जास्त चरबी जमा होऊ लागते तेव्हा फॅटी लिव्हर होतो. ही स्थिती यकृताच्या सामान्य कार्यावर परिणाम करते आणि हळूहळू शरीराच्या चयापचयवर परिणाम करते. अशा परिस्थितीत, त्याचा परिणाम रक्तातील साखरेच्या पातळीवर आणि इन्सुलिनवरही होऊ लागतो, ज्यामुळे मधुमेहाचा धोका वाढू शकतो.

फॅटी यकृत कधीकधी अनुवंशशास्त्र किंवा विशिष्ट औषधांमुळे उद्भवू शकते. सुरुवातीच्या काळात त्याची लक्षणे सहजासहजी दिसत नाहीत, त्यामुळे लोक त्याकडे दुर्लक्ष करतात.

पण कालांतराने ही स्थिती शरीरातील साखरेची पातळी आणि इन्सुलिनवर परिणाम करू लागते. अशा परिस्थितीत, फॅटी लिव्हरमुळे मधुमेहाचा धोका कसा वाढतो, त्याची लक्षणे काय आहेत आणि त्यापासून बचाव करण्यासाठी काय केले जाऊ शकते हे समजून घेणे महत्वाचे आहे.

शरीरातील साखर नियंत्रित करण्यात यकृत महत्त्वाची भूमिका बजावते. जेव्हा यकृतामध्ये जास्त चरबी जमा होते तेव्हा त्याच्या सामान्य कार्यावर परिणाम होऊ लागतो. याचा शरीरातील इन्सुलिनवर योग्य परिणाम होत नाही.

**(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)**

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## मॅरेज ॲनिव्हर्सरी

ॲनिव्हर्सरी सेलीब्रेशनच्या
निमित्ताने प्रश्न येतो मनात
खरचं का हे सुखी आहेत
आपल्या वैवाहीक जीवनात

केवळ लोकोपचार
म्हणून तर नाही ना ?
साजरी करताहेत
मॅरेज ॲनिव्हर्सरी ..

चिंतन करा प्रेम जिव्हाळा
आहे का परस्पर अंतरी
विश्वास समर्पण तडजोडीने
सुखाची अनुभूती
येते संसारी ..

## एओर्टिक डायसेक्शन: जेव्हा प्रत्येक मिनिट महत्त्वाचा असतो : डॉ. समित पाठक



**नागपूर, २० जानेवारी :** एओर्टिक डायसेक्शन ही एक दुर्मिळ परंतु अत्यंत धोकादायक स्थिती आहे, ज्यामध्ये हृदयापासून रक्त वाहून नेणाऱ्या मुख्य धमनीला (एओर्टा/महाधमनी) आतून चीर किंवा तडा जातो . जेव्हा असे घडते, तेव्हा रक्त धमनीच्या थरांमध्ये शिरते, ज्यामुळे रक्तवाहिनी फुटण्याचा आणि अचानक मृत्यू ओढवण्याचा गंभीर धोका निर्माण होतो.

**लक्षणे आणि तातडीची कृती :** या आजाराची लक्षणेजसे की छातीत किंवा पाठीत अचानक तीव्र वेदना होणे, चक्कर येणे किंवा बेशुद्ध पडणेबऱ्याचदा हृदयविकाराच्या झटक्यासारखी किंवा पाठीच्या तीव्र दुखण्यासारखी वाटू शकतात. त्यामुळेच, याची लवकर ओळख पटणे आणि त्वरित उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रत्येक मिनिट महत्त्वाचा असतो आणि धोक्याची चिन्हे समजून घेतल्यास रुग्णाचे प्राण वाचू शकतात.

**रुग्ण प्रकरण :** एका आपत्कालीन प्रसंगात, एक रुग्ण छातीत आणि पाठीत तीव्र वेदना होत असताना रुग्णालयात दाखल झाला . प्रगत तपासण्यांनुसार त्यांना 'टाइप ए एओर्टिक डायसेक्शन' झाल्याचे निष्पन्न झाले. हे हृदयाजवळील भागात झालेली एक धोकादायक चीर होती, ज्यासाठी तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते. शस्त्रक्रिया करणाऱ्या टीमने रक्तदाब स्थिर करण्यासाठी, रक्तप्रवाह सुरळीत करण्यासाठी आणि ती धमनी दुरुस्त करण्यासाठी एका पद्धतशीर प्रोटोकॉलचे पालन केले .

**उपचार आणि फायदे :** एओर्टिक डायसेक्शनच्या उपचारामध्ये एक पद्धतशीर वैद्यकीय आणि शस्त्रक्रिया दृष्टिकोन समाविष्ट असतो . चीर नेमकी कुठे आहे आणि तिची तीव्रता किती आहे, यावर अवलंबून रुग्णांवर 'ओपन-हार्टसर्जरी' केली जाऊ शकते किंवा रक्तप्रवाह सुरळीत करण्यासाठी लहान चीर आणि प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून 'मिनिमली इन्वेसिव्ह' शस्त्रक्रिया केली जाऊ शकते .

**धोका कोणाला असू शकतो ? :** उच्च जोखीम असलेल्या व्यक्तींनीज्यांचा रक्तदाब अनियंत्रित आहे, ज्यांची पूर्वी हृदयाची शस्त्रक्रिया झाली आहे, ज्यांना रक्तवाहिन्यांचे आजार आहेत किंवा 'कनेक्टिव्ह टिश्यू डिसऑर्डर' आहेत्यांनी विशेषतः सावध राहणे आवश्यक आहे. वैद्यकीय मदत घेण्यास झालेला थोडासा उशीरही भयंकर परिणाम करू शकतो . त्यामुळे छातीत किंवा पाठीत अचानक होणाऱ्या वेदना, चक्कर येणे किंवा बेशुद्ध पडणे याबद्दल जनजागृती असणे अत्यंत महत्त्वाचे आहे .

**तज्ज्ञांचे मत :** वेळेवर निदान, जलद उपचार आणि पद्धतशीर काळजी घेण्याच्या योजनेचे पालन केल्यास प्राण वाचतात, असे डॉ. समित पाठक, कन्सल्टंट कार्डिओ थोरॅसिक आणि व्हॅस्क्युलर सर्जन स्पष्ट करतात .

ते पुढे म्हणतात, आधुनिक शस्त्रक्रिया तंत्रज्ञानामुळे आम्हाला ती चीर सुरक्षितपणे दुरुस्त करणे, रक्तप्रवाह पूर्ववत करणे आणि अवयवांचे नुकसान टाळणे शक्य झाले आहे. जे रुग्ण लवकर पोहोचतात आणि ज्यांना त्वरित उपचार मिळतात, ते अनेकदा पूर्णपणे बरे होतात आणि त्यांच्या दैनंदिन जीवनात परततात. ज्यांना धोका आहे, त्यांच्यासाठी नियमित तपासणी आणि रक्तदाब नियंत्रण आवश्यक आहे. जागरूकता आणि त्वरित कृती खरोखरच रुग्णाचे नशीब बदलू शकते.

एओर्टिक डायसेक्शन ही एक वैद्यकीय आणीबाणी आहे, परंतु त्वरित ओळख, पद्धतशीर शस्त्रक्रिया व वैद्यकीय उपचार आणि काळजीपूर्वक पाठपुरावा केल्यास रुग्ण वाचू शकतात, पूर्णपणे बरे होऊ शकतात आणि सुरक्षितपणे सामान्य जीवन जगू शकतात .

## महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी गोदरेज ॲग्रोव्हेटची महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानासोबत भागीदारी

**यवतमाळ, २० जानेवारी :** अग्रगण्य कृषी-व्यवसाय कंपनी असलेल्या गोदरेज ॲग्रोव्हेट लिमिटेडने (गोदरेज ॲग्रोव्हेट) ग्रामीण शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी आणि शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम-उमेद) सोबत सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षरी केल्याची घोषणा आज केली. २०२६ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' (आयवायडब्ल्यूएफ २०२६) म्हणून साजरे करण्याच्या संयुक्त राष्ट्राच्या घोषणेशी हे सहकार्य सुसंगत आहे. या अंतर्गत कृषी-अन्नप्रणालीमध्ये महिलांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकते आणि लैंगिक समानता दूर करण्यासाठी व उपजीविका मजबूत करण्यासाठी कृती करण्याचे आवाहन करते. तीन वर्षांच्या या भागीदारीचा उद्देश स्वयंसहायता गट (एसएचजी) आणि महिला शेतकऱ्यांना चांगल्या कृषी पद्धती (जीएपी) आणि एकात्मिक कीड व्यवस्थापन (आयपीएम) स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित करणे, शेतीची उत्पादकता सुधारणे आणि लवचिक उपजीविका निर्माण करणे हा आहे.

या भागीदारीवर भाष्य करताना, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे (एमएसआरएलएम-उमेद) मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर (आयएएस) म्हणाले, हा सामंजस्य करार तळागाळातील संस्थांना बळकट करून, त्यांच्या उपजीविकेमध्ये वाढ करून ग्रामीण महिलांना सक्षम करण्याच्या आमच्या ध्येयाशी सुसंगत आहे. आमच्या नेटवर्कचा आणि गोदरेज ॲग्रोव्हेटच्या कौशल्याचा उपयोग करून,



आमच्या महिला शेतकऱ्यांना शेतीचे कार्यक्षमतेने व्यवस्थापन करण्यासाठी तसेच ग्रामीण महाराष्ट्राची सामाजिक-आर्थिकस्थिती सुधारण्यासाठी वैज्ञानिक पीक व्यवस्थापन पद्धतींनी सुसज्ज करणे, हा आमचा उद्देश आहे.

गोदरेज ॲग्रोव्हेटचे सीईओ आणि एमडी सुनील कटारिया म्हणाले, भारतीय शेती एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे, जिथे उत्पादकता, शाश्वतता आणि सर्वसमावेशकता यांची एकत्रित प्रगती होणे आवश्यक आहे. गोदरेज ॲग्रोव्हेटमध्ये आम्ही महिला शेतकऱ्यांना या परिवर्तनाचा केंद्रबिंदू मानतो. संशोधन आणि सामुदायिक सहभागाच्या समन्वयातून भारतीय शेतीत शाश्वत वाढ घडवून आणण्यासाठी कटिबद्ध असलेली एक संस्था म्हणून, आम्हाला एमएसआरएलएम-उमेदसोबत भागीदारी करताना आनंद होतो आहे. या भागीदारीद्वारे, आम्ही महिला शेतकऱ्यांना उच्च-परिणामकारकआणि व्यावहारिक कृषी तंत्रज्ञानाने सुसज्ज करण्याचे ध्येय ठेवले आहे, जेणेकरून त्या अधिक चांगले उत्पादन मिळवू शकतील आणि त्यांच्या कुटुंबाचा उत्कर्ष करू शकतील.

या उपक्रमाच्या तांत्रिक पैलूवर प्रकाश टाकताना, गोदरेज ॲग्रोव्हेट लिमिटेडच्या पीक संरक्षण व्यवसायाचे सीईओ, राजवेलू एन.के. म्हणाले, महाराष्ट्र हे भारतातील सर्वात महत्त्वाच्या कापूस उत्पादक राज्यांपैकी एक आहे आणि येथील शेतकऱ्यांसमोरील आव्हाने सोडवण्यासाठी विज्ञान-आधारित, प्रदेश-विशिष्टदृष्टिकोनाची आवश्यकता आहे. योग्य वेळी योग्य तोडगा काढणे महत्त्वाचे असल्याने, हे सहकार्य केवळ तत्काळ कृषीविषयक सुधारणांसाठीच नव्हे, तर एक अनुकरणीय, ज्ञान-आधारित पीक संरक्षण आराखडा तयार करण्यासाठी प्रेरणा म्हणून काम करेल, जो कालांतराने विविध भौगोलिक प्रदेशांमध्ये आणि वेगवेगळ्या पिकांसाठी लागू केला जाऊ शकतो.

या सहकार्याच्या व्यापक परिणामांवर जोर देत, गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपचे ग्रुप प्रेसिडेंट कॉर्पोरेट अफेअर्स, राकेश स्वामी म्हणाले, सामान्य लोक आणि पर्यावरण हे आमच्या कोणत्याही उद्देशाच्या केंद्रस्थानी असतात. उद्योग आणि सार्वजनिक संस्था कशा प्रकारे एकत्र येऊन महत्त्वपूर्ण सामाजिक बदल घडवून आणू शकतात, याचे एमएसआरएलएम-उमेदसोबतचा हा उपक्रम म्हणजे एक उत्तम उदाहरण आहे. महिला शेतकऱ्यांना सक्षम केल्याने केवळ कृषी उत्पादकताच वाढत नाही, तर ग्रामीण समाजही मजबूत होतो.

महिला शेतकऱ्यांना वैज्ञानिक पद्धती अवलंबण्यास, मार्केट नेटवर्कपर्यंत पोहोचण्यास आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम करून, हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात उत्पादकता, उपजीविका आणि ग्रामीण लवचिकतेमध्ये चिरस्थायी सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करतो.



## टाटा मोटर्सकडून १७ नेक्स्ट-जनरेशनट्रक्स लाँच ;

**नवी दिल्ली, २० जानेवारी :** भारतातील ट्रकिंग क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलत टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक व गतीशीलता सोल्यूशन्स प्रदाता कंपनीने आज आपल्या १७ ट्रक्सचा नेक्स्ट-जनरेशनपोर्टफोलिओ लाँच केला. हे ट्रक्स ७ टन ते ५५ टन कन्फिग्युरेशन्समध्ये उपलब्ध आहेत. यासह सुरक्षितता, नफा व प्रगतीमध्ये नवीन मापदंड स्थापित केले आहे. या सर्वसमावेशक लाँचमध्ये ऑल-न्यू अझुरा सिरीज, अत्याधुनिक टाटा ट्रक्स.ईव्ही श्रेणी आणि प्रस्थापित प्राइमा, सिग्ना व अल्ट्रा प्लॅटफॉर्म्समधील मोठ्या अपग्रेड्सचा समावेश आहे. जागतिक सुरक्षितता मानकांचे (ईसीई आर२९ ०३) काटेकोरपणे पालन करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेले हे ट्रक्स उत्पन्न क्षमता वाढवतात, एकूण मालकीहक्क खर्च कमी करतात आणि वेईकल अपटाइम वाढवतात, ज्यामुळे वाहतूकदारांना मोठे यश मिळते.

नवीन ट्रक्स लाँच करत टाटा मोटर्स लि.चे एमडी व सीईओ गिरीश वाघ म्हणाले, भारतातील ट्रकिंग क्षेत्रात झपाट्याने परिवर्तन होत आहे, ज्याला प्रगतीशील राष्ट्रीय धोरणे, आधुनिक पायाभूत सुविधा आणि सुरक्षित, अधिक स्वच्छ व अधिक कार्यक्षम लॉजिस्टिक्ससाठी वाढत्या मागणीने गती दिली आहे. टाटा मोटर्स मापदंड स्थापित करण्यामध्ये नेहमी अग्रस्थानी आहे, जे उद्योगाच्या भविष्याला आकार देतात. लाँच करण्यात आलेल्या आमच्या नेक्स्ट-जनरेशन पोर्टफोलिओमध्ये ऑल-न्यू अझुरा सिरीज, दोन प्रगत उच्च-कार्यक्षम पॉवरट्रेन्स, आमच्या नवीन आय-एमओईव्ही आर्किटेक्चरवर आधारित भारतातील शून्य-उत्सर्जनइलेक्ट्रिक ट्रक्स व ट्रिपर्सची व्यापक श्रेणी, युरोपियन मानक केबिन्स व उद्योग-अग्रणीसुरक्षितता वैशिष्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अपग्रेड्स, अधिक पेलोड क्षमता आणि इंधन कार्यक्षमतेचा समावेश आहे, जे सर्व फ्लीट एज डिजिटल सेवांसह एकीकृत करण्यात आले आहेत. यासह आम्ही या वारशाला अधिक पुढे नेत आहोत. बेटर ऑल्वेज' तत्त्वामधून प्रेरित आमची नाविन्यतेप्रती अविरत मोहिम, स्थानिकीकरणाप्रती दृढ कटिबद्धता आणि ग्राहकांना यशस्वी करण्यावरील निरंतर फोकस आत्मनिर्भर भारत'च्या दृष्टिकोनाशी संलग्न आहेत, ज्यामुळे शाश्वत गतीशीलतेमध्ये नेतृत्व करण्याप्रती भारताचा आत्मनिर्भरपणा व महत्त्वाकांक्षा अधिक दृढ झाली आहे.''

## कस्तुरी मेटल कॉम्पोझिट लिमिटेड (केएमसीएल) ने पीपी साठी ६१-६४प्राइस बँड जाहीर केला

**मुंबई, २० जानेवारी :** कस्तुरी मेटल कॉम्पोझिट लिमिटेड (केएमसीएल) इंजिनिअर्ड स्टील फायबर्स आणि इंडस्ट्रियल फ्लोरिंग सोल्युशन्सची निर्माती व सेवा पुरवणारी कंपनी यांनी प्रस्तावित प्रारंभिक सार्वजनिक इश्यू (पीपी) साठी प्रति इक्विटी शेअर ६१-६४असा प्राइस बँड निश्चित केला आहे. पीपी २७ जानेवारी २०२६ रोजी उघडेल आणि २९ जानेवारी २०२६ रोजी बंद होईल. अँकर भाग २३ जानेवारी २०२६ रोजी उघडेल.

हा आयपीओ बुक-बिल्डिंगमार्गाने प्रति शेअर दर्शनी मूल्य १० असलेल्या २७.५२ लाख इक्विटी शेअर्सचा फ्रेश इश्यू आहे. किंमत पट्ट्याच्या वरच्या टप्प्यावर इश्यूचा आकार एकूण १७.६१ कोटी इतका होतो.

कंपनीचे शेअर्स बीएसई एसएमई (बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजचे एसएमई प्लॅटफॉर्म) वर सूचीबद्ध होणार आहेत. गुंतवणूकदार किमान ४,००० इक्विटी शेअर्ससाठी बोली लावू शकतात आणि त्यानंतर २,००० शेअर्सच्या पटीत बोली लावता येईल.

ऑफर डॉक्युमेंटमध्ये नमूद केल्यानुसार, पीपी मधून मिळणाऱ्या निधीपैकी मोठा हिस्सा महाराष्ट्रातील अमरावती येथे नवीन उत्पादन सुविधा उभारण्यासाठी भांडवली खर्चासाठी वापरण्याचा प्रस्ताव आहे. सुमारे १५,३०० चौ. मी. क्षेत्रफळावर प्रस्तावित असलेल्या या सुविधेत वार्षिक ६,००० एमटी क्षमतेचा स्टील फायबर उत्पादन प्रकल्प आणि वार्षिक ५०० क्षमतेचा मॅक्रो सिंथेटिक पीपी फायबर उत्पादन प्रकल्प समाविष्ट असेल. ऑफर डॉक्युमेंटमध्ये दिलेल्या तपशिलानुसार निधीपैकी काही भाग सामान्य कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठीही वापरण्याचा प्रस्ताव आहे.

२००५ मध्ये स्थापन झालेली केएमसीएल ही कंपनी कॉंक्रीट रिइन्फोर्समेंट आणि ऑटोमोटिव्ह ब्रेकिंग अनुप्रयोगांसाठी अनुक्रमे वापरल्या जाणाऱ्या स्टील फायबर आणि स्टील वूल फायबर उत्पादनांचे उत्पादन, पुरवठा आणि निर्यात करते. कंपनी सध्या अमरावती येथे स्टील फायबर व स्टील वूल फायबरची तीन विद्यमान उत्पादन युनिट्स चालवते. आपल्या उपकंपनी दुरफ्लोर कॉंक्रीट सोल्युशन्स एलएलपी द्वारे केएमसीएल औद्योगिक आणि वेअरहाऊसिंग अनुप्रयोगांसाठी विशेष फ्लोरिंग सोल्युशन्सही प्रदान करते.

## करुणामूर्ती डॉ. देवची व्यक्तिरेखा जिवंत करताना माझ्या बहिणींकडून मला प्रेरणा मिळाली: इकबाल खान

### सोनी सबवरील 'हुई गुम यादें एक डॉक्टर, दो जिंदगियां' मालिका



**मुंबई, २० जानेवारी :** सोनी सबवर लवकरच 'हुई गुम यादें एक डॉक्टर, दो जिंदगियां' ही मालिका सुरू होत आहे, ज्यामध्ये एका डॉक्टरची हृद्य कहाणी सांगितली आहे. या डॉक्टरची स्मृती गेल्यामुळे त्याचे आयुष्य बदलले आहे. आणि या प्रक्रियेत आपल्या रुग्णांकडे बघण्याची त्याची दृष्टी केवळ वैद्यकीय न राहता अधिक माणुसकी आणि करुणा त्याच्यात आली आहे. डॉ. देव (इकबाल खान) आपला भविष्यकाळ पुन्हा मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहेच, पण तसे करताना हळूहळू त्याच्या हे लक्षात येऊ लागले आहे की, एका डॉक्टरकडे करुणाभाव असणे किती आवश्यक आहे.

या प्रभावाविषयी बोलताना इकबाल खान म्हणतो, माझ्या दोन्ही बहिणी डॉक्टर आहेत आणि त्या आपल्या रुग्णांच्या बाबतीत किती करुणा, आपलेपणा दाखवतात हे मी पहिल्यापासून पाहिले आहे. त्या आपल्या रुग्णांचे म्हणणे किती शांतपणे ऐकून घेतात, त्यांना तणावाच्या क्षणी आधार देतात हे पाहिले आहे. माझी बहीण सबिना ऑस्ट्रेलियात असते आणि रुग्णाशी बोलताना ती खूप जागरूक, एकाग्र असते. ती रुग्णाची केवळ लक्षणे बघत नाही, तर त्याच्या भावना, आसपासची परिस्थिती याचाही अंदाज घेत असते. डॉ. देवच्या भूमिकेची तयारी करताना मी तो शांतपणा, आश्वासक भाव जाणीवपूर्वक आणण्याचा प्रयत्न केला आहे. तो कसा बोलतो, कसा ऐकतो आणि शांतपणे प्रतिक्रिया देतो यावर काम केले आहे. मला हे जाणवले आहे की, डॉक्टर होणे म्हणजे केवळ तुमच्यातले वैद्यकीय कौशल्य विकसित करणे नाही, तर त्यात करुणेचा भाव खूप महत्त्वाचा आहे. माझ्या प्रत्येक दृश्यात हा भाव आणण्याचा मी प्रयत्न केला आहे.

## मानसिक आरोग्यासाठी नवीन उपक्रम : शालिनीताई मेघे हॉस्पिटलकडून आदिवासी भागात मानसोपचार सेवा

**नागपूर, २० जानेवारी :** शालिनीताई मेघे हॉस्पिटल आणि जीएएसव्हीएस एकत्र येऊन ग्रामीण आणि आदिवासी भागातील गावकरी आणि शेतकऱ्यांसाठी मानसिक आरोग्य सुधारण्याचा उपक्रम सुरू करत आहेत. शेतीतील ताण, आर्थिक अडचणी, एकटेपणा आणि तज्ज्ञ उपचारांची कमी यामुळे गावकऱ्यांमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. त्यासाठी मध्य प्रदेशमधील जामसावली, सौसर येथे समुदायाच्या मानसिक आरोग्यासाठी एक महत्वाचा कार्यक्रम राबवला जाणार आहे. लवकरच, चमत्कारिक श्री हनुमान मंदिर संस्थान (हनुमान लोक) परिसरातील ग्रामीण आदिवासी समाज विकास संस्थान (जीएएसव्हीएस) च्या मानसिक आरोग्य केंद्रावर ठराविक दिवशी मोफत मानसोपचार ओपीडी सुरू होणार आहे.

या सेवा शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, वानाडोंगरी, नागपूर येथील अनुभवी मानसोपचारतज्ज्ञ देणार आहेत. शिक्षणसंस्था असलेल्या १०२० बेड्सच्या या हॉस्पिटलने केवळ सहा वर्षांतच डॉक्टर, परिचारिका आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या पूर्ण वेळ कार्यरत प्रशिक्षित टीमद्वारे संपूर्ण सुपर-स्पेशालिटीसेवा देऊन चांगली ओळख निर्माण केली आहे.

शालिनीताई मेघे हॉस्पिटल हे एक शिक्षण हॉस्पिटल असून, इथे सरकारी योजनांमध्ये न समाविष्ट असलेल्या रुग्णांनाही कमी खर्चात, नैतिक व दर्जेदार उपचार दिले जातात. हॉस्पिटलमध्ये ६० बेड्सचे अतिदक्षता विभाग (आयसीयू), जेरियाट्रिक व पॅलियेटिव्ह केअर वॉर्ड, मिल्क बँक, २६ बेड्सचे नवजात अतिदक्षता विभाग



(एनआयसीयू), ११ ऑपरेशन थिएटर्स आणि ३० बेड्सचे आपत्कालीन वैद्यकीय विभाग यांसारख्या सुविधा आहेत.

या नव्या सहकार्याअंतर्गत ग्रामीण, आदिवासी आणि शेतकरी समुदायातील मानसिक आजारांनी त्रस्त रुग्णांना जीएएसव्हीएस केंद्रात मोफत बाह्यरुग्ण (ओपीडी) मानसोपचार सल्ला दिला जाणार आहे. ज्या रुग्णांना रुग्णालयात दाखल होण्याची गरज आहे, त्यांच्यासाठी शालिनीताई मेघे हॉस्पिटल, नागपूर येथे उपचारासाठी ठराविक रेफरल व्यवस्था करण्यात आली आहे. ज्यामुळे उपचार सातत्यपूर्ण, परवडणारे आणि दर्जेदार राहतील. हा उपक्रम फक्त उपचारापुरता मर्यादित न राहता, मानसिक आरोग्यावरील कलंक दूर करणे, लवकर उपचार घेण्यास प्रोत्साहन देणे आणि कमी सेवा असलेल्या भागांमध्ये मानसिक आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न करतो.

या सहकार्याला डीएमआयएचईआर (डीयू) व्यवस्थापनाने मंजुरी दिली असून, सामंजस्य करार करून ते औपचारिक करण्यात आले आहे. हा उपक्रम श्री प्रफुल वैद्य आणि डॉ. सत्यम एस. गुप्ता यांच्या महत्त्वपूर्ण प्रयत्नांमुळे शक्य झाला असून, त्यांना डॉ. नरेश गिल (उप संचालक सीएस) आणि डॉ. अनुप मरार (संचालक ऑफ कॅम्पस), डीएमआयएचईआर (डीयू) यांचे मार्गदर्शन लाभले. शालिनीताई मेघे हॉस्पिटलच्या मानसोपचार विभागातील वरिष्ठ मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अभिजीत फाये आणि डॉ. प्रदीप पाटील या सेवा देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील.

१९९१ मध्ये स्थापन झालेल्या ग्रामिण आदिवासी समाज विकास संस्थान (जीएएसव्हीएस) या संस्थेचे प्राथमिक उद्दिष्ट आदिवासी आणि वंचित समुदायांना सक्षम बनवणे आहे. अपंगत्व व मानसिक आरोग्य सेवांवर विशेष लक्ष देत संस्थेने मानसिक आरोग्य संसाधन केंद्राच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य केले आहे. हा उपक्रम जीएएसव्हीएस चे संचालक श्री श्यामराव धवळे यांच्या दूरदर्शी नेतृत्वाचे प्रतीक असून, श्री आशिष पाल (प्रकल्प व्यवस्थापक मानसिक आरोग्य, जीएएसव्हीएस) यांच्या समर्पित सहकार्यामुळे तो यशस्वी होत आहे.

या सहकार्याला चमत्कारिक श्री हनुमान मंदिर संस्थान (हनुमान लोक) यांच्या विश्वस्त मंडळाचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. यामध्ये श्री गोपाळ शर्मा (अध्यक्ष), श्री टीकाराम करोककर (सचिव) आणि श्री अजय धवळे (समिती सदस्य) यांचा समावेश आहे.


बुधवार दि. २१ जानेवारी २०२६

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | मुंबई बाजार पत्थर फोड एकच |
|---|---|
| २ ५ ६ ९ | ३ ४ ५ ८ |
| १३८ १५९ १७८ ४६९ | १४८ २३९ २४९ १७० |
| ३४५ २६७ ३५८ ३७९ | २५६ ५९० ४५६ २८८ |
| ६७९ ३५७ २४० ५७७ | ६७० ३३८ ३३९ ४४० |
| जोडी | जोडी |
| २३ - ५३ - ६१ - ९१ | ३१ - ४१ - ५० - ८० |
| २४ - ५४ - ६७ - ९७ | ३९ - ४९ - ५६ - ८६ |
| २० - ५० - ६८ - ९८ | ३७ - ४७ - ५२ - ८२ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस २१ जाने. २०२६

बुधवार दि. २१ जानेवारी २०२६

| सर्व बाजार साठी | |
|---|---|
| | ०२ - १२ - ४३ - ७३ |
| | ०५ - १५ - ४६ - ७६ |
| | ०८ - १८ - ४९ - ७९ |
| | ४७९ - ३९९ - ४५५ - १२४ |
| | २४४ - ५८८ - ७७० - ३४० |
| | ५५० - ६६९ - ३३८ - ४६७ |

सर्व बाजारासाठी

सोम. ते बुध. ओपन डे सोम. ते बुध. ओपन डे

१८९ ३७७ ४७९ १९९ ४८० ५००
२८८ ८ १६० ७ ३८९ ० २८९ ९ ५७० २ १४० ५
३७८ २५० २९९ ३७९ ६६० २३०

सोम. ते बुध. ओपन डे सोम. ते बुध. ओपन डे

२४६ २३८ ६९९ ४७० १९० १२४
३९० २ ६७० ३ २६६ ४ ५६० १ २८० ० २७८ ७
१२९ ३०० ४४६ ३८० ३७० ४४९

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
८ ९ ० १ ७

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** आज कोणताही नवीन प्रकल्प सुरू करण्यापूर्वी, तुम्ही एक सखोल योजना बनवाल आणि तुमच्या पालकांचा सल्ला घ्याल. सरकारी धोरणे आणि नियमांकडे बारकाईने लक्ष दिल्यास तुमचे काम सोपे होईल.

**वृषभ :** आरोग्याशी संबंधित समस्यांपासून तुम्हाला आराम मिळेल. क्षुल्लक गोष्टींवरून तुमच्या जोडीदाराला फटकारण्याऐवजी, त्यांना नम्रपणे गोष्टी समजावून सांगा.

**मिथुन :** खाजगी आयुष्यीतल प्रश्न मिटतील. तुमच्या मुलीची निवड एखाद्या इच्छित क्षेत्रात होण्याची शक्यता आहे. तुमच्या वैवाहिक जीवनात आनंद येईल. आज घाईघाईमुळे चुका होऊ शकतात. ताण घेऊ नका.

**कर्क :** आज, वैवाहिक जीवन सुसंवादी राहील. महिला ऑनलाइन नवीन पदार्थ शिकण्याचा प्रयत्न करतील. तुमचे वडील तुम्हाला महत्वाच्या निर्णयात पाठिंबा देतील. आज मित्रांसोबत पार्टी आयोजित करू शकता.

**सिंह :** आज तुम्ही तुमचे काम पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल. तुम्हाला प्रत्येक बाबतीत सकारात्मक राहावे लागेल. मित्रांसोबत जुन्या समस्यांवर चर्चा केल्याने तुम्हाला चांगले उपाय मिळतील.

**कन्या :** कामाच्या ठिकाणी तुम्हाला बढतीची चांगली बातमी मिळेल. स्पर्धेत मुलांना यश मिळाल्यामुळे घरातही आनंदाचे वातावरण असेल. ताण वाढवणाजया कोणत्याही गोष्टीवर जास्त लक्ष देऊ नका.

**तुळ :** तुमचा राजकीय कामाचा ताण वाढू शकतो. आज वैवाहिक कलह संपेल. वडीलधाजयांचे लक्षपूर्वक ऐका आणि व्यत्यय आणू नका. आज सर्वांशी प्रेमाने वागा, जेणेकरून लोक तुमची प्रशंसा करतील.

**वृश्चिक :** खाजगी नोकरी करणाजयांना पगार वाढेल, ज्यामुळे तुमची आर्थिक परिस्थिती सुधारेल. तुम्ही एखाद्या धार्मिक स्थळी जाण्याची योजना आखू शकता. व्यवसायातील मंदीतून तुम्हाला आराम मिळेल.


**धनु :** आज तुम्ही गोष्टी सुज्ञपणे कराल. तुमच्यासाठी उत्पन्नाचे नवीन मार्ग उघडतील. विद्यार्थ्यांना आज लेखनात रस वाढलेला दिसेल. हार्डवेअरचा व्यवसाय असलेल्यांचे दुकान चांगलं चालेल.

**मकर :** कौटुंबिक आनंद आणि समृद्धी वाढेल. आज दुकानातील विक्री चांगलीच वाढेल. आज तुम्ही जुने कर्ज फेडू शकता. तुमच्या जोडीदाराच्या भावना समजून घेण्यात तुम्ही यशस्वी व्हाल.

**कुंभ :** एम.टेक.च्या विद्यार्थ्यांना एखाद्या विषयाबद्दल गोंधळ होऊ शकतो. कोणाचा तरी सल्ला घेणे चांगले राहील. आज तुमच्या मनात सकारात्मक विचार येतील. नवीन काम, जबाबदारी अंगावर घेण्याची उत्सुकता असेल.

**मीन :** आज तुम्हाला कौटुंबिक कामासाठी बरेच पैसे खर्च करावे लागतील. आज तुम्हाला मित्राकडून पाठिंबा मिळेल. कुटुंबातील सदस्यांच्या विनोदी वागण्यामुळे घरातील वातावरण अधिक आल्हाददायक होईल.

## शब्दकोडे क्रमांक २३३२



**आडवे शब्द :-**

१) समानता च्या विरुद्ध
३) उसनवार
७) प्रकाश
८अ) आभार दर्शविणारा एक शब्द
९) धनुष्यबाण
१३) पुढे पुढे, वाढत जाणारे
१४) काळदेवता
१५) जे करावयास पाहिजे ते करणारा
१७) वृक्ष
१८) जनावरांना होणारा एक रोग
१९) एक द्विदल धान्य
२०) नाजूक
२२) मोठा, जाड हातोडा
२३) कारण, निमित्त
२५) उपयोग
२९) पोट
३०) अपशकुन
३१) पायविहीर
३३) परस्पर
३४) युद्ध
३५) पातक
३६) तरुण आणि शूर
३९) दूर करणारा
४१) कायद्याला धरुन
४३) अखंड
४४) हमाल
४६) भाजी चिरण्याचे एक साधन
४७) श्रीरामाचे एक नाव
४८) जलयान, सागरी वाहतुकीचे साधन
५०) जल
५१) युद्धातील समेट
५२) डोळे
५३) वेखंड
५५ ) अत्तराचा बोळा
५६) काळरात्र
५७) गव्हाचे पीठ.

**उभे शब्द :-**

१) भिन्न जातीचा
२) सुगंध
३) जंगली
४) शेराला वरचढ भेटणारा
५) मोठी नदी
६) त्यानंतर
७) श्रेष्ठ, उच्च (हेतू)
८) एक चर्मवाद्य
८अ) द्रव्य, पैसा अडका
१०) तल्लिन, गुंग
११) नगण्य किंमत
१२) उलगडा
१३) अर्ध्या शेराचे माप
१६) मुस्लिम सरदार
२०) हाताचा कोपरा
२१) नाश पावलेला भाग
२२) घरच्या माणसाइतका जवळचा संबंध
२४) ज्याला अनेक भाषा येतात असा
२५) चर्चा, भांडण
२६) पादत्राण
२७) प्रामाणिक
२८) आपला-परका अशी भावना
३०) अशक्त, भित्रा, मर्दपणा नसलेला
३२) पौराणिक अश्ववाहन
३४) युद्ध
३५) अलगुजे
३६) आईवडील
३७) दैववान
३८) गाईचे पिल्लू
३९) जपणूक
४०) हात
४१) च्या बरोबर
४२) बागवान
४५) बातमीदार
४६) विनंती, आर्जव
४९) नाश, प्रलय, तद्रूपता
५०) इमारतीचा मूळ आधार
५१) बूड
५४) चक्र.

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर






# वेदना कमी होतील

**आयुर्वेद आणि विकार**




वेदना ही माणसाची सर्वात मोठी समस्या आहे. वेदनांमुळे जगणं असह्य होतं. पाठ, गुडघे, डोकेदुखीपासून कॅन्सरपर्यंत विविध प्रकारच्या आजारांमुळे जाणवणाऱ्या वेदना तीव्र स्वरूपाच्या असतात. वेदनांपासून मुक्ती हेच प्रत्येक उपचारपद्धतीचं उद्दिष्ट असतं. पण वेदनाशामक औषधांच्या दुष्परिणामांचा विचार करता आयुर्वेदिक उपचारांद्वारे वेदनांवर नियंत्रण मिळवण्याचा अनेकांचा प्रयत्न असतो. आयुर्वेदानुसार वातदोष वेदनांना कारणीभूत ठरतो. वेदनांची निर्मिती आणि प्रसाराला वातच कारणीभूत ठरतो. त्यातही वायूचा विशिष्ट प्रकार विशिष्ट अवयवात वेदना निर्माण करतो. सर्वसाधारण वेदनांना व्यान वायू कारणीभूत ठरतो तर प्राण आणि व्यान वायूमुळे डोकेदुखी आणि छातीतलं दुखणं उद्‍भवतं. ओटीपोटातल्या वेदनांना समन आणि अपन वायू जबाबदार असतो.

औषधी वनस्पतींचा वापर, आहारातले बदल, पचनक्रिया सुधारणं, शरीरातली विषद्रव्यं काढून टाकणं, ताण कमी करणं, नियमित व्यायाम आदी उपायांनी वेदनांची तीव्रता कमी करता येते. वेदनांवर नियंत्रण मिळवून देणाऱ्या औषधांना आयुर्वेदात 'वेदनाष्टपन' असं म्हणतात. डोकेदुखीसाठी जटामनसी, ब्राह्मी, हरितकी, गुडुची तसंच आर्थरायटिससाठी निरगुडी, गुग्गुल, दशमूला या औषधी वनस्पती वापरल्या जातात. गॅसेसच्या समस्येमुक्तीसाठी हिंग, लवण, यवानी उपयुक्त ठरतात. औषधी तेलाच्या मसाजमुळे टिश्यूमधले विषारी घटक बाहेर पडून वेदनांपासून मुक्ती मिळते.

# हिवाळ्यात महिलांनी घ्यावी काळजी

**ऋतुबदल**



हिवाळा हा ऋतू फक्त गुलाबी थंडीच घेऊन येत नाही, तर सोबत आरोग्याच्या अनेक समस्याही येत असतात. या वातावरणाचा विशेषतः स्त्रियांच्या आरोग्यावर अधिक परिणाम होतो. या वेळी स्त्रियांच्या शरीरात मोठ्या प्रमाणात हार्मोनल बदल घडत असतात. या बदलांना बरेचदा दुर्लक्षित केले जाते, पण आरोग्यतज्ज्ञांच्या मते असे करणे टाळले पाहिजे. कारण, हिवाळ्यात शरीराची रोगप्रतिकारकशक्ती कमकुवत होते आणि व्हिटॅमिन डीची कमतरताही जाणवते. तसेच हार्मोनल बदलांमुळे स्त्रियांच्या शरीरातील एस्ट्रोजन आणि कोर्टिसोलची कमतरताही जाणवू शकते.

हिवाळ्यात थंड वातावरणामुळे सूर्यप्रकाशाची कमतरता भासते. त्यामुळे शरीरातील झोपेच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेला मेलाटोनिन या हार्मोनचे प्रमाण वाढते. यामुळे मूड सुधारण्यासाठीच्या हार्मोनचे प्रमाण कमी होते आणि झोपेची समस्या होऊन मूडमध्ये बदल होतात. तसेच थंड हवामानाला प्रतिसाद म्हणून स्त्रियांचे शरीर तणाव हार्मोन म्हणजेच कॉर्टिसॉल निर्माण करण्यास जास्त प्रमाणावर भर देतो. त्यामुळे मासिक पाळीवरही परिणाम होण्याची शक्यता असते.

याशिवाय कमी शरीराला पुरेसा प्रमाणात सूर्यप्रकाश न मिळाल्याने थायरॉईड ग्रंथी आणि चयापचय क्रिया मंदावते. त्यामुळे मासिक पाळी जास्त काळ टिकू शकते.

थंडीमुळे स्त्रियांच्या शरीराची जास्त हालचाल होत नाही. त्यामुळे रक्तप्रवाह कमी होतो आणि पीएमएस (पीएमएस) होण्याची शक्यता वाढते. यामुळे मासिक पाळीदरम्यान पोटदुखीच्या वेदना अधिक प्रमाणात वाढू शकतात. सूर्यप्रकाशाच्या कमतरतेमुळे व्हिटॅमिन डीची पातळी घटते. त्यामुळे हार्मोन्सचे संतुलन बिघडते.

हिवाळ्यात स्त्रियांच्या शरीरात सूर्यप्रकाशाच्या अभावामुळे सेरोटोनिन आणि व्हिटॅमिन डीची पातळी कमी होते. शारीरिक आरोग्यावर तसेच मानसिक आरोग्यावरही परिणाम होण्याची शक्यता असते. यामुळे शारीरिक आणि मानसिक थकवा जाणवतो.

महत्त्वाचे म्हणजे मासिक पाळीवर अधिक परिणाम होतो. कमी सूर्यप्रकाशामुळे 'एफएसएच' (फॉलिकल स्टिम्युलेटिंग हार्मोन) चे प्रमाण कमी होते. त्यामुळे मासिक पाळी लांबणे किंवा अनियमित होण्याची शक्यता असते. याशिवाय थंड वातावरणामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. त्यामुळे गर्भाशयातील रक्तप्रवाह कमी होतो आणि वेदना वाढतात. तसेच पीएमएस (प्रीमेन्स्ट्रुअल सिंड्रोम) ची लक्षणे दिसू लागतात, जसे की स्तनांमधील वेदना आणि मूड स्विंग्जची तीव्रता अधिक वाढू शकते.

थायरॉईडच्या हार्मोनमध्ये बदल झाल्याने केस कमकुवत होणे, गळणे, त्वचा कोरडी होणे, मुरुमे येणे, त्वचेचा पोत बदलणे याशिवाय; चयापचय मंदावल्याने वजन अचानक वाढणे किंवा घटणे, रोगप्रतिकारशक्ती कमकुवत झाल्याने सर्दी-खोकला आणि इतर आजारांचा धोका वाढण्याची शक्यता असते.

फील-गुड हार्मोन म्हणजेच सेरोटोनिनचे प्रमाण कमी झाल्याने चिडचिड, चिंता आणि नैराश्याची भावना वाढू शकते. ऊर्जेची पातळी कमी झाल्यामुळे थकवा येणे आणि एकाग्रतेचा अभाव जाणवल्यामुळे लक्ष केंद्रित करण्यात अडचण यणे अशा मानसिक आरोग्याच्या समस्या जाणवतात.

**काय कराल?**

* शरीराला पुरेशा प्रमाणात सूर्यप्रकाश मिळावा यासाठी शक्य असल्यास सकाळी थोडा वेळ उन्हात थांबा.
* डॉक्टरांच्या सल्ल्याने व्हिटॅमिन डी सप्लीमेंट्स घ्या.
* शरीराच्या हालचालीसाठी नियमित व्यायाम करा.
* शरीराला योग्य पोषण मिळावे यासाठी संतुलित आहार घ्या.
* ताण कमी करण्यासाठी योगा आणि ध्यानधारणा करा.

# अगरबत्ती, धुपामुळे कर्करोगाची शक्यता?

**नवे संशोधन**

देवघरात आपण धूप आणि अगरबत्ती लावतोच लावतो. घर प्रसन्न ठेवण्यासाठी सकाळी आणि संध्याकाळी पूजेच्या वेळी धूप आणि अगरबत्ती लावली जाते. अनेक घरांमध्ये सकाळी किंवा संध्याकाळी तर धूप आणि अगरबत्तीच्या धुराने भरलेली पाहायला मिळतात. धूप अगरबत्तीने घर भरल्याने काहींना प्रसन्न वाटतही असेल, पण आरोग्यासाठी ते अतिशय धोकादायक असल्याची गंभीर बाब समोर आली. पुण्याच्या 'चेस्ट रिसर्च फाऊंडेशन'ने केलेल्या एका संशोधनात घरात धूप जाळल्यानंतर होणारा सुगंधी धूर हा ५०० सिगारेट्सएवढा धोकादायक असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला.

**धुपाच्या धुरात कोणते विषारी घटक?**

* कार्बनडाय ऑक्साईड
* नायट्रोजन ऑक्साईड
* फॉर्म अल्डिहाईड

धूप अगरबत्तीच्या धुरातील हे घटक माणसाला भयानक आजार देऊन जातात. धुपाचा गंध जेवढा मनमोहक असतो, जेवढा भक्तिमय वातावरणाची अनुभूती देतो तेवढाच तो आरोग्यासाठी भयानक असतो.



**धुपाच्या धुरामुळे होणारे आजार**

* कॅन्सर
* दमा खोकला
* फुफ्फुस कमकुवत होणे
* अॅलर्जी
* डोकेदुखी
* डोळ्यांचे विकार
* एकाग्रता ढळणे
* डिमेंशिया
* अल्झायमर

**उपाय काय?**

* धूप अगरबत्ती मोकळ्या जागेत लावावी
* बंद खोलीत धुपाचा धूर करू नये. धूप अगरबत्ती लावल्यास खिडक्या दारे उघड्या ठेवाव्यात
* लहान मुलांना धुपाचा धूर झालेल्या ठिकाणी ठेऊ नये * दमा, अस्थमा असलेल्या रुग्णांनी धुपाचा धूर टाळावा. घरातील वातावरण प्रसन्न राखण्यासाठी घरातील खेळती हवा ठेवा. मोकळ्या जागेत धूप श्वास कोंडणारा वाटत नाही. उलट खेळत्या हवेतला धूप मन अधिक प्रसन्न ठेवतो.

# कॅल्शियमचे लाभ मिळवायचे तर...

**माहित असावे**




हाडांसंबंधीच्या दुखण्यामुळे अनेक अडचणींना सामोरं जावं लागतं. मुख्य म्हणजे या दुखण्याचा वयाशी कोणताही संबंध नसतो. सदोष जीवनशैली, आहाराकडे होणारं दुर्लक्ष आणि पोषक घटकांच्या कमतरतेमुळे लहान मुलं, किशोर तसंच तरुणांमध्येही पाठदुखी, गुडघेदुखीचं प्रमाण वाढलं आहे. या समस्येला आळा घालण्यासाठी पोषक आहार घ्यायला हवा.

* कॅल्शियममुळे हाडं बळकट होत असली तरी हा पोषक घटक कार्यरत राहण्यासाठी सहाय्यक घटकांची गरज असते. त्यापैकी एक म्हणजे 'ड' जीवनसत्त्व. पालेभाज्या, सुका मेवा, दुग्धजन्य पदार्थांमधून कॅल्शियम मिळत असलं तरी सूर्यप्रकाश हा ड जीवनसत्त्वाचा प्रमुख स्रोत आहे. या जीवनसत्त्वाची कमतरता भरून काढण्यासाठी पूरक औषधांची गरज असते.
* अतिरिक्त आम्लपित्तामुळे हाडं कमकुवत होतात. या समस्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी लिंबूपाणी, कच्च्या बटाट्याचा रस, कोकम सरबत यांचं सेवन करायला हवं.

# 'एअर प्युरीफायर' सुरू ठेवून झोपताय?

**आरोग्यमंत्र**



हिवाळ्यात हवा कोरडी होणे, प्रदूषण वाढणे आणि 'एक्यूआय' सतत 'खराब' पातळीवर जाणे-या तिन्ही गोष्टींमुळे घरातील हवेची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात बिघडते. अशा वेळी 'एअर प्युरीफायर्स'चा वापर अपरिहार्य बनतो, परंतु प्युरीफायर सतत चालू ठेवल्यास घरातील आर्द्रता घटते. 'एअर प्युरीफायर्स' थेट ओलावा कमी करत नाहीत, पण बंद खोलीत ते सतत हाय मोडवर चालू ठेवल्यास घरातील आर्द्रता घटते. कमी आर्द्रतेमुळे नाक, घसा आणि श्वसनमार्गाची आवरणे संवेदनशील होतात. त्यामुळे कोरडेपणा, खवखव, खोकला, आणि डोळे जळजळणे यांसारखे त्रास होऊ शकतात. स्वच्छ हवा महत्त्वाची आहे, पण फुफ्फुसांना स्वच्छ आणि किंचित आर्द्र हवा सर्वात जास्त आवडते. 'एक्यूआय' खूप वाढलेल्या दिवसात, विशेषतः मुलांसाठी, ज्येष्ठांसाठी आणि दमा/ अॅलर्जी असलेल्या लोकांसाठी, प्युरीफायर आवश्यकच असतात. उपाय म्हणजे ते बंद करणे नाही, तर योग्य पद्धतीने वापरणे. ऑटो मोडचा वापर करा, काही तासांनी मशीन बंद ठेवा आणि खोली पूर्णतः सील करून दीर्घकाळ चालू ठेवणे टाळा. योग्य ओलावा राखण्यासाठी प्युरीफायरसोबत ह्युमिडिफायर, पाण्याचे भांडे किंवा ओला टॉवेल यांचाही उपयोग होतो. घरातील आर्द्रता आदर्शपणे ४०-६० टक्क्यांदरम्यान असावी.

सतत घसा खवखवणे, सकाळी नाकातून रक्त येणे, कोरडा खोकला, त्वचेला जाणवणारा कोरडेपणा किंवा श्वसनमार्गात खडबडीतपणा जाणवणे, ही सर्व लक्षणे हवेतील अत्यल्प आर्द्रतेचे संकेत असू शकतात. प्युरीफायरचा मर्यादित वापर करा. सतत 'टर्बो' मोडवर ठेवू नका.

# वृद्धत्वाची सुरुवात वयाच्या पस्तिशीतूनच

**धोका ओळखा**



शारीरिक तंदुरुस्ती आणि स्नायूंची ताकद ३५ वयापर्यंत सर्वोच्च पातळीवर पोहोचते, त्यानंतर हळूहळू कमी होऊ लागते. ही घसरण व्यायामाने थांबवता येत नाही, पण नक्की मंदावता येते. कधीही व्यायाम सुरू करणे उशिरा होत नाही, असे संशोधक सांगतात.

स्वीडनमधील कारोलिन्स्का इन्स्टिट्यूटने एक संशोधन केले. 'स्वीडिश फिजिकल अॅक्टिव्हिटी अँड फिटनेस स्टडी' (एसपीएएफ) असे त्याचे नाव आहे. ४७ वर्षांपासून शेकडो पुरुष आणि महिलांचे निरीक्षण करण्यात आले. हे लोक १६ ते ६३ वयाच्या होते आणि त्यांची शारीरिक क्षमता, ताकद आणि स्नायूंची टिकाऊपणा वारंवार तपासला गेला. यात एकाच लोकांचे दीर्घकाळ निरीक्षण करण्यात आले. जे आधीच्या अभ्यासांपेक्षा वेगळे आहे.

**३५ वर्षे वय का महत्त्वाचे?**

शारीरिक तंदुरुस्ती, स्नायूंची ताकद आणि सहनशक्ती ही सर्वोच्च पातळी साधारण ३५ वर्षांपर्यंत पोहोचते. त्यानंतर हळूहळू कमी होऊ लागते. म्हणजे ३५ हे वय एक मोठ्या बदलाचा टप्पा आहे. तिथून शरीराची कार्यक्षमता खालावायला सुरुवात होते.

**कमी होण्याची प्रक्रिया कशी?**

सुरुवातीला ही प्रक्रिया कमी होणे फार हळू म्हणजे वर्षाला फक्त ०.३ ते ०.६ टक्के होते; पण वय वाढत जातांच ही गती वेगवान होते आणि नंतर २.० ते २.५ टक्के प्रतिवर्ष इतकी होऊ शकते. हे बदल पुरुष आणि महिला दोघांमध्येही दिसतात. व्यायाम सुरु केल्याने शारीरिक क्षमता ५ ते १० टक्के सुधारू शकते. व्यायामाने ही कमी होण्याची प्रक्रिया पूर्ण थांबवता येत नाही; पण नक्कीच मंदावता येते.

# हाता-पायांना मुंग्या येतात?

**व्याधी विचार**

बराच वेळ एकाच स्थितीत आणि एकाच ठिकाणी बसून राहिल्याने हातापायांना मुंग्या येतात. बरेचदा सर्वसामान्य बाब म्हणून आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. पण वारंवार या समस्येकडे केलेलं दुर्लक्ष मात्र महागात पडू शकतं. वैद्यकीय भाषेत या बधीरपणाला 'पॅरेस्थेशिया' म्हणतात. मानवी शरीरात नसा आणि रक्तवाहिन्यांचं जाळं असतं. नसांच्या माध्यमातून संदेशवहन होतं तर रक्तवाहिन्यांमधून वाहणारं रक्त शरीराच्या विविध भागांना ऑक्सिजन आणि पोषक घटकांचा पुरवठा करतं. यापैकी एकावर किंवा दोहोंवर दाब आल्याने त्यांच्या कार्यात अडथळे येतात. या अडथळ्यांमुळे नसांवर भार पडून संवेदना पाठीचा कणा आणि मेंदूकडे परत जा-तात. यामुळे मेंदू संदेशवहन होत नसल्याचा अर्थ लावतो आणि विशिष्ट अवयवाला मुंग्या येतात. नसांवरचा दाब काढल्यावर आलेल्या मुंग्या निघून जातात. यालाच तात्पुरत्या स्वरूपाचा पॅरेस्थेशिया असं म्हटलं जातं. पण यानंतरही बधीरपणा दूर झाला नाही तर हा एखाद्या व्याधीचा संकेत असू शकतो. पायांना मुंग्या आल्या तर चालताना अडचणी येतात. नसांवर दाब आल्यानंतर संबंधित अवयव बधीर होतो. अशक्तपणा जाणवतो. अनेकदा कोणत्याही कारणाशिवायदेखील मुंग्या येतात. अशा परिस्थितीत आपण जागरुक राहायला हवं. विशिष्ट अवयवावर जास्त काळ



दाब राहिला तर नसांचं कायमस्वरूपी नुकसान होऊ शकतं अथवा त्यांच्या कार्यात बिघाड होऊ शकतो. आपल्या चेतासंस्थेवर जीवनशैलीचाही प्रभाव पडत असतो. हात डोक्याखाली ठेऊन झोपण्याची सवय असणाऱ्यांना सातत्याने या समस्येला सामोरं जावं लागतं. अशा लक्षणांना सॅटर्डे नाईट पाल्सी असं म्हटलं जातं. यामुळे हातांमधून जाणाऱ्या नसांवर प्रभाव पडतो. तंग जीन्स घातल्यावरही पायांना मुंग्या आल्यासारखं वाटतं.

# 'अॅनोरेक्सा नर्व्होसा'विषयी...

**व्याधी विकार**

अॅनोरेक्सा नर्व्होसा' म्हणजे भूक मंदावणं किंवा अन्नावरची वासना उडाल्यामुळे होणारी उपासमार. किशोरवयीन मुलींमध्ये या विकाराचं प्रमाण बरंच जास्त असलं तरी वयात येणारी मुलं तसंच प्रौढांनाही हा आजार होऊ शकतो. अॅनोरेक्सग्रस्त लोकांना बारीक रहायचं असतं. असे लोक वजन कमी करतात पण ते पुन्हा वाढेल अशी त्यांना भीती असते. शरीर प्रमाणात असूनही त्यांच्या मनात आपण जाड आहोत, अशी भावना दाटून येते. कौटुंबिक समस्या, समाजाशी जुळवून घेण्यात येणारे अडथळे, शरीराबाबतच्या भन्नाट कल्पना, नैराश्य आणि इतर मानसिक आजारांमुळे हा विकार जडतो.



वजन कमी करण्याच्या उद्देशाने मुद्दाम केलेली उपासमार, वजन वाढण्याची सततची भीती, अन्न ग्रहण करण्यास नकार देणं, भूक लागल्याचं मान्य न करणं, सतत व्यायाम करत राहणं, खूप थंडी वाजणं, शरीरावर प्रमाणापेक्षा अधिक लव असणं, अनियमित मासिक पाळी, केस गळणं, खूप बारीक असतानाही आपण जाड असल्याचा विचार मनात येणं ही अॅनोरेक्साची लक्षणं आहेत.

किशोरवयीन मुली आणि तरुण महिला या विकाराला लवकर बळी पडतात. सुंदर दिसण्याची ओढ त्यांना शांत बसू देत नाही. वजन वाढलं तर समाजात स्वीकारलं जाणार नाही अशी भीती सतत सतावत असते. मध्यमवयीन महिलांमध्येही अशा समस्या उद्भवत असल्या तरी विशी-पंचविशीतल्या मुलींना याचा जास्त त्रास होतो. बरेचदा घरातलं अशांत वातावरणही खाण्याशी संबंधित विकारांना कारणीभूत ठरू शकतं.

# सवय आहे चुकीची

**आपण कुठे चुकतो**

अनेकांना बोटं मोडण्याची सवय असते. आखडलेली मान आणि पाठही मोडली जाते. यावेळी येणारा आवाज सुखावून जातो. या कृतीमुळे बोटं, पाठ, मान आदी अवयवांना आराम मिळत असल्याचा समज होतो. पण प्रत्यक्षात ही सवय चुकीची आहे. बोटं मोडल्याचे फारसे दुष्परिणाम नसले तरी मान, पाठ मोडणं प्रसंगी त्रासाचं आणि धोकादायक ठरू शकतं. सायनोव्हायल सांध्यावर ताण आल्याने हाडं मोडताना विशिष्ट प्रकारचा आवाज येतो. या सांध्यांमध्ये हवेच्या पोकळ्या असतात. त्या फुटल्याने विशिष्ट आवाज ऐकू येतो. मान, पाठ मोडताना पाठीच्या कण्यालगतच्या स्नायूवर खूप ताण येतो. मान मोडल्याने अस्थिबंध क्षीण होतात शिवाय सांधे एकमेकांवर घासले जातात. हर्निएटेड डिस्कची समस्या असेल तर या सवयीमुळे ती अधिक तीव्र स्वरूप धारण करते.

मान आणि पाठ मोडल्याने स्नायू ढिले पडतात. याला हायपरमोबिलिटी म्हटलं जातं. यामुळे सांध्यांना लवकर दुखापत होण्याची शक्यता बळावते. अशी कृती केल्यानंतर एंडॉर्फिन्स स्रवण्याची शक्यता असते. हे एंडॉर्फिन्स म्हणजे नैसर्गिक वेदनाशामक. पाठ, मान मोडल्यानंतर होणाऱ्या आवाजामुळे मोकळेपणाची जाणीव होत असली तरी प्रत्यक्षात काहीच घडलेलं नसतं. तज्ज्ञ बोटं, मान, पाठ मोडण्याची सवय चुकीची असल्याचा सल्ला देतात. त्याकडे दुर्लक्ष करून ही कृती केली जाते. पण असं करणं खूप घातक ठरू शकतं, हे वरील विवेचनावरून वाचकांना समजलं असेल.



**नवसंशोधन**


## बोन मॅरो कॅन्सरवरील प्रभावी औषध




बोन मॅरो कॅन्सरच्या उपचारांच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण असा एक शोध लागला आहे. ब्रिटनमधल्या न्यू कॅस्टल विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं. लेनालिडोमाईड असं या औषधाचं नाव आहे. नुकतंच निदान झालेल्या मायलोमाग्रस्त रुग्णांवर या औषधाद्वारे उपचार करण्यात आले. त्यांच्यात बरीच सुधारणा झाल्याचं दिसून आलं. हे औषध न दिलेल्या रुग्णांच्या तुलनेत औषध दिलेल्यांच्या तब्येतीत बराच फरक पडल्याचं निरीक्षण शास्त्रज्ञांनी नोंदवलं.

**डोळ्यांचं आरोग्य**

## प्रेसबायोपिया काय आहे?



प्रेसबायोपिया म्हणजे डोळ्यांचं वय वाढणं. शरीरासोबत डोळ्यांनाही वार्धक्य येतं. साधारणपणे चाळिशीनंतर ही प्रक्रिया सुरू होते. यामुळे जवळचं दिसायला त्रास होतो. जवळपास प्रत्येकाला ही समस्या जाणवते. म्हणूनच चाळिशीनंतर जवळपास सर्वांना चष्मा लागतो.

**दंतारोग्य**

## का खराब होतात दात?



दिवसातून दोनदा दात घासणं, दातांमध्ये अडकलेले अन्नकण काढून टाकणं अशी सगळी काळजी घेऊनही दातांच्या समस्या निर्माण होतातच. अशा वेळी आपण कुठे चुकतो हेच समजत नाही. तुम्हालाही हा प्रश्न पडला असेल तर काही सवयींमुळे आपले दात खराब होऊ शकतात हे लक्षात घ्या. डेंटिस्टकडे न जाणाऱ्या लोकांच्या दातांमध्ये लवकर खड्डे पडतात तसंच ते कमकुवत होतात. लिंबू चघळणं किंवा आंबट फळं बराच वेळपर्यंत तोंडात धरून ठेवल्याने दात संवेदनशील बनतात.

**आजीबाईचा बटवा**

## बहुगुणी नारळ



नारळात भरपूर जीवनसत्त्वं असतात. खनिजांनी समृद्ध असं हे फळ आहे. उच्च रक्तदाब असणाऱ्यांसाठी नारळातलं पाणी वरदान ठरू शकतं. यातल्या पोटॅशियममुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. अॅसिडिटीचा त्रास असणाऱ्यांनीही नारळपाणी प्यायला हवं. खोबरेल तेलामुळे स्मरणशक्ती वाढत असल्याचं काही अभ्यासांमधून समोर आलं आहे. यातल्या फायबरमुळे पोट बराच काळपर्यंत भरलेलं राहतं.

# अहिल्यादेवींची प्रतिमा तोडून हिंदूंचा घोर अपमान



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

कॉंग्रेस नेते नाना पटोले यांनी पत्रकार परिषदेत महापालिका निवडणुकीच्या निकालांवर भाष्य करत सरकारवर टीका केली. तसेच आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुका बॅलेट पेपेरवर घेण्यात यावी अशी मागणी त्यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे.

मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचे काम सरकारकडून सुरू झाले असून उद्या मुंबई केंद्रशासित झाली तर त्यात नावीन्य वाटायला नको, असा गंभीर आरोपही पटोले यांनी केला आहे. तसेच अहिल्याबाई होळकरांची प्रतिमा तोडून भारतातील हिंदूंचा अपमान करण्याचे काम या मोदी सरकारने केले असल्याची टीका नाना पटोले यांनी केली आहे.

नाना पटोले म्हणाले, देशात हिंदू खतरेमध्ये आहेत असे वल्गना करणाऱ्या या ज्या हिंदुत्ववादी संघटना आहेत, त्यांना आम्ही काय बोलावे, पण या ठिकाणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांच्या प्रतिमेला तोडून महाराष्ट्राचाच नव्हे, महाराष्ट्रातील धनगर समाजाचाच नव्हे, तर संपूर्ण भारत देशातल्या हिंदूंचा अपमान करण्याचे पाप या मोदी आणि योगी सरकारने केले आहे. ही आमची भूमिका आहे.

पटोले म्हणाले, मतदार यादीत घोळ झाला होता आणि म्हणून आम्ही निवडणूक आयोगाला सांगितले होते की मतदार याद्या पारदर्शक करावी, जी शाई लावण्यात आली ती कशी पुसली जाते ते तुमच्या माध्यमातून पाहिले आणि दुसरे महत्त्वाचे म्हणजे ईव्हीएमवर आता लोकांचा विश्वास राहिलेला नाही. हा जो अविश्वास मतदान प्रक्रियेवर जो झाला आहे त्यामुळे अनेक राज्यांमध्ये बॅलेटवर निवडणुका घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

आता जिल्हा परिषदेच्या निवडणुका ज्या आहेत, त्या निवडणुका बॅलेटवर घेण्यात याव्यात, अशी मागणी आम्ही निवडणूक आयोगाकडे आणि राज्य सरकारकडे केली आहे. तसेच लोकांमध्ये जो अविश्वास निर्माण झाला आहे तो राज्य निवडणूक आयोगाने दूर करावा, अशी आमची मागणी आहे.

पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले, मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचे काम दिल्लीत बसलेल्या सरकारने सुरू केले आहे. उद्याच्या काळात जर मुंबई केंद्रशासित झाले तर हे नावीन्य ठरणार नाही. महापालिका आपल्या ताब्यात घेऊन आता मुंबईला वेगळे करण्याचे काम त्यांनी सुरू केले आहे. हा आरोप नाही, तर ही वस्तुस्थिती असल्याचे ते यावेळी म्हणाले.

# कॉंग्रेस नगरसेवकांचा एक गट भाजपच्या संपर्कात

माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा दावा



■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. २० :

भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपुरातील कॉंग्रेसच्या नगरसेवकांचा एक मोठा गट भाजपच्या संपर्कात असल्याचा दावा करून एकच खळबळ उडवून दिली आहे.

कॉंग्रेससह अनेक पक्षांचे नगरसेवक आमच्या संपर्कात आहेत. हे सर्वजण विकासाच्या मुद्यावर भाजपसोबत येण्यास तयार आहेत, असे ते म्हणालेत.

चंद्रपूर महापालिका निवडणुकीचा निकाल गत शुक्रवारी लागला. त्यात कॉंग्रेसने सर्वाधिक २७ जागा जिंकल्या. तर भाजपला २४ जागांवर समाधान मानावे लागले. येथे या दोन्ही पक्षांना स्पष्ट बहुमत मिळाले नाही. त्यामुळे त्यांना सत्ता स्थापन करण्यासाठी इतर पक्षांची मदत लागणार आहे. या पार्श्वभूमीवर सुधीर मुनगंटीवार यांनी कॉंग्रेससह अनेक पक्षांचे उमेदवार आपल्या संपर्कात असल्याचा दावा केला आहे.

आमच्या संपर्कात अनेकजण आहेत. कॉंग्रेसच्याही एका गटाला असे वाटते की, शहरात आपण जनतेला काय उत्तर देणार? उद्या शहरात विकासच झाला नाही तर काय होईल? या शहराचे स्वच्छतेचे विषय आहेत. विजेच्या संदर्भातील विषय आहेत. या शहरात उद्या पगार द्यायलाच पैसे राहिले नाही, तर मग महापालिकेत नगरसेवक म्हणून आपण काय काम करायचे? या परिस्थितीत जनतेला उत्तर देणे अवघड होईल असे विविध प्रश्न त्यांना पडले आहेत, असे सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

ते पुढे म्हणाले, शिवसेनेच्या ठाकरे गटाच्याही अनेक नगरसेवकांनी आमच्याशी संपर्क साधला आहे. तुम्ही भाजपचा महापौर बनवत असाल तर आम्ही तुमच्यासोबत येण्यास तयार आहोत असे ते म्हणालेत.

या प्रकरणी आमची त्यांच्याशी दोनवेळा चर्चाही झाली आहे. पहिल्या भेटीतच महापौर पद कुणालाही देता येणार नसल्याचे आम्ही त्यांना सांगितले. चंद्रपूर शहराच्या विकासासाठी भाजपचाच महापौर करावा लागेल. भाजप कोणत्याही परिस्थितीत ठाकरे गटाला महापौर पद देणार नाही. प्रसंगी भाजप विरोधी बाकावर बसेल.

उल्लेखनीय बाब म्हणजे चंद्रपूर महापालिका निवडणुकीत भाजप नेते सुधीर मुनगंटीवार व किशोर जोरगेवार यांच्या अंतर्गत वादामुळे भाजपला मोठा फटका बसला आहे. या निवडणुकीत भाजपच्या विद्यमान महापौर राखी कांचलवार यांचा कॉंग्रेस उमेदवाराने दारुण पराभव केला.

गत महापालिका निवडणुकीत भाजपने थेट ३६ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले होते. पण यावेळी त्यांना केवळ २४ जागांवर समाधान मानावे लागले. त्यातच कॉंग्रेसने येथे सत्ता स्थापन करण्यासाठी जोरदार हालचाली सुरू केल्यामुळे भाजपच्या तोंडचे पाणी पळाले आहे. दरम्यान, या ठिकाणी कोणत्या पक्षाचा महापौर होतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# हे वक्तव्य म्हणजे हवेतली पतंगबाजी

## विजय वडेट्टीवार यांचा पलटवार : महापौर कॉंग्रेसचा होणार असल्याचा दावा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

चंद्रपूर महापालिकेत कॉंग्रेसची सत्ता येणार असून त्यासाठीचे आवश्यक संख्याबळ जमवल्याचे कॉंग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज स्पष्ट केले.



कॉंग्रेसचे नगरसेवक भाजपच्या संपर्कात ही भाजप नेत्यांची विधान म्हणजे हवेतील पतंगबाजी असल्याचा टोला विजय वडेट्टीवार यांनी लगावला

कॉंग्रेस पक्षाचा नेता म्हणून चंद्रपुरात कॉंग्रेसची सत्ता स्थापन करणे आणि तिथला महापौर बसवणे ही आमची प्राथमिकता आहे, त्यासाठी आवश्यक संख्याबळ मिळवल्याचे कॉंग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितले. चंद्रपुरात कुणालाही तोडफोड करणे, नगरसेवक पळवणे यासाठी स्कोप नाही.

त्यामुळे कोणी काहीही विधान केली तरी कॉंग्रेसचाच महापौर होणार असे सांगत वडेट्टीवार यांनी भाजपच्या दाव्यातील हवा काढली. भाजपचे नगरसेवक कॉंग्रेसचाही संपर्कात असल्याचे संकेत वडेट्टीवार यांनी यावेळी दिले. चंद्रपुरात जनतेने कॉंग्रेसला कौल दिला असल्याने तिथे जनतेला अपेक्षित असा कॉंग्रेसचा महापौर होणार अस वडेट्टीवार म्हणाले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सहा नगरसेवक निवडून आले आहेत. राज्यात महाविकास आघाडी आल्याने या नगरसेवकांना चंद्रपुरात सोबत घेण्याबाबत चर्चा सुरू असल्याचे कॉंग्रेस नेते वडेट्टीवार यांनी सांगितले. महापौर पदावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने दावा केला, हा त्यांचा अधिकार आहे, सर्वच गोष्टींबाबत शिवसेना पक्षातील पक्षश्रेष्ठींशी चर्चा सुरू असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

चंद्रपुरात कॉंग्रेस निष्ठावंत आणि अनुभवी नगरसेवक यांना महापौर बनवावे अशी भूमिका आहे. नागपुरात पत्रकारांशी संवाद साधत असताना कॉंग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी चंद्रपूर महापालिकेबाबत भूमिका मांडली.

मुंबई-अहमदाबाद हा राष्ट्रीय मार्ग १९ आणि २० जानेवारी रोजी मुंबईकडे जाणाऱ्या अवजड वाहनांसाठी बंद ठेवण्यात आला असून याची अधिसूचना पालघर जिल्हाधिकारी यांनी गुजराती भाषेत काढली ही सुरुवात आहे. पालघर पासून गुजरातीचा शिरकाव करण्यात येत आहे. भाजपचा मुंबईत महापौर होणार, म्हणजे कुणाच्या इशाऱ्यावर मुंबई चालणार हे स्पष्ट आहे अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

स्वित्झर्लंड येथील दावोस इथे राज्य सरकारने लाखो कोटींचे सामंजस्य करार करत आहे.पण यात देशातील कंपन्या परदेशात जाऊन करार करत आहे, याचा काय उपयोग आहे? परदेशातील कंपन्यांची महाराष्ट्रात गुंतवणूक येणार का, असा सवाल वडेट्टीवार यांनी यावेळी उपस्थित केला आहे.

## तिकडे अध्यक्षाचे पदग्रहण आणि इकडे हनुमान पूजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :



भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष नितिन नवीन यांनी अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारून देशाला संबोधित करत असतानाच, जामसांवली येथील प्रसिद्ध हनुमान मंदिरात विशेष पूजन व आरतीचे आयोजन करण्यात आले. शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली.

यावेळी भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले असून, नवीन यांचा कार्यकाळ यशस्वी व्हावा यासाठी प्रार्थना करण्यात आली. या प्रसंगी नवनिर्वाचित नगरसेविका सौ. प्रमिला गौर, कार्यालय मंत्री ब्रजभूषण शुक्ला, मंत्री अमोल कोल्हे, अजय गौर यांच्यासह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

## चुलत सासऱ्यांसह दोघांचा मृत्यू

### कार नदीत कोसळली

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. २० :

दोन दिवसांपूर्वी हत्या झालेल्या चुलत जावयाच्या अंत्यविधीला उपस्थित राहून परतणाऱ्या नातेवाईकांवर काळाने झडप घातली. आलापल्ली-सिरोंचा महामार्गावरील दिना नदीच्या पुलावरून कार अनियंत्रित होऊन खाली कोसळल्याने झालेल्या भीषण अपघातात चुलत सासऱ्यासह त्यांच्या भावाचा जागीच मृत्यू झाला.

यादव कोलपाकवार (७३, रा. आष्टी, ता. चामोर्शी) आणि त्यांचे चुलत बंधू सुनील कोलपाकवार (५५, रा. बोरी, ता. अहेरी) अशी मृतांची नावे आहेत. या अपघातात अभिजित कोलपाकवार, अर्चना कोलपाकवार आणि पद्मा कोलपाकवार हे तिघे गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने चंद्रपूर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

## महापारेषणचा बुधवारी 'ब्लॅक स्टार्ट' सराव

### नागपूर, भंडारा जिल्ह्यांतील वीजपुरवठा काही काळ विस्कळीत होणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

विद्युत ग्रीड निकामी होण्यासारख्या आपत्कालीन परिस्थितीत यंत्रणा पुन्हा कार्यान्वित करण्याच्या तयारीसाठी महापारेषणतर्फे बुधवार, २१ जानेवारी रोजी 'ब्लॅक स्टार्ट' सराव आयोजित करण्यात आला आहे. यामुळे नागपूर आणि भंडारा जिल्ह्यातील काही भागांतील वीजपुरवठा अल्प काळासाठी खंडित होण्याची शक्यता आहे.

भारतीय विद्युत ग्रीड कोड आणि महाराष्ट्र विद्युत ग्रीड कोडमधील नियमांनुसार हा सराव अनिवार्य असतो. अचानक ग्रीड निकामी झाल्यास, कोणत्याही बाह्य मदतीशिवाय वीज निर्मिती केंद्र पुन्हा शून्यातून कसे सुरू करावे, याची तांत्रिक चाचणी यामध्ये घेतली जाते. भविष्यातील मोठे संकट टाळण्यासाठी आणि वीज यंत्रणा जलद गतीने पूर्ववत करण्यासाठी हा सराव अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

हा सराव बुधवारी सकाळी ८ ते दुपारी १२ पर्यंत करण्यात येणार असून यात १३२ केव्ही पेंच जलविद्युत प्रकल्पातून २२० केव्ही कन्हान, ४०० केव्ही खापरखेडा, २२० केव्ही बुटीबोरी आणि २२० केव्ही व्हीआयपीएल या उपकेंद्रांतील काही घटकांना मुख्य प्रणालीतून वेगळे करून वीजपुरवठा केला जाईल.

या काळात संबंधित भागांवर मर्यादित भार टाकला जाणार असल्याने या काळात नागपूर व भंडारा जिल्ह्यातील काही विशिष्ट भागांतील वीज पुरवठा अल्प काळासाठी खंडित होऊ शकतो अथवा मर्यादित स्वरूपात भारव्यवस्थापन करावे लागू शकते. असे महावितरणने कळविले आहे

## लोकरंजन

## लवकरच माया येणार प्रेक्षकांच्या भेटीस




मराठी चित्रपटसृष्टीत नवनवीन प्रयोगांची लाट सुरू असताना, महाराष्ट्राची लाडकी अभिनेत्री मुक्ता बर्वे नव्या वर्षाची सुरुवात एका खास भेटीसह करत आहे. नेहमीच आशयघन, दमदार आणि आव्हानात्मक भूमिका निवडणारी मुक्ता बर्वे माया या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

शालिनी सिनेमाज आणि नितीन वैद्य प्रॉडक्शन्स निर्मित माया या चित्रपटाचे पोस्टर नुकतेच प्रदर्शित झाले आहे. येत्या २७ फेब्रुवारीला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. भूमिकांच्या निवडीत नेहमीच वेगळेपण जपणारी मुक्ता बर्वे मायामध्ये प्रमुख आणि प्रभावी भूमिकेत झळकणार आहे. पोस्टरमध्ये मुक्तासोबत सिद्धार्थ चांदेकर, रोहिणी हट्टंगडी आणि डॉ. गिरीश ओक अशी तगडी कलाकारांची फळी दिसत असून, या चित्रपटाची कथा नेमकी काय असेल याची उत्सुकता प्रेक्षकांना लागली आहे.

या चित्रपटाचे वैशिष्ट्य म्हणजे, घोषणेआधीच मायाने आंतरराष्ट्रीय झेप घेतली आहे.

या चित्रपटाची निवड २४ व्या पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलमध्ये झाली असून, ही बाब मायाच्या आशयघन आणि दर्जेदार कथानकाची साक्ष देते. मुक्ता बर्वेचा प्रत्येक चित्रपट हा अभिनयाचा नवा अनुभव असतो. त्यामुळे मायामधील तिच्या भूमिकेकडून प्रेक्षकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. शालिनी सिनेमाज आणि नितीन वैद्य प्रॉडक्शन्स निर्मित माया चित्रपटाचे दिग्दर्शन आदित्य इंगळे यांनी केले असून डॉ. सुनील दातार, अलका मधुकर दातार, नितीन प्रकाश वैद्य यांनी या चित्रपटाची निमीर्ती केली आहे. माया हा चित्रपट येत्या २७ फेब्रुवारीला प्रदर्शित होणार आहे.

■ ■ ■




## साडे माडे तीनचे धमाकेदार रियुनिअन सेलिब्रेशन

मराठी चित्रपटसृष्टीत काही चित्रपट असे असतात, जे काळाच्या पुढे जाऊनही प्रेक्षकांच्या मनात कायमस्वरूपी घर करून बसतात. १९ वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेला साडे माडे तीन हा त्यातलाच एक. साधी गोष्ट, निरागस विनोद आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे प्रेक्षकांच्या मनात घर करणारे कुरळे ब्रदर्स, यामुळे हा चित्रपट आजही आठवणीत ताजा आहे आणि आता जवळपास दोन दशकांनंतर, हीच जादू पुन्हा एकदा अनुभवायला मिळणार आहे.

येत्या ३० जानेवारी रोजी पुन्हा एकदा साडे माडे तीन प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. त्याआधीच या चित्रपटाचा रियुनिअन सोहळा नुकताच मोठ्या दणक्यात पार पडला आणि या कार्यक्रमाने सगळ्यांनाच जुन्या आठवणींत हरवून टाकलं. या रियुनिअनमध्ये साडे माडे तीनचा अविभाज्य भाग असलेले सचित पाटील, यांच्यासह पुन्हा एकदा साडे माडे तीनची संपूर्ण टीम उपस्थित होती. स्टेजवर कलाकार आले आणि जणू काळ मागे फिरला. कुरळे ब्रदर्स पुन्हा एकत्र पाहून उपस्थितांमध्ये एक वेगळाच उत्साह संचारला होता. यावेळी पुन्हा एकदा साडे माडे तीनच्या प्रमोशनल साँगचे बीटीएसही दाखवण्यात आले. या कार्यक्रमात केवळ औपचारिक बोलणं नव्हतं, तर प्रचंड धमाल, मस्ती आणि खळखळून हसवणारे किस्से रंगले. शूटिंगच्या दिवसांतील गंमती-जंमती, पडद्यामागचे मजेशीर प्रसंग, सेटवरील आठवणी सगळंच पुन्हा जिवंत झालं.

■ ■ ■

## साजिद खानच्या नवीन इव्हेंट कंपनीचे नाव वासाका



'वासाका' संभाषणाची सुरुवात झाली आणि जेव्हा सलमानने गंमतीने वाजिद साजिद खानदान असे नाव सुचवले, तेव्हा त्याचे रूपांतर एका ब्रँड नावात झाले, जे आता 'वासाका' म्हणून ओळखले जाते.

नवीन इव्हेंट कंपनी 'वासाका' हे नाव सलमान खानने त्याचे आवडते संगीतकार जोडी साजिद-वाजिद यांना एका हलक्याफुलक्या क्षणी सुचवले होते. जेव्हा साजिदने सांगितले की त्याला एक इव्हेंट कंपनी सुरू करायची आहे आणि तिचे नाव काय ठेवावे असे विचारले, तेव्हा सलमानने गंमतीने म्हटले, याला वाजिद-साजिद खानदान म्हणा वासाका. साजिदला ते नाव लगेच आवडले आणि त्याने कंपनीसाठी ते निश्चित केले.*साजिद-वाजिद यांनी 'वासाका' या इव्हेंट कंपनीच्या माध्यमातून जागतिक स्तरावर कलात्मक पूल बांधण्यासाठी आणि भारत व मध्य पूर्वेतील नवीन प्रतिभेला संधी देण्यासाठी आपल्या उपक्रमाचे अनावरण केले.

संगीत क्षेत्रासाठी एका महत्त्वपूर्ण क्षणी, प्रसिद्ध जोडी साजिद-वाजिदचे संगीतकार साजिद यांनी 'वासाका' या आपल्या खानदानातील पहिल्या इव्हेंट कंपनीच्या लॉंचची घोषणा केली आहे. 'वासाका'च्या माध्यमातून साजिद खान संगीतातील नाविन्याच्या एका नवीन युगात प्रवेश करत आहेत, जे साजिद-वाजिद यांच्या संगीताचा कालातीत आत्मा जपण्यासोबतच त्याची क्षितिजे विस्तारणार आहे.

■ ■

## तोड कर दिल मेरा स्टार प्लसवर



टेलिव्हिजन विश्वात एका वेगळ्या उंचीवर जाऊन कायम प्रेक्षकांना मोहित करणारं एकमेव चॅनल म्हणजे स्टार प्लस! नेहमीच वेगळ्या वाटेवर जाऊन वैविध्यपूर्ण कथा प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येणाऱ्या स्टार प्लसची ही नवी मालिका तोड कर दिल मेरा १९ जानेवारीपासून संध्याकाळी ७ वाजता रसिक प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

या मालिकेत अनुरिमा चक्रवर्ती रोशनीच्या भूमिकेत तर आशिष राघव राजच्या मुख्य भूमिकेत आहेत. सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध अशा लखनऊ मधली ही कथा असून अरेंज मॅरेजपासून या कथेची सुरुवात होते. दोन हृदयांची एकत्र प्रवासाला झालेली सुरुवात कथा पुढे सरकत असताना एक प्रश्न निर्माण करते त्यांची प्रेमकहाणी परिपूर्ण वैवाहिक चित्र ठरेल की ती वेदना आणि भावनिक उलथापालथीची गोष्ट बनून राहील?

तोड कर दिल मेरा ही मालिका एक अनोखी प्रेमकथा असून याआधी कधीही पाहायला न मिळालेली गोष्ट या नव्या मालिकेतून उलगडणार आहे.

अस्सल, मुळाशी जोडलेली आणि, सहज भावणारी अशी ही प्रेमकथा असून मानवी नात्यातील प्रेम काळाच्या कसोटीवर खरे उतरू शकेल का? हा प्रश्न अधोरेखित करते. स्टार प्लसने सोशल मीडियावर मालिका तोड कर दिल मेरा या नव्या मालिकेचा प्रोमो शेअर केला आहे. पाहायला विसरू नका, ही नवी मालिका तोड कर दिल मेरा १९ जानेवारी पासून ७ वाजता फक्त स्टार प्लसवर! ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com


मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
महासागर
प्रिंट | ई-पेपर | डिजिटल | युट्यूब
सर्व काही एका छताखाली

दै. महासागर, दै. युवराष्ट्र दर्शन, नागपूर पोस्ट (इंग्रजी) आणि संपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्म, महासागर मीडिया ग्रुप आज प्रिंटपासून डिजिटलपर्यंत सर्व माध्यमांत सक्षमपणे कार्यरत आहे.

दररोज वाचनीय - दै. महासागर

**दै. महासागर** हे केवळ वृत्तपत्र नाही, तर ज्ञान, संस्कार, विचार आणि संवेदनशीलतेचा ५५ वर्षांचा अखंड प्रवास आहे. दररोज वाचनीय, माहितीने परिपूर्ण आणि सर्व वयोगटांना सामावून घेणाऱ्या नव्या, नव्या पुरवण्यांच्या माध्यमातून एक व्यक्ती नव्हे तर अवघं कुटुंब वाचावं, हाच आमचा प्रामाणिक उद्देश आहे.
**गेल्या ५५ वर्षांपासून सामाजिकतेचा वसा जपणारे दै. महासागर,** समाजप्रबोधन, शिक्षण, संस्कृती, आरोग्य, साहित्य आणि अध्यात्म या सर्वांचा संतुलित संगम साधत आहे. आपणही या वाचनसंस्कृतीचा भाग व्हावा, हीच आमची आपेक्षा.

दर दिवशी विशेष वाचनीय पुरवणी दै. महासागर सोबत

सोमवार - कॅलिडोस्कोप
विश्वनिर्मितीपासून ते नव्या शोधांपर्यंतचा प्रवास
या सदरातून वाचकांना विज्ञान, अंतराळ, निसर्ग, तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या अद्भुत विश्वात घेऊन जाण्याचा प्रयत्न केला जातो. विश्वाची निर्मिती कशी झाली, पृथ्वीचे रहस्य, आधुनिक विज्ञानातील नवे शोध, AI, अंतराळ मोहिमा, सर्व काही सोप्या, समजेल अशा भाषेत.
• विद्यार्थ्यांपासून जिज्ञासू वाचकांपर्यंत सर्वांसाठी बौद्धिक मेजवानी.

मंगळवार - जोश
तरुणाईसाठी प्रेरणादायी ऊर्जा
फॅशन, फूड, करियर, यशकथा, स्टार्टअप्स, नवे ट्रेंड्स, आजच्या नव्या दमाच्या तरुणाईला जगण्यासाठी बळ देणारे सदर म्हणजे 'जोश'.
• अपयशातून उभे राहण्याच्या कथा, करियर मार्गदर्शन, आत्मविश्वास वाढवणारे लेख
• जीवनात "मीही करू शकतो" हा विश्वास निर्माण करणारे विचार

बुधवार - निरामय
चांगल्या आरोग्यासाठी खास मार्गदर्शन
आरोग्य ही खरी संपत्ती आहे, हेच या सदराचे सूत्र. दैनंदिन आरोग्य टिप्स, आहार, व्यायाम, मानसिक आरोग्य, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन, सर्वसामान्यांना उपयोगी पडेल असे व्यवहार्य आरोग्यज्ञान येथे मांडले जाते.
• आजारांपेक्षा आरोग्य जपण्यावर भर.

गुरुवार - अस्मिता
छंद, कौशल्य आणि नव्या निर्मितीचा शोध
माणूस केवळ नोकरीने नाही, तर त्याच्या छंदानेही जगतो.
लेखन, चित्रकला, संगीत, हस्तकला, फोटोग्राफी, उद्योजकता,
स्वतःमधील सुप्त कला ओळखण्यास मदत करणारे सदर.
• व्यक्तिमत्त्व विकास आणि आत्मसन्मान वाढवणारे लेखन.

शुक्रवार - भक्ती मार्ग
भक्ती, श्रद्धा आणि जीवनमूल्यांचा मार्ग
भक्तीचा मार्ग शेवटी सुखाकडे नेतो,
काय चांगले, काय वाईट, कर्म,कर्तव्य, देवाचा महिमा आणि माणूस म्हणून आपली जबाबदारी
या साऱ्यांवर चिंतन करणारे आध्यात्मिक सदर.
• मनाला शांतता, जीवनाला दिशा देणारे विचार.

शनिवार - बालांगण
लहानग्यांचे निरागस विश्व
मुलांना काय हवे आहे, काय नको
त्यांचे भावविश्व, शिक्षण, खेळ, संस्कार, पालकांसाठी मार्गदर्शन
या सर्वांचा समतोल साधणारे सदर.
• उद्याच्या पिढीचा विचार आजच.

रविवार - साहित्य मैफिल
शब्दांची, विचारांची आणि भावनांची मेजवानी
कविता, कथा, लेख, समीक्षा,भ्रमंती लाईव्ह स्टोरी सदर
नवोदित व प्रस्थापित लेखकांचे दर्जेदार साहित्य
दै. महासागरची साहित्यिक परंपरा जपणारे हे सदर.
• साहित्यप्रेमींना विचारांची समृद्धी देणारे व्यासपीठ.

'खरीखरी' हा विशेष अग्राग्रलेख
दररोज ज्येष्ठ संपादक व विचारवंत **श्रीकृष्ण चांडक** यांचा **'खरीखरी'** हा विशेष अग्राग्रलेख दै. महासागरमध्ये नियमितपणे प्रसिद्ध होतो.दररोज स्वतःच्या नावाने अग्रलेख लिहिणारे ते राज्यातील पहिले वृत्तपत्र मालक, संचालक संपादक ठरले आहेत.'खरीखरी' या सदरातून ते कोणताही आडपडदा न ठेवता समाज, राजकारण, प्रशासन आणि लोकजीवनातील वास्तव मांडतात.सत्तेच्या विरोधात उभे राहण्याचे धाडस, अन्यायाविरुद्ध स्पष्ट भूमिका आणि सामान्य माणसाच्या बाजूने ठामपणे बोलण्याची ताकद, हेच या अग्राग्रलेखाचे वैशिष्ट्य आहे.

दै. महासागर म्हणजे बातम्यांसोबत विचार, वाचनासोबत संस्कार आणि समाजासोबत आपुलकी दररोज वाचनीय, दररोज उपयुक्त.

ई-पेपर - महासागर मीडिया ग्रुप
https://epaper.dainikmahasagar.in
दै. महासागर, दै. युवराष्ट्र दर्शन आणि नागपूर पोस्ट (इंग्रजी) हे सर्व वृत्तपत्रे आता जगाच्या कुठल्याही कोपऱ्यातून, कुठेही आणि कधीही सहज वाचता येतात.
• आकर्षक आणि आधुनिक मांडणी
• एका क्लिकवर सर्व पेपर्स उपलब्ध
• मोबाईल, टॅब, लॅपटॉपवर सहज वाचन

डिजिटल महासागर मीडिया ग्रुप
https://dainikmahasagar.in
सर्व बातम्या एका ठिकाणी, सर्वांसाठी.
डिजिटल महासागरवर टाकलेली प्रत्येक बातमी लिंकच्या माध्यमातून तातडीने सर्वत्र पोहोचते.
• वेगवान आणि विश्वासार्ह बातम्या
• अपडेट्स रिअल टाइममध्ये
• काळ डिजिटलचा आहे आणि महासागरने त्यानुसार पुढचे पाऊल टाकले आहे.

महासागर युट्यूब न्यूज चॅनल
youtube.com / mahasagarnews
अनेक दर्जेदार शो, ग्राउंड रिपोर्टिंग, रोजच्या राजकीय-सामाजिक घडामोडी, महासागर मीडिया ग्रुपच्या सर्व लाईव्ह अपडेट्स आणि सेम टीव्हीच्या धर्तीवर उभे राहत असलेले डिजिटल व्हिडिओ साम्राज्य.
• लाईव्ह रिपोर्टिंग
• ग्राउंड रिॲलिटी
• लोकांच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ

प्रिंटचा विश्वास, डिजिटलचा वेग आणि समाजासाठी पत्रकारिता.
महासागर मीडिया ग्रुप बातमी सर्व सामान्यांच्या मनातली.